**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६७
निर्णय दिनांक १९-०५-२००९

१ श्री. विलास विष्णुदास मोरे, : अपिलार्थी
रा.गुगळी धामणगाव,ता.सेलू,जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत गुगळी धामणगाव,ता.सेलू,
जि.परभणी.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,सेलू,
जि.परभणी.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि सुनावणीचे पत्र त्यांना दुसऱ्या दिवशी मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून माहिती मागितली असता, अपिलार्थी हे सुनावणीसाठी हजर राहिले नसल्याने, अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले, असे त्यांना अवगत करण्यात आले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करावे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी चूक केली असल्याने त्यांच्यावर देखील

शिस्तभंगविषयक कारवाई करावी,अशी अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आयोगाकडे अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन्म-मृत्यूच्या नोंदीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी वरिष्ठ कार्यालयात दरमहा पाठविलेल्या अहवालाच्या प्रती, सन २००४ ते २००७ या आर्थिक वर्षातील ग्राम पंचायत लेखा परीक्षणाच्या अहवालाच्या प्रती, दि. ०१.०१.२००६ ते ०८.१०.२००७ या कालावधीत झालेल्या ग्रामसभा व मासिक सभांची संख्या व दिनांक, या कालावधीतील ग्रामसभेच्या इतिवृत्तांच्या प्रती, ग्रामस्थांच्या सहया असलेल्या त्यांच्या उपस्थितीची यादी व अधिनियमातील कलम ४ प्रमाणे स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.०१.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीचे पत्र अपिलार्थीस दि. ०८.०१.२००८ रोजी प्राप्त झाले. त्यामुळे अपिलार्थी हे सुनावणीसाठी हजर राहू शकले नाहीत व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या गैरहजेरीत, सुनावणीसाठी अपिलार्थी हजर नसल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीचे प्रथम अपील दि.०७.०१.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच जन अपिलीय अधिकारी यांचे अपिलार्थीस उद्देशून

लिहिलेल्या सुनावणीचे पत्र त्यांना दि.०८.०१.२००८ रोजी प्राप्त झाल्याचा पुरावा आयोगास सादर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कौटुंबिक अडचणीमुळे ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत पुरवू शकले नाहीत. आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते सदर माहिती अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, आता ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे त्यांना विनामूल्य पुरवावी लागेल. ही माहिती अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीचे वेळी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्याचे समर्थन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे केले आहे. तथापि त्यांचे सदर समर्थन आयोगास मान्य करता येणार नाही. कारण अपिलार्थीने माहितीची मागणी केली, त्यावेळी जरी जन माहिती अधिकारी यांच्या काही कौटुंबिक अडचणी असल्या तरीही, या संपूर्ण घटनाक्रमातील विशेषतः अपिलार्थीच्या मूळ अर्जाची तारीख व आज रोजीची सुनावणी या मधील व्यपगत झालेल्या प्रदीर्घ कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा कोणताही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी ते निश्चितच

अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलास विष्णुदास मोरे,रा.गुगळी धामणगाव,ता.सेलू,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत गुगळी धामणगाव,ता.सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, सेलू, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०५
निर्णय दिनांक १९-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. आडेलू भूमन्ना बोनगिर,<br>रा. पिंपरफोडी पो.बोधडी बु.ता.किनवट,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी,<br>लातूर | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १४.०१.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि. १२.०५.२००९ रोजीचे एक पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाच्या दि. ०४.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले असून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर या पत्रामध्ये त्यांनी समाधान व्यक्त केले आहे व आयोगास त्यांनी केलेले द्वितीय अपील रद्द करण्याची विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील रद्द करण्याची त्यांनी केलेली विनंती आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ३०५/०८,दि.१८.०१.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आडेलू भूमन्ना बोनगिर,रा. पिंपरफोडी पो.बोधडी बु.ता.किनवट,जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०६
निर्णय दिनांक १९-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. माधव भिवाजी बनसोडे,<br>रा.मुखेड,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०८.०१.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे रक्कम रु.१००/- इतक्या किमतीच्या बंधपत्रावर केलेले शपथपत्र आयोगास सादर केले असून, या शपथपत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले अपील क्र.३०६/२००८ ते आता मागे घेत आहेत. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दाखविली असून या माहितीने त्यांचे पूर्ण समाधान झाले असल्याने, माहिती न मिळाल्याबाबतची त्यांची आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता शपथपत्राद्वारे मागे घेतले असल्याने, अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ३०६/०८,दि.१०.०१.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १९-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव भिवाजी बनसोडे, गौतमनगर, मुखेड, ता.मुखेड जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०७
निर्णय दिनांक १९-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. नागोराव गंगाराम गोरठेकर,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (म),<br>तहसील कार्यालय,उमरी,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,उमरी,जि.नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजपर्यंत प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. वाघलवाडा येथील स.नं.३/क च्या क्षेत्राच्या आकारमानामध्ये झालेल्या बदलासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"मौ. वाघलवाडा सर्व्हे नं.३/क चे लागवडी लायक क्षेत्र ३ एकर २२ गुंठे असताना त्याचे १ हे. २४ आर म्हणजेच ०.२० आर कमी कशा आधारे केले? तसेच सन ७०-७१ ते

८५-८६ ते ७/१२ मध्ये लागवडी लायक क्षेत्र ०.०७ आर वाढ केली. ते कोणत्या नियमाने व फेर क्रमांक काय ? सर्व्हे नं.३/क मध्ये ०.२० आर माझे क्षेत्र कमी झाले असताना सर्व्हे नं.३/अ मध्ये ०.०६ आर व ३/ब मध्ये ०.०७ आर ची वाढ कोणत्या नियमाने केली व फेर क्रमांक कोणता ? वेळोवेळी अर्ज देवून सुध्दा माझे ०.२० आर ची दुरुस्ती झाली नाही. तसेच गाव नमुना नं.७ "अ" चे भागात फेरफारशिवाय दुरुस्ती करता येत नसताना वरीलप्रमाणे बदल करण्यात आला, तो कोणत्या आधारावर केला ? त्याबाबत मला झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासास जबाबदार कोण? री रायटींग बरोबर असल्याचे ७/१२ नोंद वहीत तपासणी अधिकाऱ्याने कशी सही केली? वरीलप्रमाणे माहिती नियम व पोट कलमसहीत द्यावी. "

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन १९६०-१९९५ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही अथवा त्यांच्याशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, मौ. वाघलवाडा स.नं. ३/क च्या ७/१२ उताऱ्यावर त्यांच्या मालकीच्या जमिनीचे जे क्षेत्र कमी दाखविले आहे, ते त्यांना परत मिळावे व त्याप्रमाणे जमिनीचा ७/१२ चा उतारा दुरुस्त करुन मिळावा.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून यामध्ये त्यांनी, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नसल्याचे मान्य केले आहे. या लेखी युक्तिवादामध्ये

त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने ज्या जमिनीसंदर्भात माहिती मागविली होती, त्या जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्याचे १९६९-७० मध्ये पुनर्विलोकन होऊन त्याद्वारे जमिनीच्या क्षेत्राचे एकर या परिमाणाचे हेक्टर-आर. मध्ये रुपांतर करीत असताना अपिलार्थीच्या जमिनीच्या क्षेत्रामध्ये ०.१३ आर. ने घट झाली असून, या कमी झालेल्या क्षेत्राची नोंद त्यांच्या नजिकच्या दोन भूखंडामध्ये जास्त क्षेत्राची नोंद करुन दर्शविली गेली आहे. हा बदल सन १९६९-७० मध्ये निदर्शनास आला आहे. बदल करतेवेळी शासनाने जाहीर प्रगटनाद्वारे आक्षेप मागितले असता, त्यावेळी अपिलार्थीने कोणतेही आक्षेप नोंदविलेले नाहीत. तदनंतर हे पुनर्विलोकन अंतिम करुन ७/१२ उतारा अंतिम करण्यात आला.तसेच जवळजवळ ३९ वर्षानंतर अपिलार्थीने क्षेत्र दुरुस्तीकरिता त्यांच्याकडे अर्ज केला आहे. त्यांची जमीन ज्या शेताच्या क्षेत्रामध्ये गेली आहे, त्या भूखंडाचे मालक अपिलार्थीचे भाऊ असून ती जमीन अपिलार्थीचे भाऊ त्यांना देण्यास तयार नाहीत. तसेच अपिलार्थीने या जमिनीची विक्री केली आहे व आज रोजी अपिलार्थीची या क्षेत्रावर कोणतीही मालकी उरलेली नाही.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०८.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होणारी नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या 'माहिती'चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबतचे समर्थन,खुलासे व अभिप्राय अपेक्षित केले आहेत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यास ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात त्यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया 'माहिती देणे' या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलचे समर्थन,कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दल अथवा एखाद्या निर्णयाबद्दल अर्जदारास

त्याचे स्पष्टीकरण देणे अशाप्रकारची प्रक्रिया मूळात अभिप्रेत नाही. म्हणून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीसाठीचा मूळ अर्ज या प्रकरणी अवैध ठरत आहे. अपिलार्थीस मौ.वाघलवाडा येथील स.नं.३/क मधील ७/१२ च्या उताऱ्यावर क्षेत्र दुरुस्ती करुन हवी आहे. अशा बाबीसंदर्भात वेगळे न्यायिक प्राधिकरण महसूल यंत्रणेअंतर्गत उपलब्ध आहे, हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या मूळ गाऱ्हाण्यापृष्ठयर्थ उपविभागीय अधिकारी,नांदेड यांच्याकडे अपील करुन आपल्या गाऱ्हाण्याची तड लावून घ्यावी.

प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचे याच विषयावर उपविभागीय अधिकारी,नांदेड यांच्याकडे प्रकरण प्रलंबित आहे. उपविभागीय अधिकारी,नांदेड यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणाचा त्यांनी प्राधान्याने निपटारा करावा.

प्रसंगावशात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जरी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होणारी नसली तरी या प्रकरणी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची केलेली अक्षम्य उपेक्षा या ठिकाणी दुर्लक्षित करणे उचित होणार नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. एस.डी.गिरी, नायब तहसीलदार सध्या जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे नायब तहसीलदार (निवडणूक) या पदावर कार्यरत) यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव (महसूल) यांना या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. एस.डी.गिरी सध्या नायब तहसीलदार (निवडणूक),जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नागोराव गंगाराम गोरठेकर,एन.डी-४१/बी/२०-१५ संभाजी चौक,सिडको,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,उमरी,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,उमरी,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल),महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०९
निर्णय दिनांक १९-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नामदेव गणपतराव कदम व इतर<br>मु.चौकी महाकाया,पो.कौठा,ता.कंधार,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,कंधार,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,नांदेड | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी प्रभारी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना गट विकास अधिकारी यांनी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, - त्यांनी दि. ०२.०८.२००७ रोजी कथित अनुदान घोटाळयासंदर्भात दाखल

केलेल्या तक्रारीवर चौकशी करुन अहवाल सादर करावा, असा शेरा कक्ष अधिकारी यांनी मारुन चौकशी केलेल्या अहवालाची सत्यप्रत - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(७) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले तथापि त्यावरही निर्णय प्राप्त न झाल्याने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या वेळी माहिती मागितली, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तीनही अपिलार्थींना दि. १५.०३.२००८ रोजी, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर आवश्यक ती माहिती पुरविलेली आहे व माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ तीनही अपिलार्थींनी तशी पोच जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या तीन पोच पत्राच्या प्रती दाखविल्या. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी आता नियतवयोमानानुसार दि. ३१.०३.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीचा एकच अर्ज केला आहे.परंतु प्रथम व द्वितीय अपील मात्र तिघांनी केले आहे. या तीनही अपिलार्थींना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०३.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अंदाजे पाच महिने दहा दिवस इतका विलंब झाला आहे. तथापि अपिलार्थींनी मागणी

केलेली माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले जन माहिती अधिकारी हे आता नियतवयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत, ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.३०९/०८, दि.२९.०१.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नामदेव गणपतराव कदम व इतर रा. मौजे चौकी महाकाया, पो.कौठा, ता.कंधार जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५२
निर्णय दिनांक १९-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चंद्रकांत पिराजी गव्हाणे,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>अधीक्षक अभियंता,<br>यांत्रिकी मंडळ (उ.सं) कार्यालय,<br>नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>यांत्रिकी मंडळ (उ.सं),<br>नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहितीची मागणी केली असता, त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे मागणी केलेली माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब लावल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील अवजड यंत्रसामुग्रीवर दुरुस्ती व अन्य कामावर झालेल्या खर्चाबाबत काही माहिती विचारली होती. अपिलार्थीने सन २००३-२००७ या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातून दि.२७.०४.२००९ रोजीच्या सूचनापत्राबरोबरच दूरध्वनीवरुन दि.१६.०५.२००९ रोजी ठीक ०३.०० वा. श्री.पेंटर, स्वीय सहायक यांच्यामार्फत सूचना देऊनही ते स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी सुनावणीस उपस्थित नाहीत.

आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी नेमका कधी प्रतिसाद दिला, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला किंवा कसे हे कळण्यासाठी यासंदर्भातील इतर कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत, हे पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले निर्णय देणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १६.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१६.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत पिराजी गव्हाणे,कार्यालय,साप्ताहिक 'विधायकता',फायर स्टेशनच्या पाठीमागे, गणेशनगररोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उ.सं) कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,यांत्रिकी मंडळ (उ.सं) कार्यालय,नांदेड यांना, अपिलार्थीच्या दि.१६.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५३
निर्णय दिनांक १९-०५-२००९

१ श्री. दिलीप बापुराव दखने : अपिलार्थी
रा. अंतरवाली सराटी,ता.अंबड,जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा खनिकर्म अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, जालना

तत्कालीन जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, जालना.

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जालना

विद्यमान जन माहिती अधिकारी : जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

जन अपिलीय अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी विद्यमान जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, जालना जिल्हयातील अंबड व घनसावंगी या तालुक्यामध्ये झालेल्या वाळू उपशाबाबत सन २००० ते ३१.०३.२००७ पर्यंतची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अंबड,घनसावंगी तालुक्यात वाळू उत्खननातून शासनास प्राप्त झालेला महसूल, अवैध वाळू उपसा करणाऱ्या ट्रक,ट्रॅक्टर चालकांकडून किती दंड वसूल केला, किती वाहनांवर कारवाई केली, त्यांचे नंबर, वाहनांवर कार्यवाही करणाऱ्या संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांनी तयार केलेल्या पंचनाम्याच्या प्रती, सन २००० ते दि. ३१.०३.२००७ पर्यंत किती वाळू उपसा केला व प्रत्येक वाळू उत्खननातून किती रुपये शासनास मिळाले, - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.१२.२००७ रोजी माहिती दिली असल्याचे नमूद करुन निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी विद्यमान जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.१२.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या पंचनाम्याच्या प्रती व वाहनाचे क्रमांक, वसूल झालेला दंड, ही माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ही माहिती संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी व तहसीलदार यांच्या स्तरावर उपलब्ध असल्याने जन माहिती अधिकारी ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १४.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी व तहसीलदार ज्यांची जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे, त्यांच्याकडे उपलब्ध होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे पाच दिवसांच्या आत सर्व संबंधितांकडे पाठवून देऊन त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही केली असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि अशाप्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे जन अपिलीय अधिकारी हे आयोगास सांगत आहेत. मात्र या संदर्भातील कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करण्यासाठी त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही. आता अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित मूळ माहितीसाठीच्या अर्जाच्या प्रती त्यांनी सर्व संबंधितांकडे पाठवून, अपिलार्थीस उर्वरित माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य प्राप्त होईल, असे पहावे.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १४.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची आयुक्त (महसूल) औरंगाबाद विभाग यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, असे नमूद केले आहे. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीस काही माहिती प्राप्त झाल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या कथित माहितीच्या दर्जाबाबत अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांचे कोणतेही अभिप्राय नोंदविलेले नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त (महसूल),औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप बापूराव दखने,रा. अंतरवाली सराटी,पो.नालेवाडी,ता.अंबड,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९७
निर्णय दिनांक १९-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. आनंद यशवंत गोस्वामी,<br>अंबाजोगाई,जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय आयुक्त,<br>औरंगाबाद विभाग,औरंगाबाद | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथ.),
जिल्हा परिषद,बीड

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथ.),
जिल्हा परिषद,बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि उपआयुक्त (आस्था.) विभागीय आयुक्त (विकास शाखा) कार्यालय,औरंगाबाद हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. १७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना उपशिक्षणाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बीड यांच्याकडून मिळाली नाही. या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांनुसार त्यांना कार्यालयाने कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे

अपील केले असता, त्यांनी हे अपील मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांच्याकडे वर्ग केल्याचे दिसून येत आहे. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न कळविल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या रजेच्या रोखीकरणासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण अकरा मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"वरील विषयीचा दि.०५.०२.२००५ रोजीचा माझा अर्ज आपणास मिळाला काय? मिळाला असल्यास केव्हा ?अर्जासोबतच्या महाराष्ट्र शासनाच्या दि.९.४.२००१ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले काय?, सदर निर्णय आपणास मान्य आहे काय?,शासन निर्णयाची अंमलबजावणी आपणास बंधनकारक आहे काय?,असल्यास जिल्हास्तरावर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मार्फत वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करवून घेण्याची जबाबदारी आपली आहे काय?, असल्यास माझ्या दि. ०५.०२.२००५ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने आपण आपली जबाबदारी पार पाडली काय?, असल्यास कोणत्या रुपाने केव्हा?, नसल्यास का नाही?,माझ्या दि. ०५.०२.२००५ च्या अर्जाच्या संबंधी आपण मला काही कळवले का? नसल्यास का नाही कळवले?,दि.९.०४.२००१ च्या शासन निर्णयाप्रमाणे आता तरी त्वरित शाळेने पाठविलेल्या दि. २८.१०.२००४ चा प्रस्ताव क्र. २५५ मान्य होईल का?" सदर माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून साधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांनी त्यांच्याकडील दि. २०.०७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा अर्ज या प्रकरणाशी संबंधित उपशिक्षणाधिकारी, प्राथमिक,जि.प.बीड यांच्याकडे पाठविल्याचे अपिलार्थीस अवगत केले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित उपशिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १६.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने

त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या दि. ०५.०२.२००५ रोजीच्या अर्जाची प्रत त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे उपलब्ध होऊ न शकल्याने, अपिलार्थीकडे परत मागितली. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.०२.२००५ रोजीच्या विनंती संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी बराच पत्रव्यवहार केला व अंतिमतः अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार विभागीय आयुक्त यांच्याकडे दि. १४.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले.

विभागीय आयुक्त कार्यालयाने अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडील दि. २४.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बीड यांच्याकडे पाठविला व त्याची एक प्रत अपिलार्थीस पाठविली. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आता दि. १५.०५.२००९ रोजी अपिलार्थीस घरपोच दिली असून, ही माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांनी अपिलार्थीची त्यावर पोचसही घेतली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिसाद न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता, ते याबाबत कोणताही खुलासा आयोगासमोर करु शकले नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीस देखील अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर निर्णय घेण्यास जन अपिलीय अधिकारी यांना निश्चित कोणती अडचण होती, याचा कोणताही खुलासा आयोगासमोर करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये आयोगाच्या निदर्शनास आणलेल्या बाबींमध्ये तथ्यांश असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील काही मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणाऱ्या अशा स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारांनी माहिती मागितल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये माहिती देण्यासंदर्भात अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता त्यामध्ये जन माहिती अधिकाऱ्यास अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दल अथवा एखाद्या निर्णयाबद्दल स्पष्टीकरण देणे अथवा खुलासा करणे अभिप्रेत नाही. हे पाहता, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देय होत नसल्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळीच कळविले असते, तर अपिलार्थीस या प्रकरणी प्रथम अथवा द्वितीय अपील करण्याची गरज पडली नसती. केवळ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीस या प्रकरणी प्रथम व द्वितीय अपिले करण्यासाठी तोशीस घ्यावी लागली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे खाजगी अनुदानित शाळेत सहशिक्षक या पदावर कार्यरत असून या पदाकरिता अर्जित रजेच्या रोखीकरणाची सवलत लागू नाही. अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.०२.२००५ रोजीच्या अर्जामध्ये त्यांच्या रजेच्या रोखीकरणासाठी विनंती केली होती. परंतु ती प्रचलित सेवाशर्तीनुसार त्यांना मान्य करता येणे शक्य नाही. वास्तविकतः एवढीशी साधी बाब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळीच कळविणे या प्रकरणी मूलतः अभिप्रेत होते. परंतु अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावरील आयोगाकडील सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १५.०५.२००९ रोजी माहिती पुरविली आहे. त्यांच्या

अशाप्रकारच्या, अपिलार्थीच्या मूळ अर्जास विलंबाने प्रतिसाद देण्याच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. याच प्रमाणे या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल न घेऊन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदार वृत्ती स्पष्ट केली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०५-२००९** — **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आनंद यशवंत गोस्वामी,श्री दत्त संस्थान धाकटे देवघर,अंबाजोगाई,जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ.),जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९८
निर्णय दिनांक १९-०५-२००९

१ श्री. शेख अफसर शेख बाबू, : अपिलार्थी
रा.किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),
किनवट, जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (जं.का.सं.),
किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दि. २८.११.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००५-२००६ व २००६-२००७ या कालावधीमध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामाच्या हजेरी रजिस्टर व मोजमाप पुस्तिकेच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि मूळ अर्ज करताना अपिलार्थीने कोणतेही वैध पुरावे त्यांच्या

मूळ अर्जासोबत जोडले नव्हते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०७.२००७ रोजी अपिलार्थीकडे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मागणी केली व अपिलार्थीकडून अशाप्रकारचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर दि. ०८.०८.२००७ रोजी उपवनसंरक्षक, नांदेड यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्यापृष्ठयर्थ रक्कम रु.३२,१६६/- इतक्या अनुदानाची मागणी केली व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.११.२००७ रोजी निर्णय देऊन, अनुदान प्राप्त होताच अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक ते अनुदान प्राप्त झाल्यानंतर दि. ०३.०१.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ घेतलेले पोचपत्र आयोगास दाखविले. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१२.२००७ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर लगेचच दि. ०३.०१.२००८ रोजी, माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील आता खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२६९८/०७, दि.२९.१२.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १९-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबु,द्वारा सिग्मा इंजिनियरींग वर्क्स, गोकुळनगर चौक, नांदेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.),किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.सं.), किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९९
निर्णय दिनांक १९-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विलास नरसिंगराव टोंगे,<br>रा.धर्माबाद,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी,<br>नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. ०१.०८.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ते व्यवसायाने डॉक्टर असून त्यांच्या धर्माबाद येथील दवाखान्यामध्ये दि.०८.०२.२००६ रोजी रामदास नावाच्या पेशंटचा मृत्यू झाला असता, त्यांच्या दवाखान्यासमोर झालेल्या गोंधळासंदर्भात संबंधित पोलीस इन्स्पेक्टर श्री. सुधाकर रेड्डी यांनी केलेल्या कारवाईच्या संदर्भात श्री. पी.वेलारासू, सहायक जिल्हाधिकारी, देगलूर यांनी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार केलेल्या चौकशीसंदर्भात मागणी केलेल्या चौकशी अहवालाची माहिती त्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, उपजिल्हाधिकारी कार्यालय,देगलूर व उपविभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद यांच्यापैकी कोणाकडूनही प्राप्त झाली नाही त्यामुळे माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासंदर्भात असमर्थतता व्यक्त केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. पी.वेलारासू, तत्कालीन सहायक जिल्हाधिकारी,देगलूर यांच्या तर्फे केलेल्या चौकशीसंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. मा. श्री. पी.वेलारासू यांनी केलेल्या चौकशी विषयाची सर्व कागदपत्रे.

२. या संदर्भात मा.सिव्हील सर्जन व ईतर कुठल्याही वैद्यकीय अधिकाऱ्याचे मत (ओपिनियन) घेतले का ? घेतले असल्यास त्याची प्रत.

३. या संदर्भात कायदे तज्ञाचे मत घेतले आहे का ? असल्यास त्याची प्रत

४. चौकशी नंतर काढलेला निष्कर्ष व चौकशी अधिकाऱ्याचे मत.

५. वरील कागदपत्रांवरुन मा.जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेला निष्कर्ष व त्यांचे मत.

६. वरील संदर्भात मा. जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली वा प्रस्तावित केलेली तारीखनिहाय कारवाई. "

अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२८.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपविभागीय दंडाधिकारी, देगलूर व उपविभागीय पोलीस अधिकारी, धर्माबाद यांच्याकडून अप्राप्त असल्याने ती अपिलार्थीस देता येत नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दि. १८.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त असल्याने त्यांना देता येत नाही व ही माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस पाठविण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात येत आहे, त्यामुळे अपिलार्थीने संबंधितांशी संपर्क साधावा, असे उत्तर दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राने व्यथित

होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास सादर केला असून तो खालीलप्रमाणे आहे.

"दि. ०८.०२.२००५ रोजी माझ्या रुग्णालयात रामदास नावाच्या मुलाचा गंभीर आजाराने मृत्यू झाला. त्यानंतर त्याच्या काकाने दिलेल्या फिर्यादीवरुन कुठलीही चौकशी न करता तत्कालीन धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुधाकर रेड्डींनी गुन्हा दाखल करुन मला अटक केली व रात्रभर जमानत न देता लॉकअपमध्ये ठेवले. ही कारवाई मा. सुप्रिम कोर्टाच्या निर्देशा विरुध्द आहे अशी तक्रार मी मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे दि. १६.०२.२००५ रोजी केली. त्याची गंभीर दखल घेऊन त्यांनी देगलूरचे उपजिल्हाधिकारी पी.वेलारासू यांना सदरील प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार श्री. पी.वेलारासू यांनी धर्माबादला येऊन दि. २१.०२.२००५ व २२.०२.२००५ रोजी चौकशी केली.

सदरील चौकशीची कागदपत्रे मिळावीत व चौकशीतून काय निष्कर्ष निघाला हयाची माहिती मिळविण्यासाठी मी नांदेड जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा केला. परंतु त्यांनी उउवाउडवीची उत्तरे दिली. दि. २९.१२.२००५ मध्ये मी माहितीच्या अधिकारात त्यांना कागदपत्रे मागितले पण त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. मी मा. सुरेश जोशी यांच्याकडे अपील केले. परंतु २००५ मध्ये माहितीचा कायदा बदलल्यामुळे मला पुन्हा अर्ज करण्यास सांगण्यात आले तदनुसार मी अर्ज केल्यानंतर हे प्रकरण आता आपल्याकडे सुनावणीस आले आहे. माझ्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या आधारे मी महत्त्वाचे मुद्दे व वस्तुस्थिती आपणांसमोर सविनय सादर करीत आहे.

१) श्री. पी.वेलारासू यांनी चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयात केली. तक्रार पोलीस खात्याविरुध्दच होती शासकिय गाडीबरोबर आणली असतानाही कागदपत्रे ते उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याकडे ठेवून

गेले. त्यामुळे कागदपत्रे उपजिल्हाधिकारी देगलूर यांच्या कार्यालयात पोहचलीच नाहीत.

२) श्री. पी.वेलारासू यांनी दि. ०६.०४.२००५ व १३.०४.२००५ उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांला पत्र लिहून ही कागदपत्रे पाठविण्यास सांगितले होते. परंतु उपविभागीय पोलीस अधिकारी वसंत जाधव यांनी कागदपत्रे पाठविली नाही व पत्राचे उत्तरही दिले नाही.

३) तद्नंतर मला दिलेल्या पत्रात उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वसंत जाधव यांनी ही कागदपत्रे श्री. वसंत ठाकूर अतिरिक्त पोलीस अधिक्षक नांदेड यांनी नेली असल्याचे सांगितले श्री. वसंत जाधव यांनी ही कागदपत्रे उपजिल्हाधिकारी यांना न देता पोलीस अधिक्षकांना का दिली? मला ही कागदपत्रे अतिरिक्त पोलीस अधिक्षकांकडून घेण्यास सांगितले तसे त्यांनी उपजिल्हाधिकारी श्री. पी.वेलारासू यांना का सांगितले नाही?

हया वसंत ठाकूर, अतिरिक्त पोलीस अधिक्षक यांनी ही चौकशी केली होती. त्या चौकशीची कागदपत्रे माहितीच्या अधिकाराखाली मागितली असता त्यातील सर्वात महत्त्वाचे कागदपत्र म्हणजे मा.सिव्हील सर्जननी दिलेले एक्सपर्ट ओपीनियन हेतुपूरस्सरपणे लपवून ठेवले होते व नंतर चुकीने राहून गेले अशी मखलाशीही केली,हयावरुन त्यांचा दुष्ट हेतू स्पष्ट होतो.

४) मा. जिल्हाधिकाऱ्यांनी वस्तुतः ही कागदपत्रे मागवून त्यावर आपला अभिप्राय नोंदवून योग्य ती कारवाई करावयास हवी होती. पण असे न करता त्यांनी हेतूपुरस्सरपणे चौकशी अर्धवट राहिल असे पाहिले. जेव्हा अर्जदार या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करतोय असे लक्षात आल्यावर मला एक पत्र देऊन आपण सुरक्षित राहू असे बघितले.

एकंदरीत कागदपत्र पाहिल्यावर असे दिसून येईल की, श्री. सुधाकर रेड्डी यांनी केलेली बेकायदेशीर अन्यायकारक कारवाई झाकण्यासाठी श्री. राधेशाम मोपलवार

(जिल्हाधिकारी) श्री.पी.वेलारासू (अतिरिक्त जिल्हाधिकारी व चौकशी अधिकारी) श्री. वसंत जाधव,(उपविभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद) व श्री. वसंत ठाकूर (अतिरिक्त पोलीस अधिक्षक,नांदेड) यांनी संगनमताने चौकशीची कागदपत्रे नष्ट केली. त्यांच्या या कृतीमुळे श्री. सुधाकर रेड्डी यांना आपला गुन्हा झाकण्यासाठी मोजकी मदत झाली. त्याचप्रमाणे मला विनाकारण न्यायालयीन प्रक्रियेस सामोरे जावे लागले व प्रचंड मानसिक त्रास झाला.

या चौघांविरुध्द गुन्हा नोंदवावा उच्चपदस्थ अधिकारी असल्यामुळे त्यांची चौकशी न्यायमुर्ती मार्फत किंवा सी.बी.आय.मार्फत केली जावी. अशा प्रकरणात मा. आयुक्तांनी विभागीय आयुक्त (महसूल) किंवा शासनास चौकशीचे दिले आहेत हे माझ्या वाचनात आले आहे. अशाचप्रकारची कडक कारवाई या अधिकाऱ्यांविरुध्द करुन न्याय दयावा,ही विनंती.

सदर प्रकरणात आपण बोलावलेले निवासी उपजिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या ताब्यात ही कागदपत्रे कधी आलीच नाहीत. तसेच जिल्हाधिकारी,उपजिल्हाधिकारी यांना ते आदेश देऊ शकत नव्हते. अतिरिक्त पोलीस अधिक्षक व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनाही ते आदेश देऊ शकत नव्हते. त्यांनी ही कागदपत्रे मिळविण्यासाठी काम करावयास हवे होते व त्यांनी काय केले याची मला कल्पना नाही. "

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या जन माहिती अधिकाऱ्याच्या प्रत्यक्षात ताब्यात होती, त्या जन माहिती अधिकाऱ्याकडे अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम

अर्जाची प्रत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे, या प्रकरणी संयुक्तिक राहिले असते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ही मूळ माहितीच्या प्रकरणाशी संबंधित चौकशी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, देगलूर यांच्याकडे असणे अपेक्षित आहे, तत्कालीन चौकशी अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी, देगलूर यांनी आपले कर्तव्य बजावताना आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात, सहायक जिल्हाधिकाऱ्याने, ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या विरुध्द तक्रार होती, त्या पोलीस अधिकाऱ्यांच्याच कार्यालयात चौकशी केली, व चौकशीचा अहवाल त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्याकडेच ठेवून दिला व तदनंतर अपिलार्थीस हा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे उडवाउडवीचे उत्तर दिले. अपिलार्थीने या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडेही काही माहिती मागितली होती. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी नेमका या प्रकरणाशी संबंधित, सिव्हील सर्जन यांचा अहवाल अपिलार्थीस प्रथमतः न देता तो विलंबाने दिला व हा अहवाल कामाच्या व्यापाने द्यावयाचा राहून गेला, असे स्पष्टीकरण नंतर अपिलार्थीस दिले. या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रांची तपासणी करताना असे आढळून आले की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी हेतुपूरस्सर दडवून ठेवली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे गांभीर्य लक्षात घेता या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ मधील, "------मत घेतले आहे का?"या भागाची माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस उर्वरित संपूर्ण माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. २ व ३ अंशतः वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश

निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. जर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तीस दिवसांच्या आत देऊ शकले नाहीत तर माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर सोपविली होती, त्या सर्वांवर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी हे आदेश निर्गमित होताच साठ दिवसांच्या आत फौजदारी कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने वरील आदेश क्र.२ मध्ये नमूद केलेली माहिती त्यांना तीस दिवसांच्या कालावधीत उपलब्ध होऊ न शकल्यास, संबंधित सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जिल्हाधिकारी,नांदेड यांनी हे आदेश निर्गमित होताच साठ दिवसांच्या आत फौजदारी गुन्हा दाखल करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विलास नरसिंगराव टोंगे,'टोंगे हॉस्पीटल', पानसरे चौक,धर्माबाद,जि.नांदेड-४३१८०९.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७००
निर्णय दिनांक १९-०५-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी
उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी (रोहयो),
जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. ११.०१.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अन्यायकारक असल्याने आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.०९.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते सप्टेंबर, २००६ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित रोजगार हमी योजनेअंतर्गत, रोहयो कामातील गैरव्यवहार व अनियमिततेसंदर्भातील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १३.१०.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूरी असल्याचे वाटल्यावरुन

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ३०.११.२००६ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर, आयोगाच्या कार्यालयातून दि.२७.०४.२००९ रोजीच्या सूचनापत्राबरोबरच दूरध्वनीवरुन दि.१६.०५.२००९ रोजी ठीक ०३.२० वा. श्री.कुलकर्णी जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक यांच्यामार्फत सूचना देऊनही, स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी सुनावणीस उपस्थित नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३०.११.२००६ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांच्याकडील सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचा त्यांनी परामर्ष घेतल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट असल्याबद्दल जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्या सर्व मुद्यांचा जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेला परामर्ष व त्यावर व्यक्त केलेले अभिप्राय आयोगास योग्य वाटतात. यावर अपिलार्थीचे नेमके काय म्हणणे आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत व या संदर्भातील अभिप्राय त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये देखील समाविष्ट नाहीत. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २७००/०७,दि.११.०१.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १९-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,माणिकनगर,माणिकचौक,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७०१
निर्णय दिनांक १९-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड. : प्रतिवादी
२ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती दि. २८.०६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न पुरविल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या अपिलासंदर्भात कोणतीही माहिती देण्याचे जाणूनबुजून टाळल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित,रोजगार हमी योजनेअंतर्गत नेमल्या गेलेल्या हजेरी सहायकांच्या जेष्ठता यादीसंदर्भात व त्यांना राज्य शासनाच्या वर्ग-क मधील सेवेत समाविष्ट केल्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात दाखल केल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आवक लिपीकाची दि. २८.०६.२००७ रोजीची पोच देखील अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर उपलब्ध आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला नसल्याचे आढळून येत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एल.के.असोले, लघुटंकलेखक हे आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे सादर केला त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी म्हणून अनुक्रमे श्री. एस.टी.टाकसाळे, उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) व श्री. शशीकांत देवघरे,अपर जिल्हाधिकारी,नांदेड हे कार्यरत होते.त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत शोधण्याचे काम त्यांच्याकडे चालू असून अपिलार्थीच्या मूळ अर्ज ज्या लिपीकाकडे होता, त्या लिपीकाची आता बदली झाली असल्याने संबंधित लिपीकास त्यांनी पत्र पाठवून त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत शोधण्यास सांगितले आहे.अपिलार्थीस निश्चित कधी माहिती पुरविण्यात येईल,याचा खुलासा उपस्थित प्रतिनिधी आयोगास करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य होते. अपिलार्थीने माहिती मागवून आज सुमारे एक वर्ष ११ महिने इतका कालावधी व्यपगत होऊन गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने वरीलप्रमाणे केलेला युक्तिवाद पाहता, शासनाची क्षेत्रीय स्तरावरील संबंधित यंत्रणा किती संवेदनाशून्य आहे, याचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची बांधिलकी नसल्याचे त्यांना वाटत असल्याचे त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीवरुन स्पष्ट होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीबद्दल व विशेषतः या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात दर्शविलेल्या निष्क्रीयतेवरुन संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र ठरत आहेत. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यांना बचावाची एक संधी देण्याच्या दृष्टीने आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा, या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३०.०७.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन अधिनियमातील कलम १९(६) चा तर भंग केला व त्याचबरोबर त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव देखील स्पष्ट केला असल्याचे दिसून येत आहे. सबब सचिव, महसूल यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या अशाप्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १९-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ,मिलकॉर्नर बसस्टॅण्डरोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(आर.पी.ए.डी.द्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल),महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८९

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. सुधीर भालचंद्र भातलवंडे, : अपिलार्थी

त्रिमुर्ती भवन, कैलासनगर, उदय पेट्रोल पंपाजवळ,

लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सचिव, दयानंद शिक्षण संस्था, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अध्यक्ष, दयानंद शिक्षण संस्था, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००९ रोजी फेरसादर झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित, संस्था स्थापन झाल्यापासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीतील माहिती एकूण दहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून दयानंद शिक्षण संस्थेने लातूर येथील सर्व्हे नंबर ५५ व ५८ ही जागा खरेदी केल्यासंदर्भातील माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणत्याही सार्वजनिक हितसंबंधाशी संबंधित नसल्याने व संस्थेच्या वैयक्तीक व खाजगी माहितीशी ती संबंधित असल्याने अपिलार्थीस ती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्याकडे दिनांक १२-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीचे अपील दिनांक १८-११-२००८ रोजी फेटाळून लावले व अपिलार्थीस त्यांचा अपील अर्ज संस्थेकडे करण्याचे कळविले. त्याप्रमाणे अपिलार्थीने संस्थेच्या अध्यक्षाकडे दिनांक २८-११-२००८ रोजी प्रथम अपील केले असता संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला आहे. त्यांना संस्थेची जागा हवी असल्याने त्यांनी ही माहिती संस्थेकडे मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कोणत्याही सार्वजनिक हितसंबंधाशी कोणताही संबंध नसल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे देण्याचे नाकारले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या मालकीच्या

सर्व्हे नंबर ५५ च्या संदर्भात एकूण दहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. अपिलार्थीने ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था अधिनियमातील कलम २ (ज) (घ) मधील तरतुदीनुसार ' सार्वजनिक प्राधिकरण ' आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संस्थेच्या वैयक्तीक व खाजगी माहितीशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे ती नाकारली आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमानुसार सदर माहिती उघड करण्यापासून सूट दिली आहे. जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस माहिती नाकारतांना त्यांनी दिलेले कारण हे चुकीचे आहे, कारण मूळात ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण असल्याने या संस्थेशी संबंधित कोणतीही बाब ही वैयक्तीक व खाजगी अशी असू शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) अन्वये जी माहिती उघड करण्यापासून या कायद्याव्दारे सूट देण्यात आली आहे ती माहिती, एखाद्या व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतूक हस्तक्षेप करणारी असली तर ती उघड करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. यामध्ये या संस्थेच्या विचाराधीन माहितीचा कोणत्याही प्रकारे समावेश झालेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः सुसंगत असल्याने आणि संबंधीत संस्था ही अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण असल्याने त्यांना अपिलार्थीस आता ही माहिती द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने अधिनियमातील कलम ७ (६) नुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तीस दिवसांचा कालावधी लागेल असे प्रतिपादन केले आहे, हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधीर भालचंद्र भातलवंडे, त्रिमुर्ती भवन, कैलासनगर, उदय पेट्रोल पंपाजवळ, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, दयानंद शिक्षण संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, दयानंद शिक्षण संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९०

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. बनसोडे माधव भिवाजी, अपिलार्थी

गौतमनगर, मुखेड, तालुका मुखेड,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा),

तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड,

जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थीचे रुपये शंभर इतक्या किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक १३-०५-२००९ रोजीचे शपथपत्र आयोगास सादर करण्यात आले असून या शपथपत्राव्दारे अपिलार्थीने त्यांचे आज रोजी विचाराधीन अपील ते मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थी त्यांचे आयोगाकडे सादर केलेले विचाराधीन अपील ते मागे घेत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक ३९०/२००८, दिनांक १०-०१-२००८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३९०/२००८, दिनांक १०-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बनसोडे माधव भिवाजी, गौतमनगर, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९१

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. बाबुराव लक्ष्मणराव शेळके, अपिलार्थी
मु. डोमेगाव, पो. चिंचखेड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सुनावणीच्या सुरुवातीस त्यांचे दिनांक २०-०५-२००९ रोजी आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली असल्याने यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याने आयोगाकडील त्यांचे विचाराधीन अपील ते आता स्वखुषीने मागे घेत आहेत. त्यामुळे हे अपील रद्द करण्याची विनंती त्यांनी या पत्रामध्ये केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे आज रोजीचे अपील क्रमांक ३९१/२००८ मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती आयोग मान्य करीत असून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ३९१/२००८, दिनांक २५-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबुराव लक्ष्मणराव शेळके, मु. डोमेगाव, पो. चिंचखेड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९३

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपिलार्थी
मु. पो. सताळा (खुर्द) तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा कृषि अधीक्षक कार्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय कृषि सह संचालक, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. विश्वनाथ विठ्ठल सुसने

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी नोंदविलेले केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडील शासनमान्य रेकॉर्डमध्ये नोंदविलेली सत्य माहिती, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविण्याचे

आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी हेतूपुरःस्सर संपूर्ण माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९१-९२ या आर्थिक वर्षातील लातूर जिल्हा फलोत्पादन योजनेसंदर्भात काही माहिती मागितली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज जिल्हा कृषि अधीक्षक कार्यालयाकडे केला होता व या प्रकरणाचे प्रथम अपील विभागीय कृषि सह संचालक यांच्याकडे केले होते. या प्रकरणी तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि अधिकारी हे माहिती अधिकारी आहेत व तालुका कृषि अधिकारी हे अपिलीय अधिकारी आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपिलावर तालुका कृषि अधिकारी, औसा यांनी प्रथम सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास योग्य वाटते.

सबब, तालुका कृषि अधिकारी, औसा यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून

९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील. सुनावणीसाठीचे पत्र अपिलार्थीस किमान सात दिवस आधी प्राप्त होईल याची वैयक्तीक दक्षता तालुका कृषि अधिकारी, औसा यांनी घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तालुका कृषि अधिकारी, औसा यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, १५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक २०-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु. पो. सताळा (खुर्द), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९४

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ सौ. वंदनाताई दुर्गादास हजारे, : अपिलार्थी
रा. खंडोबा गल्ली, प्रशाद गल्ली, जुने भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि कार्यालय, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि कार्यालय, भोकरदन,
जिल्हा जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. एम. टी. कोरडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी कृषि विभागाच्या भोकरदन कार्यालयामध्ये आवश्यक त्या माहितीसाठी योग्य ते रितसर शुल्क भरणा करुनही त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १५-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. एम. टी. कोरडे, कृषि सहायक यांनी केलेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कामांना प्राप्त झालेला निधी, निधी कसा खर्च केला, मजूरांचे हजेरीपट, मजूरांना पेमेंट कुठे वाटप केले व ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७०८० इतके त्यांच्या कार्यालयात डिमांड ड्राफ्टव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०६-२००८ रोजी सुनावणी घेतली व सुनावणीचे कार्यवृत्तांत आपल्या कार्यालयामध्ये वीना कार्यवाही तसेच ठेऊन दिले. या सुनावणीमध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रुपये ७०८० इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा करुन घेऊन अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे तोंडी सूचित केले. अपिलार्थीने झालेल्या निर्णयाप्रमाणे दिनांक २८-०६-२००८ रोजी रुपये ७०८० इतक्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा केला, तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २७-१०-२००८ रोजी पुरविली असून माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने दिलेली पोच त्यांनी आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १५-०५-२००८ रोजी माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७०८० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्राचे अवलोकन केले असता या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या शुल्काचा, अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक असलेला तपशील, दिला नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही या खर्चामध्ये टपालासाठीचा खर्च जन माहिती अधिकारी यांनी दर्शविला आहे. याही उपर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अथवा अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क कळविण्यास अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदतीत दिनांक १४-०६-२००८ रोजी व्यपगत होत असतांना त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०६-२००८ रोजी शुल्क भरण्याचे पत्र पाठविले. मूळात जन माहिती अधिकारी यांनी घटनाक्रमाच्या या प्रथम टप्प्यावरच अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला असल्याने अपिलार्थीस ही माहिती त्यांनी विनामूल्य देणे भाग होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी देखील या मुद्दयाचा कोणताही विचार न करता अपिलार्थीस शुल्क भरण्याचे त्यांच्याकडील दिनांक २७-०६-२००८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २८-०७-२००८ रोजी पैसे भरले. अपिलार्थीस शुल्काचा भरणा करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेले पत्र व अपिलार्थीने प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेल्या शुल्काच्या दिनांकामधील फरक पाहता, अपिलार्थीस ही माहिती तत्पूर्वीच देय होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर तात्काळ माहिती देणे त्यांना भाग होते, तथापि या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी

त्यांना माहिती देण्याकरिता तीन महिन्याचा विलंब लावला आहे. सबब जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १७-०६-२००८ रोजीच्या पत्राची अवैधता व अपिलार्थीने शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यासाठी लावलेला विलंब पाहता या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय ठरत आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कालबाह्य प्रथम प्रतिसादाची अवैधता व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब पाहता या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ७०८० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र या प्रकरणी अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी शुल्क भरुनही माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबामुळे व त्याव्दारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे ते अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब आयुक्त (कृषि) पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ७०८० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

३. आयुक्त (कृषि) पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. वंदनाताई दुर्गादास हजारे, रा. खंडोबा गल्ली, प्रशाद गल्ली, जुने भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ३९५/०८ व ३९६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९५ व ३९६

निर्णय दिनांक  २०-०५-२००९

१ श्री. सोरे रामकृष्ण प्रकाशराव व : अपिलार्थी
श्री. मगर माधव रामकिसन
व्दारा, अनिल शिवशंकर स्वामी,
प्लॉ. नं. ए-२५, नेहरुनगर, अकोला रोड, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - १

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी वरील दोन अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००७ रोजी फेरसादर झालेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या दोनही अपील अर्जामध्ये त्यांनी विचाराधीन अपीले जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या दोनही अपील अर्जांसंदर्भात दोनही अपिलार्थींनी एकाच दिवशी एकाच प्रकारच्या माहितीसाठीचे दोन स्वतंत्र अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केले होते. या अर्जासंदर्भात दोनही अपिलार्थींनी एकाच दिवशी जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे दोन स्वतंत्र प्रथम व व्दितीय अपिले दाखल केली असल्याने दोनही अपिलांची आज रोजी एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थी श्री. रामकृष्ण प्रकाशराव सोरे व श्री. मगर माधव रामकिसन यांनी त्यांच्या दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या स्वतंत्र मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे डी. एड पदविका परीक्षा क्रमांक ४५५९१०४७ यांच्या आधुनिक भारतीय शिक्षण, विज्ञान, इतिहास नागरिकशास्त्र व प्रशासन व शारीरिक शिक्षण या विषयावर दिलेल्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रतीची मागणी केली होती व दुसरे अपिलार्थी श्री. मगर माधव रामकिसन यांनी डी. एड पदविका परीक्षा क्रमांक ४५५९१०२८ यांच्या आधुनिक भारतीय शिक्षण, विज्ञान, शारीरिक शिक्षण व तृतीय भाषा अशा प्रकारच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. दोनही अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन दोनही अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. माहिती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने उत्तरपत्रिकांची झेरॉक्स प्रत कोणी मागितल्यास ती देऊ नये, या घेतलेल्या निर्णयाचा आधार घेऊन अपिलार्थींना माहिती नाकारली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने दोनही अपिलार्थींनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. अपिलार्थींच्या या दोनही अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००७ रोजी, अपिलार्थीची उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती देण्याची विनंती मान्य करता येत नसल्याने अपिलार्थीची दोनही प्रथम अपिले निकाली काढली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या

निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थींनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी प्रथमतः, केंद्रीय माहिती आयोगाने अशा प्रकारच्या प्रकरणासंदर्भात दिलेल्या निर्णयाचा हवाला व परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीने घेतलेल्या निर्णयाच्या आधारे, अपिलार्थीस उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याचे नाकारले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांच्याकडे दरवर्षी सरासरी २१ लाख मुलांच्या परीक्षा घेण्याचे काम सोपविले जाते. शिष्यवृत्ती परीक्षेबरोबरच राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा व राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेश परीक्षा, अध्यापक पदविका परीक्षा इत्यादी आठ स्वरुपाच्या परीक्षा घेण्याचे काम त्यांच्याकडे सोपविले आहे. या सर्व परीक्षा विचारात घेता दरवर्षी साधारणतः त्यांच्या कार्यालयातर्फे ३० लाख विद्यार्थ्यांच्या १८ परीक्षा घेतल्या जातात. या संदर्भात त्यांच्याकडून असाही युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यक्षेत्राची अशी प्रचंड व्याप्ती पाहता जर त्यांच्याकडून अशा प्रकारची माहिती उघड करावयाचे ठरविले तर त्यांच्याकडील सर्व पायाभूत सुविधा कोलमडून पडणार आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यायी व्यवस्था यासंदर्भात करावी लागेल व एवढेच नव्हे तर परीक्षा परिषदेच्या कार्यपध्दतीच्या विश्वासार्हतेलाच धक्का पोहोचेल व परिणामी पुढील परीक्षेच्या पूर्ण नियोजनामध्ये अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, विचाराधीन दोनही अपील प्रकरणी अपिलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन वेगवेगळ्या अर्जांव्दारे त्यांच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रतीची मागणी केली आहे. परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती न देण्याचा निर्णय राज्य माहिती आयोग व केंद्रीय माहिती आयोग यांनी वेळोवेळी घेतलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली परिस्थिती पाहता त्यांच्या युक्तिवादाशी

आयोग सहमत आहे. त्यामुळे विचाराधीन प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तरपत्रिकांच्या प्रती न देण्याचा घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. त्यामुळे अपिलार्थींना आता या प्रकरणी कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही हे पाहता अपिलार्थींची विचाराधीन अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक ३९५/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ३९६/२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सोरे रामकृष्ण प्रकाशराव, व्दारा, अनिल शिवशंकर स्वामी, प्लॉ. नं. ए-२५, नेहरुनगर, अकोला रोड, हिंगोली, जिल्हा हिंगोली.

२ श्री. मगर माधव रामकिसन, व्दारा, अनिल शिवशंकर स्वामी, प्लॉ. नं. ए-२५, नेहरुनगर, अकोला रोड, हिंगोली, जिल्हा हिंगोली.

३ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - १ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९७

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. अमोल शिवाजीराव आजबे, : अपिलार्थी
मु. पो. शिराळ, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य परीक्षा
परिषद, पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - १

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या पुणे येथील कार्यालयात दिनांक २४-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी नोव्हेंबर २००६ साली डी. एड. या पदविकेसाठी व्दितीय वर्षाच्या दिलेल्या इंग्रजी या विषयाच्या पेपरमधील प्रत्येक प्रश्नाच्या मार्कांची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन

माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गोपनीय असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीस माहिती उपलब्ध करण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्या भूमिकेशी सहमती दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी अंतिमतः आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची व त्यांना या प्रकरणी झालेल्या त्रासाबद्दल त्यांना ५००० रुपये इतकी नुकसानभरपाई मंजूर करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केला असून या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाची अपिलार्थीस सुनावणी नोटीस न पाठविता अथवा त्यांना कोणतीही माहिती न देता जन माहिती अधिकारी यांच्याशी हातमिळवणी करुन एकतर्फी निकाल दिला आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी मागणी केलेली माहिती गोपनीय नाही व या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कार्यवाही करुन त्यांना शास्ती लावावी. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांचे आयुष्य खराब झाले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती डी. एड. या पदविकेच्या नोव्हेंबर २००६ मध्ये त्यांच्या कार्यालयाने घेतलेल्या परीक्षेच्या संदर्भातील आहे. या परीक्षेचा निकाल त्यांनी दिनांक १५-०२-२००७ रोजी जाहीर केला. निकाल जाहीर केल्यानंतर १५ दिवस इतकी गुण पडताळणीची मुदत संपल्यानंतर, गुण पडताळणीसाठी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांवर निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या कार्यालयातर्फे १५ दिवस उत्तरपत्रिका ठेऊन घेऊन नंतर परीक्षा परिषदेच्या अध्यक्षाच्या सहमतीने त्या उत्तरपत्रिका तात्काळ निर्लेखित करण्यात येतात. अपिलार्थीने ज्या परीक्षेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती त्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका त्यांनी परिषदेच्या ठराव क्रमांक ३८६, दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या आदेशाव्दारे दिनांक १७-०५-२००७ रोजी निर्लेखित केल्या आहेत. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दिनांक ०४-१०-२००७ रोजी म्हणजेच त्यांच्या उत्तरपत्रिका निर्लेखित केल्यानंतर केला असल्याने अपिलार्थीस ते माहिती देऊ शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठीचा अर्ज, मूळात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून निर्लेखित केल्यानंतर विलंबाने केला असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही हे उघड आहे. या प्रकरणी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविल्याचे अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे अथवा दुष्ट हेतूने माहिती नष्ट केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची केलेली मागणी आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

१.	अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२०-०५-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. अमोल शिवाजीराव आजबे, मु. पो. शिराळ, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२	जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - १ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९८

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ",
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जिल्हा परिषद, नांदेड पाणीपुरवठा विभागामध्ये लोक सहभागातून झालेल्या व चालू असलेल्या नळयोजनांची व टंचाईग्रस्त गावांची माहिती मागितली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ या कालावधीतील नांदेड जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांची यादी, नवीन केलेल्या विंधन विहिरीची माहिती, दलीत वस्ती, पाणीपुरवठा योजनेच्या नावागावाची माहिती, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचे अपील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, जिल्हा परिषद हे अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडील दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा जिल्हा परिषद यांच्याकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविले, मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास व अपील अर्जास कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस दिनांक २८-१२-२००७ रोजी त्यांनी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी आयोगासमोर आवश्यक तो पुरावा सादर केला आहे.

यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये सर्व योजनांची नांवा गावासह संपूर्ण माहिती तात्काळ देणे अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये टंचाईग्रस्त गावांची यादी व नळयोजनांची नांवे या व्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती कोणत्याही निश्चित स्वरुपाची अशी नव्हती. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक २८-१२-२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ती सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात महिन्याच्या विलंबाने दिली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत असल्याचे दिसून येते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व विलंबाने माहिती पुरवून दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २०-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७०४

निर्णय दिनांक २०-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. सुलक्षणा सुर्यकांत अडसूळे,<br>शाहू चौक, सौख्यगंगा, ज्ञानेश्वर हॉस्पिटलच्या<br>बाजूला, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,<br>नगरपरिषद प्रशासन, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. मधुकर बजरंग टेकाळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी नोंदविलेले (दिनांक १८-०२-२००८ रोजी फेरसादर झालेले) व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना अद्याप अप्राप्त आहे. त्यांनी या अर्जामध्ये

आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांचे अपील मान्य करुन संबंधितांना माहिती पुरविण्यासाठी आदेशित करावे व विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने कसूरीबाबत नियमातील तरतुदीप्रमाणे संबंधितांवर कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९९ - २००० या कालावधीतील गांधी मार्केट दुकान वाटपाची यादी, दुकान नंबरची १५३ ची संचिका व कागदपत्रांची प्रत अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील या निर्णयाव्दारे मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्याचे सूचित केले. मात्र या नंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही आवश्यक ती माहिती अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २६-१२-२००६ रोजी कथित माहिती पाठविली होती, तथापि कागदपत्राच्या प्रती पुसट व वाचण्यायोग्य नसल्याने त्यांनी दिनांक २६-१२-२००६ रोजी ही माहिती जन माहिती अधिकारी यांना परत केली.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता जन माहिती अधिकारी, आयोगाने दूरध्वनीव्दारे दिनांक १८-०५-२००९ रोजी नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालयातील श्री. मानवतकर यांच्यामार्फत सूचित करुनही ते सुनावणीस अनुपस्थित आहेत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती त्यांना दिनांक १५-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी देणे अथवा ही माहिती देण्यासंदर्भात अपिलार्थीस सूचित करणे अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना अनिवार्य होते तथापि त्यांनी त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-११-२००६ रोजी प्रथम अपिलाची अंतीम सुनावणी होईपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता यामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील " कागदपत्राची प्रत " ही माहिती अपिलार्थीने मोघम स्वरुपात विचारलेली आहे. मात्र अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील गांधी मार्केटमधील दुकान वाटप यादी व दुकान क्रमांक १५३ च्या संचिकेच्या सर्व कागदपत्राच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहेत. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत आता व्यपगत झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, कागदपत्राची प्रत वगळता, उर्वरित दुकान वाटप यादी व दुकान नंबर १५३ च्या संचिकेतील याबाबतच्या झेराक्स प्रती ही माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता देण्यात येणारी माहिती ही स्पष्ट व वाचण्यायोग्य असेल याची दक्षता घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे व आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी पात्र ठरविले आहे. सबब संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना संबंधीत जन माहिती

अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना विनामूल्य, स्पष्ट व वाचनीय स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुलक्षणा सुर्यकांत अडसूळे, शाहू चौक, सौख्यगंगा, ज्ञानेश्वर हॉस्पिटलच्या बाजूला, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७०५

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. देशमुख अरुणकुमार लक्ष्मिकांतराव, : अपिलार्थी
व्दारा, ' श्री ' सर्व्हिसिंग सेंटर, ' शिवसदन, '
दत्तनगर रोड, टाऊन मार्केट एरिया, अण्णाभाऊ साठे
चौक, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १८-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे विचारणा केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही दिली

नाही, त्यांनी या माहितीसंदर्भात दिनांक ०७-०६-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही त्यांना अद्यापपावेतो माहिती अप्राप्त आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००६ रोजी घेण्यात आलेल्या विभागीय निवड मंडळामधील क्षयरोगशास्त्र अधिव्याख्याता या पदाच्या नियुक्तीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - क्षयरोगशास्त्र अधिव्याख्याता हे पद एक वर्ष आरक्षित ठेवून नंतर खुल्या प्रवर्गासाठी दोन महिने देण्यात आले व परत आरक्षित प्रवर्गास ते का देण्यात आले, दिनांक २९-०६-२००६ रोजी या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवाराने कोर्टात शासनविरोधी केस दाखल केली असतांना या उमेदवारास नियमबाह्य नियुक्ती देण्यात आली आहे काय ? यासंदर्भात शासनास व विभाग प्रमुखास विचारले होते काय, या निवड प्रक्रियेमध्ये महिला आरक्षण राबविण्यात आले होते का ? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी सर्व माहिती पुरविली असून अपिलार्थीने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना दिनांक ०४-०८-२००७ रोजी त्यांना माहिती मिळाल्यापृष्ठ्यर्थ लेखी कबूली दिली असून, या पत्रामध्ये त्यांनी त्यांचे दिनांक ०३-०४-२००७ व ०७-०६-२००७ रोजीचे अर्ज रद्द समजण्याची विनंती अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय यांना केलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या अधिनियमामध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे इतकीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अथवा स्पष्टीकरणे विचारणे किंवा त्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबाबत अर्जदाराने त्यांना कारणे विचारणे व त्यांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी देणे अशा प्रकारची प्रक्रिया मूळात माहिती अधिकार अधिनियमाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही, त्यामुळे मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेला अपिलार्थीचा माहितीचा मूळ अर्ज हा अवैध ठरत असल्याचे सिध्द होत आहे, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देय होत नव्हती तर त्यांनी तसे, अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांना कळविणे, जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी केली नाही. तदनंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीने अधिष्ठातांना दिनांक ०४-०८-२००७ रोजी त्यांचा दिनांक ०७-०६-२००७ रोजीचा अपील अर्ज रद्द समजावा अशी विनंती केली आहे. या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. तथापि या प्रकरणी एक बाब प्रकर्षाने अशी जाणवते की, जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांनी जर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देय होत नाही हे विहित मुदतीत कळविले असते तर अपिलार्थीस प्रथम व व्दितीय अपील करण्याची गरज पडली नसती. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्याबद्दल आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख अरुणकुमार लक्ष्मिकांतराव, व्दारा, ' श्री ' सर्व्हिसिंग सेंटर, ' शिवसदन, ' दत्तनगर रोड, टाऊन मार्केट एरिया, अण्णाभाऊ साठे चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९२

निर्णय दिनांक २०-०५-२००९

१ श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, : अपिलार्थी
रा. पो. कुपटी (मा.) तालुका माहूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
त्रयस्थ पक्ष : श्री. कुरमे सर्जेराव नारायण

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, त्यांनी सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न दिल्याने व्यथित होऊन केल्याचे म्हटले आहे व त्यांनी या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक ०२-०७-२००७ रोजी श्री. कुरमे सर्जेराव नारायण या नावाने कुणबी जातीच्या नावाने निर्गमित करण्यात आलेल्या जातीच्या

प्रमाणपत्राची संचिका व यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या मूळ कागदपत्रांच्या प्रतीच्या माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. कुरमे सर्जेराव नारायण यांच्या नावाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांना देण्यात आलेल्या कुणबी जातीच्या प्रमाणपत्रासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्रमाणपत्र संचिका, कागदपत्रे व दिनांक ०२-०७-२००४ रोजीच्या त्रयस्थ पक्षास दिलेल्या कुणबी जातीच्या प्रमाणपत्राची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे अपर जिल्हाधिकारी, नांदेड हे आहेत, मात्र त्यांनी या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अथवा या विषयाशी संबंधात नेमल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय

पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपर जिल्हाधिकारी, नांदेड अथवा या विषयाशी संबंधात नेमल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, रा. पो. कुपटी (मा.) तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना, अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०४
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ श्री. देवेंद्र कलप्पा नागोबा, : अपिलार्थी
रा.मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुरुम,ता.उमरगा,
जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.१७.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पेन्शन ऑर्डर चुकीची दिल्याने, त्यांना या संदर्भात कमी रोखे प्राप्त होत आहेत व त्यांच्या पेन्शनवर जन माहिती अधिकारी यांनी टाच आणली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, त्यांची पेन्शन ऑर्डर चुकीची आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पेन्शन ऑर्डरसंदर्भात, -"पेन्शनबाबत" -ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस पेन्शन ऑर्डरची प्रत दिली, तथापि ही पेन्शन ऑर्डर चुकीची असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली पेन्शन ऑर्डर चुकीची आहे, असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि.२१.०९.२००७ रोजी पुरविण्यात आली, असा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली अपिलार्थीच्या पेन्शनच्या आदेशाची प्रत विहित मुदतीत दिली आहे. तथापि अपिलार्थीस सदर पेन्शन आदेश चुकीचा असल्याचे वाटत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीद्वारे हे आदेश दुरुस्त करुन देण्याची अपिलार्थी मागणी करीत आहेत. पेन्शन आदेशामध्ये दुरुस्ती करुन देणे, ही बाब प्रशासकीय स्वरुपाची असून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये कोणत्याही प्रशासकीय आदेशामध्ये अपिलार्थीने अपेक्षिल्याप्रमाणे बदल करण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नसल्याने अपिलार्थीच्या या विनंतीवर विचार करण्याचे आयोगास कोणतेही प्रयोजन आढळून येत नाही. यासाठी अपिलार्थीने त्यांच्या विभागातील वरिष्ठ प्रशासकीय प्राधिकरणाकडे स्वतंत्रपणे आपले गाऱ्हाणे मांडून न्याय मिळवावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देवेंद्र कलप्पा नागोबा,रा. नारळी मठ,मुरुम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुरुम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०७
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ श्री. अरुण रंगनाथ धोकटे, : अपिलार्थी
रा.बाबरगाव ता.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,गंगापूर जि.औरंगाबाद
तत्कालीन जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : श्री. आर.एच.हराळ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी त्यांच्या वकीलासह, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती अधिकाऱ्याने त्यांना माहिती दिली नाही. त्यांना दि. १८.०१.२००८ रोजी अंशतः पुरविलेली माहिती ही दिशाभूल करणारी, अर्धवट व चुकीची आहे.जन माहिती अधिकारी माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीसंदर्भात गंभीर नाहीत, त्यामुळे

त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे कारवाई करण्याचे व अपिलार्थीस मोफत व तात्काळ माहिती देण्याचे आणि या प्रकरणी अपिलार्थीस आर्थिक,मानसिक व इतर अनेक प्रकारे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सेवानियमाविषयी व सेवापुस्तिकेविषयी एकूण ९ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस १२ पृष्ठांची माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. १७.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०१.२००८ रोजी आदेश देऊन अपिलार्थीस दि. २१.०१.२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १५.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दि. १७.०१.२००८ रोजी माहिती घेण्यासाठी समक्ष उपस्थित राहून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थी ही माहिती गट विकास अधिकारी यांच्याकडून दि. १८.०१.२००८ रोजी घेऊन गेले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट व चुकीची आहे. त्यांच्या या युक्तिवादापृष्ठयर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती दाखविली. त्यांनी आयोगाच्या, पुढे असेही निदर्शनास आणले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी पत्रव्यवहाराच्या प्रती वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती त्यांना पुरविली नाही. त्यामुळे

अधिनियमातील कलम २० नुसार संबंधितावर कारवाई करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करावे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने सदर माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांच्यामार्फत दि. १८.०१.२००७ रोजी व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ज्या झेरॉक्स प्रतीमध्ये देण्यात आलेली आहे, त्या माहितीमधील काही भाग स्पष्टपणे उमटलेला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या मूळ स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात स्पष्टपणे वाचता येईल अशी, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ ते ९ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहितीची मागणी केली आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने, "जबाबदार असणारे अधिकारी कोण आहेत? विहित केलेला कालावधी किती आहे? दिरंगाईची जबाबदारी कोणाची? नुकसानीस जबाबदार अधिकारी कोण? अर्जदारास कोणत्याही प्रकारची माहिती गट विकास अधिकारी यांनी का दिली नाही? अर्जदार वरिष्ठ वेतनश्रेणी,चट्टोपाध्याय वेतनश्रेणीप्रमाणे लाभासाठी पात्र असताना त्याप्रमाणे वेतननिश्चिती झाली नाही, याचे कारण व कधी कार्यवाही करतील व त्यांची दुसरी सेवापुस्तिका केव्हा अद्ययावत करण्यात येईल", अशा स्वरुपाची जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्या कृतीची कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने या मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमामधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होणारी नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीची मागणी केल्यास, त्यांच्याकडे

मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात त्यांनी अधिनियमातील तरतुदीच्या मर्यादेत कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये मूलतः अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ वगळता, उर्वरित मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. परंतु अपिलार्थीच्या अर्जातील या मुद्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे कळविलेले नाही, हे ही तितकेच खरे आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १, २ व ४ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १, २ व ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथ धोकटे,रा.बाबरगाव पो. पेंडापूर व्हाया वाळूज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद-४३११३३.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०८
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ श्री. भास्कर नारायण लहाने, : अपिलार्थी
रा.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,
जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर तीस दिवसांच्या आत माहिती दिली नाही, त्यांना आवश्यक असलेली माहिती हेतूपुरस्सर व जाणूनबुजून दडवून ठेवली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे दंडात्मक व शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. त्यामुळे सर्व संबंधितांवर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य देण्याचे व तसेच या प्रकरणी त्यांचा झालेला खर्च व त्यांनी सहन केलेला मनस्ताप यांचा विचार करुन नुकसान भरपाई देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील पाणीपुरवठयासंदर्भात, ११ उपमुद्यांसह एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती ही मोठी होती. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०२.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी दिनांक निश्चित करुन त्यांना वेळेमध्ये संपूर्ण माहिती देण्याचे सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २२.०५.२००८ रोजी पाच मुद्यांची माहिती व दि. २७.०५.२००८ रोजी उर्वरित ४ मुद्यांची माहिती मिळाल्याचे मान्य केले. मात्र ही माहिती १६७ दिवसांच्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. २१.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे व नंतर दि. २७.०५.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही प्रचंड व तिचे स्वरुप क्लिष्ट असे आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०१.२००८ रोजी प्रथम अपील केल्यानंतर व त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०२.२००८ रोजी आदेश पारित केल्यानंतर दि. २२.०२.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील आवश्यक असलेल्या माहितीसंदर्भात अभिलेखे पाहण्यासाठी,त्यांच्या कार्यालयात दि. २८.०२.२००८ रोजी उपस्थित राहण्याचे सूचित केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज

त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशाप्रकारचा कोणताही प्रतिसाद या प्रकरणी विहित मुदतीत न देता तो जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०२.२००८ रोजी निर्णय पारित केल्यानंतर दिला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नाकारण्याचा व नाकारण्याची कारणे देण्याचा जन माहिती अधिकारी यांना अधिकार देखील आहे. परंतु अशाप्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी वेळीच केली नसल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल संचालक, नगरपालिका प्रशासन यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये मागणी केलेल्या नुकसान भरपाईसंदर्भात कोणताही तपशील आयोगाकडे सादर न केल्याने या मुद्यावर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संचालक, नगरपालिका प्रशासन,मुंबई यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर नारायण लहाने,भाग्यनगर, नांदेडरोड,अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, अहमदपूर,जि.लातूर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपालिका प्रशासन विभाग,नगरपरिषद संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत,तिसरा मजला,सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी,मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०९
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ श्री. पटेल जावेद गौसमियॅा, : अपिलार्थी
रा. जलाल शाही चौक, औसा,
ता.औसा,जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा,
जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे चालू असलेल्या सुवर्ण जयंती रो.ह.योजनेसंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १९१/-इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित कले. तथापि या शुल्काचा भरणा

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १४.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०२.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून या प्रकरणी अपिलार्थीने माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा न केल्याने ते अपिलार्थीस ती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे दिसून येते.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१३.१२.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१९१/- इतके, त्यांनी त्यांच्याकडील दि.०९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन कळविले होते. सदर पत्र अपिलार्थीच्या वडिलांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे व्यक्तिशः दिले गेले असल्याच्या संदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या वडिलांची पोचसही असलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली.तथापि या शुल्काचा जो तपशील अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे त्यांनी अपिलार्थीस कळविणे त्यांना अनिवार्य होते, तो तपशील त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस कळविला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र तथ्यहीन ठरत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ७ दिवसांच्या आत देण्याची आयोगासमोर तयारी दर्शविली आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्हेतूने माहिती दडवून ठेवल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल जावेद गौसमियॉ, रा.जलाल शाही चौक,औसा ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१०
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ सौ. सुलक्षणा सूर्यकांत अडसुळे, लातूर : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर, जि.लातूर. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही.ती माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुन त्यांचे अपील मंजूर करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०२.२००८ (जो जन माहिती अधिकारी यांना दि.२५.०२.२००८ रोजी प्राप्त झाला.) रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,- "नगर परिषद सर्वसाधारण सभा दि. १५.०९.२००५ रोजी ठराव क्र. १६ प्रमाणे गांधी मैदान येथील राहिलेल्या लाभार्थ्यांना शॉपींग कॉम्प्लेक्स (१११ व ११२ साईट) मध्ये पुनर्वसन करणे बाकी

असलेल्या लाभार्थ्यांची यादी" -ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, "संदर्भिय ठरावाद्वारे गांधी मैदान येथील सा.क्र.१११ व ११२ मधील राहिलेल्या लाभार्थींना गाळे देण्यासाठी समिती गठीत करण्याचे अधिकार अध्यक्ष महोदय यांना देण्यात आले होते. तथापि ही समिती गठीत न झाल्याने निर्णय अद्यापी प्रलंबित आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना गांधी मैदान येथील लाभार्थ्यांची यादी देता येणार नाही." जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, लातूर शहरातील गांधी मैदान स.नं.१११ व ११२ मधील राहिलेल्या लाभार्थ्यांना गाळे देण्यासाठी समिती गठीत करण्याचे अधिकार अध्यक्षांना दिले होते. तथापि या प्रकरणी समिती गठीत न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. या प्रकरणाशी संबंधित सर्व माहिती अपिलार्थीस त्यांनी वेळोवेळी दुसऱ्या संदर्भाद्वारे पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी टाळलेले नाही.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना पुरवता येणे शक्य आहे. या प्रकरणी संबंधित शॉपींग कॉम्प्लेक्समधील उर्वरित गाळे वाटपाबाबत जरी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे कोणताही निर्णय

घेतला गेला नसला तरीही जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस शॉपींग कॉम्प्लेक्समधील गाळे वाटपासाठी त्यांच्याकडे अर्ज केलेल्या अर्जदाराची यादी व पहिल्या टप्प्यामध्ये या अर्जदारांपैकी गाळे वाटप केलेल्या लाभार्थ्यांची यादी अपिलार्थीस सहज उपलब्ध करुन देऊ शकले असते. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेगळया अर्जासंदर्भात पुरविली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापि याबाबतचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केला नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, स.नं.१११ व ११२ मधील गाळे मिळण्यासाठी त्यांच्याकडे अर्ज केलेल्या अर्जदारांची यादी व त्यामधून गाळे वाटप झालेल्या लाभार्थ्यांची यादी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी, जेणेकरुन अपिलार्थीस वाटप झालेल्या व न झालेल्या लाभार्थ्यांची माहिती प्राप्त होऊ शकेल.

प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जास कशारितीने माहिती प्राप्त होऊ शकेल, याचा साकल्याने विचार करुन प्राप्त होणाऱ्या अर्जावर येथून पुढे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सकारात्मक कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुलक्षणा सूर्यकांत अडसुळे,मेघराज नगर, शाहू चौक,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४११
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ श्री. अर्जुन नागोराव सावंत, : अपिलार्थी
रा.कुप्पा, ता.वडवणी, जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
राजेसाहेब विद्यालय,कुप्पा,
ता.वडवणी,जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
राजेसाहेब शिक्षण प्रसारक मंडळ, कुप्पा,
ता.वडवणी,जि.बीड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०५.१२.२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कोणतीही माहिती दिली नाही, त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कायद्याप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात यावी व माहिती विनामूल्य देण्याचे आदेश संबंधितांना देण्यात यावेत, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या शिक्षण संस्थेसंदर्भात सन २००४-२००७ या कालावधीतील काही

माहिती मागितली होती. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीनेअधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस पूर्णपणे माहिती त्यांच्याकडील सुनावणीपूर्वीच दिल्याचे त्यांना आढळल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्यांना सदर सुनावणीसंबंधी आयोगाच्या कार्यालयातर्फे दि.११.०५.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे सूचित करुनही ते अनुपस्थित आहेत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ०५.१२.२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नव्हता, त्यामुळे ते अपिलार्थीस कोणतीही माहिती देऊ शकले नाहीत. मात्र तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, आवश्यक ते शुल्क अपिलार्थीकडून स्वीकारुन, पूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचे कोणतेही अभिप्राय नोंदविलेले नाहीत.

या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अर्जुन नागोराव सावंत,रा.कुप्पा, ता.वडवणी, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,राजेसाहेब विद्यालय,कुप्पा, ता.वडवणी,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,राजेसाहेब शिक्षण प्रसारक संस्था,कुप्पा,ता. वडवणी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१२
निर्णय दिनांक २१-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,<br>रा.पदमपूरा,औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,<br>औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी व अपिलार्थीस त्यांनी वेळीच माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांनी दि. २०.१२.२००८ रोजी पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीचे माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ पोचसही असलेले दि.२०.१२.२००८ रोजीचे पत्र आयोगास दाखविले. यावरुन असे दिसून येते की, या प्रकरणाशी संबंधित सर्व माहिती अपिलार्थीस आता प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाची कारणे स्पष्ट करताना जन माहिती

अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे पदमपूरा या संपूर्ण गावाचा नकाशा मागितला होता. तथापि त्यांच्याकडे तो तयार नसल्याने त्यांनी हा नकाशा नव्याने, जुन्या अभिलेख्यांच्या आधारे तयार केला असून सदर नकाशा अपिलार्थीस आता दिला आहे. जुने अभिलेखे शोधून, ते अभिलेखे एकत्र करुन नकाशा तयार करणे, ही प्रक्रिया वेळखाऊ असल्यामुळे त्यांना अपिलार्थीने मागणी केलेला नकाशा तयार करण्यासाठी वेळ लागला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीतील तथ्यांश पाहता, जन माहिती अधिकारी यांची कार्यवाही व अपिलार्थी यांची आयोगासमोरील आजची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीची या प्रकरणी काही तक्रार राहिली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.४१२/०८, दि. ०४.०२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,५-११-२० पदमपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१३
निर्णय दिनांक २१-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. महेश हिरालाल शिंदे,<br>रा.झाल्टा,ता.जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्ष : श्री. अरविंद ऐदानमल जैन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, तत्कालीन व विद्यमान अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्षाचे वकील उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती विशिष्ट व्यक्तींशी हितसंबंध ठेवून व हेतुपूरस्सर,दुष्ट हेतूने माहिती दिली नाही व उपविभागीय अधिकारी यांनी दि. ०४.०२.२००८ रोजी दिलेल्या आदेशानंतरही आवश्यक ती माहिती जाणूनबुजून अपिलार्थीस पुरविली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात श्री. अरविंद ऐदानमल जैन यांनी गट नं.७६, सजा झाल्टाच्या संदर्भात दि. ०१.११.२००७ रोजी दिलेल्या अर्जाच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत

माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१७.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी हेतूतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली नाही एवढेच नव्हे तर ते वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता त्यांना माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी टाळले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः माहिती देऊ केली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. संबंधित माहिती स्वीकारण्यास नकार दिल्याप्रित्यर्थ त्यांनी पंचनामा केला आहे. याही उपर त्यांनी अपिलार्थीस ही माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे दि. २९.०२.२००८ रोजी पाठविली आहे, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसून येते. तथापि ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ही माहिती उघड करताना त्रयस्थ पक्षाचे अभिप्राय जाणून घेणे आवश्यक नव्हते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद परस्परविरोधी आहे. हे पाहता, आयोगाने आज सुनावणीच्या वेळी आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अपिलार्थीने ही माहिती साक्षांकित नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले. यावर

आयोगाने जन माहिती अधिकारी यांना ही माहिती साक्षांकित करुन देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी हे मान्य केले.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महेश हिरालाल शिंदे, रा. हॉटेल गुरुसाया,गट नं.७६, झाल्टा फाटा, झाल्टा ता. जि. औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१४
निर्णय दिनांक २१-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गोपाल सुकराज नगरकर,<br>रा.परदेशीपुरा,पैठण,जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, पैठण जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ७ दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणतीही माहिती न दिल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती आकारावी व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील झोन क्र.३ व ४ शी संबंधित नळपट्टी,घरपट्टी आणि शिवाजी बालोद्यानची सन २००३ ते २००५ पर्यंतच्या कालावधीतील माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती संकलीत करण्याची कार्यवाही त्यांच्या कार्यालयात चालू असल्याचे व या कार्यवाहीस अवधी लागणार असल्याने अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करण्याचे सूचित केले. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांना सदर सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत आयोगाच्या कार्यालयातून दि.११.०५.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच विभागीय आयुक्त कार्यालयातील श्री. मानवतकर,लिपीक यांच्यामार्फत दि.१८.०५.२००९ रोजी ठीक ०४.१० वा. दूरध्वनीद्वारे सूचना देऊनही ते आज सुनावणीस उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती देण्यासाठी काही अवधी लागणार व ही माहिती त्यांच्या कार्यालयात संकलीत करण्याची कार्यवाही चालू असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता, ही माहिती संकलीत करण्यासाठी दि.१६.११.२००७ ते दि. ०१.०२.२००८ इतका कालावधी लागणे, हे संभवत नाही. अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांना मनापासून माहिती देण्याची इच्छा असती तर त्यांनी या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना पुरविण्यात येणाऱ्या

माहितीचे किमान शुल्क तरी संपूर्ण तपशीलासह कळविले असते. परंतु तीही कार्यवाही त्यांनी केली नाही.

आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झाली आहे किंवा कसे हे , अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याचे अनुमान काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्यासाठी अपिलार्थीस अवधी लागेल, असे नमूद केले आहे. तथापि 'अवधी' याचा अर्थ अनिश्चित कालावधी असा होत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः चुकीचा प्रतिसाद देऊन अपिलार्थीस प्रत्यक्षात माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरवून या प्रकरणी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविल्याचे येथे स्पष्ट होत आहे. सबब संचालक, नगर पालिका प्रशासन यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगर पालिका प्रशासन यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोपाल सुकराज नगरकर,रा.परदेशीपुरा,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपरिषद संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत,३ रा मजला,सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी,मुंबई-३०.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१५
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ श्री. नंदकिशोर किसनलालजी लाहोटी, जालना : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना, जि.जालना : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. दिपक केशवराव पेडगावकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी त्यांच्या वकिलासह, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जाणूनबुजून माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. दिपक केशवराव पेडगावकर यांच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"श्री. दिपक केशवराव पेडगावकर हे केव्हापासून प्रभारी कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत आहे. व कोणत्या आधारे त्यांना सदर पदासाठी प्रभार देण्यात आला किंवा पदोन्नती देण्यात आली. श्री. पेडगावकर यांनी सक्षम अर्हता म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी/पदविका धारण न करता त्यांना प्रभारी कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यभार कोणाच्या आदेशाने व कधी व कोणत्या कायदेशीर आधारे प्रभार देण्यात आला. त्यांची शैक्षणिक पात्रता केवळ दहावी पास व चित्रकला परिक्षा पास असतांना अभियांत्रिकीचे कोणतेही निकषांवर खरे उतरत नाही. करिता योग्य स्पष्ट खुलासा द्यावा" अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीशी संबंधित कालावधी दि. ०८.०८.१९७८ ते ३०.०७.२००७ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, "त्रयस्थ पक्ष यांना सन १९८५-८६ पासून आजपर्यंत आवश्यकतेनुसार कनिष्ठ अभियंता या पदावर नगररचनाकार यांचे मार्गदर्शनाखाली काम करण्याचे आदेशित केले आहे." व या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षास पदभार स्वीकारण्याबद्दल वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.१०.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व या आदेशाद्वारे अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत वाचनीय प्रती पुरविण्याचे व तसेच त्रयस्थ पक्षास कनिष्ठ अभियंता म्हणून पदभार कोणत्या नियमान्वये दिला व ते कनिष्ठ अभियंता पदासाठी पात्र आहेत काय, यासंदर्भात विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे वतीने त्यांचे वकील श्री.सागर रमेश दरख यांनी आयोगासमोर युक्तिवाद केला. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्रयस्थ पक्ष आवश्यक ती किमान शैक्षणिक पात्रता धारण करीत नाहीत, तरीही त्यांना जालना नगरपरिषदेने कनिष्ठ अभियंता या पदाचा कार्यभार दिला. संबंधित त्रयस्थ पक्षाने दिलेल्या चुकीच्या तांत्रिक

निर्णयाने त्यांच्या घराचे अपरिमित असे नुकसान झाले आहे. त्यामुळे नगरपालिकेवर न्यायालयात लढण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २१.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे संपूर्ण माहिती दिली आहे व परत जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि याबाबतचा कोणताही सबळ पुरावा त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्ष श्री. दिपक केशवराव पेडगावकर हे केव्हापासून प्रभारी कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत आहेत व कोणत्या आधारे त्यांना सदर पदासाठी पदभार देण्यात आला किंवा पदोन्नती देण्यात आली, या मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.या अर्जातील उर्वरित मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून, "स्पष्ट खुलासा" अपेक्षित केला आहे. अशाप्रकारचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे हे मूळात माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीस या प्रकरणी देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित अभिलेख्यांतील कार्यालयीन टिपणीवर उपलब्ध असणे शक्य आहे. या कार्यालयीन टिपणीची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्यास त्यांना या टिपणीच्या आधारे श्री. पेडगावकर यांना कोणत्या कागदपत्रांच्या आधारे पदोन्नती देण्यात आली अथवा अतिरिक्त पदभार प्रदान करण्याचे आदेश देण्यात आले, हे अवगत होऊ शकेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, नगर पालिका,जालना येथील श्री. दिपक केशव पेडगावकर यांना दि. ०८.०८.१९७८ ते ३०.०७.२००७ या कालावधीमध्ये कोणत्या कागदपत्रांआधारे कनिष्ठ अभियंता या पदाचा पदभार देण्यात आला किंवा पदोन्नती देण्यात आली यासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कार्यालयीन टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष केव्हापासून प्रभारी कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत आहे, या संदर्भात मागणी केलेली आवश्यक ती माहिती दि. २१.०८.२००७ रोजी, नगर पालिकेच्या संबंधित आदेशाच्या प्रती पुरवून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस माहिती देताना ही माहिती दि. ०८.०८.७८ ते ३०.०७.२००७ या कालावधीशी संबंधित असेल, याची दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, नगर पालिका,जालना येथील श्री. दिपक केशव पेडगावकर यांना दि. ०८.०८.७८ ते ३०.०७.२००७ या कालावधीमध्ये कोणत्या कागदपत्रांआधारे कनिष्ठ अभियंता या पदाचा पदभार देण्यात आला किंवा पदोन्नती देण्यात आली यासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कार्यालयीन टिपणीच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नंदकिशोर किसनलालजी लाहोटी,रा.चरवाईपुरा, जालना,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७०६
निर्णय दिनांक  २१-०५-२००९

१ सौ. कोमल एस.विटेकर, : अपिलार्थी
रा.सिडको, वाळुज महानगर, जि. औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी
कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०६.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील सुनावणीमध्ये निर्णय न दिल्याने त्या हे अपील आयोगाकडे दाखल करीत आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ९ गावांमध्ये झालेल्या कामावरील सर्व मजूरांच्या रोजगार पत्रिका, फोटोसहित लॅमिनेटेड (जॉब कार्ड),ओळखपत्रांचा क्रमांक, पोस्ट/बॅंक खाते क्रमांक, तसेच राष्ट्रीयकृत बॅंकेचे नाव,ठिकाण व मजूरांची नावे लिहिलेले हजेरीपट आणि मोजमापपुस्तिकेच्या प्रती - याची दि. ०१.०४.२००६ ते

२०.०२.२००७ पर्यंतच्या कालावधीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः व रजिस्टर्ड टपालाद्वारे, अशा दोन्ही पर्यायाने आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येऊन आवश्यक त्या अभिलेख्यांची पहाणी करण्याची व या अभिलेख्यामधील आवश्यक असलेल्या पृष्ठांच्या झेरॉक्स प्रतीसाठी प्रतिपृष्ठ रुपये दोनप्रमाणे रकमेचा चलनाद्वारे भरणा करुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीने स्वीकारण्यास नकार दिल्याने पोस्ट खात्यामार्फत ते जन माहिती अधिकारी यांना परत प्राप्त झाले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी परत अपिलार्थीस त्यांच्या दि. २८.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस अशाप्रकारचे पत्र पाठविले, या पत्राचा अपिलार्थीने स्वीकार केला. मात्र या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३०.०३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी दि. १७.०२.२००७ रोजी सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही करुन प्राप्त करुन घ्यावी, असे कळविले. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०५.२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली. या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही ठोस स्वरुपाचा निर्णय दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या या कथित सुनावणीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करता, या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नसल्याचे दिसून येते. सदर सुनावणी म्हणजे त्यांनी अपिलार्थीबरोबर घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त असल्याचे दिसून येते. या सुनावणीनंतरही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असल्याचे नमूद केले व तसेच जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर रु.२५०००/- शास्ती लावावी, असा युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांचे दि. १७.०२.२००७ रोजीचे पत्र का स्वीकारले नाही, असे आयोगाने विचारले असता, अपिलार्थी यांनी आयोगास असे सांगितले की, या बाबतचे कारण त्यांना आता सांगता येणार नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कथित दि. १७.०२.२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले नाही. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी पोस्टामधील कर्मचाऱ्यांना "मॅनेज" करुन हे पत्र पाठविल्याचा बहाणा केला असावा, असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. १७.०२.२००७ व दि. २८.०२.२००७ रोजी सशुल्क माहिती देऊ केली होती. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्याने ते आजतागायत त्यांना माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०२.२००७ व दि. २८.०२.२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देऊ केली. यापैकी दि. १७.०२.२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीने स्वीकारले नाही व दि. २८.०२.२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीने स्वीकारले. मात्र या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने शुल्क भरण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविली नाही, असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या दि. २८.०२.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीची एकूण अंदाजीत रक्कम कळविलेली नाही. अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे अशाप्रकारचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे तीस दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये अशाप्रकारचा तपशील

दिला नसल्याने जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र अवैध ठरत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस आता विनामूल्य माहिती देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.१७.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर असद्‌हेतूने नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची, जन माहिती अधिकारी यांच्यावर रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्याची विनंती मान्य करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दि.१७.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. कोमल एस.विटेकर,प्लॉट नं.बी-३५/६ साईनगर,सिडको,वाळुज महानगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७०७
निर्णय दिनांक २१-०५-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी
उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
उस्मानाबाद लघुपाटबंधारे विभाग, उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,उस्मानाबाद
लघुपाटबंधारे मंडळ,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०४.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

केले असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००४-२००६ या कालावधीशी संबंधित संपूर्ण रोजगार हमी योजनेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - माहे मार्च, २००४ ते एप्रिल,२००४ या कालावधीमधील धान्य वाटपाची माहिती, जानेवारी २००४ ते जून २००४ आणि ऑक्टोबर २००६ ते डिसेंबर २००६ या कालावधीतील तिमाही पतमर्यादा मागणीपत्राच्या झेरॉक्स प्रती, जानेवारी २००४ ते जून २००४ या कालावधीमधील विविध तालुक्यातून प्राप्त झालेल्या मासिक/पाक्षिक पतमर्यादा मागणीपत्राच्या

झेरॉक्स प्रती, जानेवारी २००३ ते डिसेंबर २००६ या कालावधीतील रोहयोवरील मजूरी वाटपास तीन आठवडे किंवा त्यापेक्षा अधिक विलंब झालेल्या हजेरीपुस्तकांच्या झेरॉक्स प्रती व कार्यालयाच्या संगणकातील संपूर्ण डाटाची सी.डी. - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५४६०/- त्यांना शासकीय कोषागारात चलनाद्वारे भरण्याची कार्यवाही करण्याचे अथवा त्यांच्या कार्यालयात रोखीने भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस विहित कालावधीनंतर प्राप्त झाल्याने अपिलार्थीने शुल्काचा भरणा केला नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०२.२००७ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय यांनी दि. ०८.०३.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस माहितीपोटीचे सुधारित शुल्क कळवून माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे, या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याची कल्पना त्यांनी, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात दि. २५.०१.२००७ रोजी हजर झाले असताना दिली. तथापि अपिलार्थीने त्यांच्या दि. २५.०१.२००७ रोजीच्या पत्राचा स्वीकार न करता जन माहिती अधिकारी यांना सदरचे पत्र पोस्टाने पाठविण्याचे सूचित केले. त्यामुळे त्यांनी दि. २७.०१.२००७ रोजी त्यांचे दि. २५.०१.२००७ रोजीचे पत्र पोस्टाद्वारे पाठवून दिले. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः माहिती अपेक्षिली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील घडामोडी- उदाहरणार्थ माहितीपोटी भरावयाचे शुल्क, त्याचा तपशील, माहिती प्राप्त करुन घेणे अशाप्रकारची प्रक्रिया पूर्ण करण्याचे उत्तरदायित्त्व पूर्णतः अर्जदार यांचे असते. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमणे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २५.०१.२००७ रोजी उपस्थित झाले असता, त्यांनी या शुल्काची कल्पना अपिलार्थीस दिली होती. तथापि अपिलार्थीने या पत्राचा स्वीकार न करता, त्यांनी हे पत्र पोस्टाने पाठवून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. अशा अर्थाचे अभिप्राय त्यांच्या कार्यालयातील प्रथम लिपीकाने या पत्रावर नोंदविलेले आहेत. मात्र या अभिप्रायापृष्ठयर्थ त्यांनी केलेल्या सहीखाली दिनांक लिहिलेला नाही, यावरुन सदर अभिप्राय दि. २५.०१.२००७ रोजीचे नोंदविलेले आहेत किंवा कसे , हे स्पष्ट होत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.०१.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये, त्यांनी माहिती देण्याचा विहित कालावधी दि. २६.०१.२००७ रोजी संपला असल्याने त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार विनामूल्य माहिती देण्याची विनंती केली आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून तिसाव्या दिवशी अपिलार्थीस शुल्काची कल्पना देणारे पत्र पोस्टात टाकले आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उस्मानाबाद पोस्ट ऑफीसची दि. २७.०१.२००७ रोजीची ४२५१ असा क्रमांक असलेली पावती मूळ स्वरुपात सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तिसाव्या दिवशी आवश्यक त्या शुल्काची कल्पना देणारे पत्र दिल्याचे सिध्द होत आहे. 'तीस दिवसांच्या आत', यामध्ये तिसावा दिवसही समाविष्ट आहे व या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्क पोस्टाने कळविले आहे. त्यामुळे

अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीपेक्षा जास्त विलंब लावल्याचे व त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे हे अपिलार्थीचे म्हणणे, आयोग अमान्य करीत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दि. २५.०१.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस जरी एकूण शुल्क कळविले असले तरी या शुल्काचा तपशील, जो अधिनियमातील कलम ७(३)(क) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कळविणे आवश्यक आहे तो तपशील, न कळविल्याने जन माहिती अधिकारी यांचा दि. २५.०१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद अवैध ठरत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील संगणकावरील संपूर्ण डेटा सी.डी.मध्ये देण्यात यावा, अशी विनंती केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीचे स्वरुप मोघम असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. मात्र हा मुद्दा वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विनामूल्य देय होत आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २१-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, रा.माणिकनगर,माणिक चौक,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद लघुपाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,उस्मानाबाद लघुपाटबंधारे मंडळ,पत्र पेटी क्र.२८,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३९९/२००८ व ४००/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३९९ व ४००

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ३९९/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम हायस्कूल,
भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी मदरसे मदिनातुल
उलुम, नांदेड, मार्फत मदिनातुल उलुम उर्दू
हायस्कूल, नांदेड

अपील क्रमांक ४००/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी मदरसे मदिनातुल
उलुम, नांदेड, मार्फत मदिनातुल उलुम उर्दू

हायस्कूल, नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची एकाच संस्थेच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी दाखल केलेली क्रमांक ३९९/२००८ व ४००/२००८ अशी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकाच संस्थेशी संबंधित व दोन वेगवेगळया जन माहिती अधिका-याकडे मागितलेल्या माहितीसंदर्भातील असल्याने व अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकाच दिवशी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली असल्याच्या आणि यासंदर्भात एकाच दिवशी राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केली, या कारणास्तव या दोनही अपिलांची सुनावणी एकत्रितरित्या घेण्यात येत आहे.

**<u>अपील क्रमांक ३९९/२००८</u>**

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित सन १९९५ ते २००६ या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०,००० /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्क जास्त वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००७ रोजी आपला निर्णय पारित केला. या निर्णयामध्ये त्यांनी

असे आदेशित केले आहे की, निर्णयाच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत अर्जदाराने लेखी अर्ज सादर करुन अभिलेख्याचे निरीक्षण करावा आणि त्याच दिवशी जन माहिती अधिका-यांनी नियमाप्रमाणे फी आणि खर्चाचा तपशील तक्रारदार अभिलेख्याचे निरीक्षण करतील त्या दिवशी तुरंत द्यावा आणि शुल्क भरल्याच्या एका आठवड्याच्या आत मागितलेल्या माहितीचे अभिलेख अर्जदारास द्यावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे १०,००० रुपये इतके शुल्क भरण्याचे कळविले. तथापि या शुल्काचा तपशील त्यांनी या पत्रामध्ये दिला नसल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक २३-१२-२००७ रोजीचा निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही आले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रतिसाद दिला असला तरी कलम ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांनी अपिलार्थीस कळविला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असून ती माहिती अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहेत. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्काचा तपशील त्यांच्या दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्राने न कळवून अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना

असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अपील क्रमांक ४००/२००८**

आयोगास या अपीलासंदर्भात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित जिल्हा परिषद शिक्षण विभाग माध्यमिक यांच्याकडून त्यांच्या हायस्कूलला मिळालेल्या वेतनेतर अनुदानासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन १९९५-९६ ते २००७-०८ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २०,००० /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१२-२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना सात दिवसाच्या आत अपिलार्थीस निरीक्षणासाठी सर्व अभिलेखे उपलब्ध करुन देऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती सशुल्क पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना

आदेशित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे प्रतिनिधी व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवाद केला. या युक्तिवादावरुन अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे दिसून येते, तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती, अपिलार्थीने शुल्क न भरल्यामुळे दिली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या प्रतिनिधीने जन अपिलीय अधिकारी यांनी वरील अपिलासंदर्भात दिलेला निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला नसल्याचे सांगितले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने दिनांक ०२-०१-२००८ रोजी पाठविल्याप्रीत्यर्थ पोस्टाची पावती आयोगास दाखविली. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस निर्णय पाठविल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे प्रतिसाद दिला असला तरी कलम ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांनी अपिलार्थीस कळविला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असून ती माहिती अपिलार्थीस देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहेत. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्काचा तपशील त्यांच्या दिनांक १२-०९-२००७ रोजीच्या पत्राने न कळवून अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केल्याने, आता जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे

मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम हायस्कूल, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॅनेजिंग कमेटी मदरसे मदिनातुल उलुम, नांदेड, मार्फत मदिनातुल उलुम उर्दू हायस्कूल, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०१

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सह विक्रीकर आयुक्त कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक विक्रीकर आयुक्त, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक विक्रीकर आयुक्त, व्हॅट ००९, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : विक्रीकर सह आयुक्त, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी सदर अपिलाची सुनावणी दिनांक १८-१२-२००७ रोजी ठेवली व अर्जदार अपिलाच्या सुनावणीस हजर राहिले असता सदर प्रकरण बंद करण्याचा निर्णय दिल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ ऑक्टोबर, २००७ ते १५ नोव्हेंबर, २००७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयांतर्गत नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या चार जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्याकडून अधिकृत फटाके विक्री परवानेधारक ज्यांना जिल्हाधिकारी यांनी शहर व तालुका पातळीवर फटाके विक्री परवाने दिले आहेत त्या परवानेधारकांच्या यादीप्रमाणे विक्रीकर कायद्याप्रमाणे त्यांनी किती परवाने दिले व त्यांच्याकडून किती विक्रीकर वसूल करण्यात आला व परवानाधारकांच्या नावाची यादी याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २९-१२-२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती योग्य असल्याचा निर्वाळा या निर्णयाव्दारे दिला. त्यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनाणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या जिल्ह्यांशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध नसल्याने त्यांना ही माहिती सर्व संबंधित सहायक विक्रीकर आयुक्त यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी लागली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, विक्रीकर भरण्याची मुदत ही प्रकरणनिहाय वेगवेगळी असते. अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी माहितीशी संबंधित नमूद केलेला कालावधी पाहता बरोबर आहे. फटाके विक्री परवाने जिल्हाधिका-यामार्फत संबंधितांना दिले जातात. या सर्वच

फटाके विक्रेत्यांची विक्रीकर खात्याकडे नोंदणी झालेली असतेच असे नाही, त्यांच्याकडे ज्या फटाके विक्रेत्यांनी नोंदणी केली आहे अशा नोंदणीधारकांची यादी व त्यांनी भरलेल्या विक्रीकरापोटीचे शुल्क याची माहिती त्यांनी अपिलार्थीस सर्व संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती दिनांक २१-११-२००७ रोजी दिली आहे. अपिलार्थीपासून त्यांनी कोणतीही माहिती दडवून ठेवलेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे या प्रकरणी अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध असलेली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी संबंधित कालावधीमधील संपूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, व्हॅट ००९, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०२

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सहायक विक्रीकर आयुक्त कार्यालय, परभणी,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक विक्रीकर आयुक्त, परभणी,
जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : प्रातिनिधीक पाच कर्मचारी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी आयोगासमोर अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यापैकी कोणीही हजर नाहीत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००७ रोजी

रजिस्टर्ड पोस्टाने माहितीचा अर्ज पाठवून दिला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीच्या आत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील रजिस्टर्ड पोस्टाने दिनांक २९-०९-२००७ रोजी पाठविले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगास सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील एकूण २२ कर्मचा-यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या व जात पडताळणी प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीची माहिती मागविली होती. तसेच त्यांनी या प्रकरणी सहायक विक्रीकर आयुक्त यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २५-०९-२००७ रोजी प्रथम अपील देखील केले होते. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये जरी त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज हे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे नमूद केले असले तरी यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगास त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेला नाही.

आज रोजी सुनाणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत. आज रोजीच्या अपील क्रमांक ३९९/२००८ व ४००/२००८ च्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित होते, मात्र त्यानंतरच्या या सुनावणीस मात्र ते उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयाने दिनांक ०७-०५-२००९ रोजी लेखी व दिनांक १९-०५-२००९ रोजी दुपारी ०३-३५ वाजता सहायक विक्रीकर आयुक्त कार्यालयातील विक्रीकर निरीक्षक श्री. सईद यांच्यामार्फत निरोप देऊनही ते आज सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, हे पाहता, हे अपील चालविण्यामध्ये अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणासही स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१.	अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२२-०५-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२	जन माहिती अधिकारी, सहायक विक्रीकर आयुक्त कार्यालय, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, परभणी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०३

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सह विक्रीकर आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक विक्रीकर आयुक्त, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक विक्रीकर आयुक्त, व्हॅट ९, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सह आयुक्त, विक्रीकर औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने व त्यांची दिशाभूल केल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-

२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी हे प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्याकडून अधिकृतरित्या फटाके विक्रीचे परवाने मिळालेले आहेत या फटाके विक्रीधारकाकडून किती विक्रीकर वसूल करण्यात आला व औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण ठोक व किरकोळ फटाके विक्रीधारक (अधिकृत परवाने धारकांचे) यांच्या नावासह यादी - ही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या या माहितीचा कालावधी ०१ ऑक्टोबर २००७ ते १५ नोव्हेंबर २००७ असा आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-११-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात काही खुलासा केला व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधितास नोव्हेंबर २००७ च्या विवरणपत्रानुसार देता येऊ शकेल असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिनांक २९-०१-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील प्रकरण प्रलंबीत ठेवले असल्याचे वस्तुस्थितीशी विसंगत विधान करुन आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर हजर नाहीत. अपिलार्थीचे प्रतिनिधी आज रोजीच्या अपील क्रमांक ३९९/२००८ व ४००/२००८ या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी हजर होते तथापि त्यानंतरच्या या सुनावणीच्या वेळी ते गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडे ज्या फटाके विक्रेत्यांची वार्षिक उलाढाल पाच लाख रुपये किंवा त्याहून जास्त आहे अशाच परवानाधारकांची नोंद केली जाते. त्यापेक्षा कमी उलाढाल असणा-या फटाके विक्रेत्यांची नोंद त्यांच्या कार्यालयाकडे केली जात नाही. तसेच अपिलार्थीने माहितीसाठी अर्ज ज्यावेळी त्यांच्याकडे केला त्यावेळी संबंधित विक्रीकर परवानाधारकांनी त्यांचे विवरणपत्र भरले नसल्याने त्यांनी दिनांक २३-११-२००७ रोजी या वस्तुस्थितीची कल्पना अपिलार्थीस दिली व नंतर दिनांक २९-०१-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा, अथवा अपिलार्थीस माहिती न देण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून माहिती लपविण्याचा अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा कोणताही हेतू नव्हता.

वास्तविक या प्रकरणी सह आयुक्त, विक्रीकर, अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले असतांना अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील त्यांच्याकडे केले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत व अपिलार्थीने आयोगाकडे व्दितिय अपील केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक विक्रीकर आयुक्त, व्हॅट ९, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, विक्रीकर औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०४

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : उप अभियंता, श्री. कोतापल्ले

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी तथा त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. कोत्तापल्ले, उप विभागीय अभियंता यांच्या घर खरेदी संदर्भातील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या सेवा अभिलेख्याशी संबंधित असल्यामुळे देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले नाहीत त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देता त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील विना कार्यवाही त्यांच्याकडे तसेच ठेऊन दिले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी म्हणून अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांची नेमणूक केली गेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्या स्तरावर अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधितांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे उचित राहील असे आयोगाचे मत आहे. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांनी

अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर तो तात्काळ या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून ज्यांची नेमणूक झाली आहे अशा अधिका-याकडे म्हणजे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे पाठवावयास हवा होता, तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केली नाही, असे आयोगास आढळून येत आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी होणे या प्रकरणी आयोगास आवश्यक वाटत असल्याने संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांचा प्रथम अपील अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्यानंतर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज अधीक्षक अभियंता यांचेकडे हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसाच्या आत पाठवावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) नांदेड यांनी अपिलार्थीचा त्यांच्याकडे प्राप्त झालेला दिनांक २९-०९-२००७ रोजीचा मूळ अर्ज अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) औरंगाबाद यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच पाच दिवसात पाठवावा.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, त्यांचा प्रथम अपील अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्यानंतर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०५

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००७ रोजी माहितीची मागणी केली असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे टाळल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दिनांक २९-०९-२००७ रोजी प्रथम अपील सादर केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-११-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती व अपिलार्थी या सुनावणीसाठी हजर राहिले असता अपिलेट अधिकारी गैरहजर राहून त्यांनी हे प्रकरण प्रलंबीत ठेवले असल्याकारणाने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६-०७ व २००७-०८ या आर्थिक वर्षात कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, जुने पाझर तलाव, लघुसिंचन तलाव या तलावाच्या दुरुस्तीसाठी किती निधी उपलब्ध झाला, नियमानुसार निविदा प्रकाशित करण्यात आली होती काय, जर प्रकाशित करण्यात आली नसेल तर त्याची कारणे काय व निविदा कोणत्या तारखेस उघण्यात आल्या होत्या व दुरुस्ती कामाच्या एम. बी. चे रेकॉर्ड तपशील, अशी माहिती मागविली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०८-२००७ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या उपविभागाशी संबंधित नसल्याने त्यांचा माहितीचा अर्ज रद्द करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २६-१२-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज रद्द केला. याबद्दलची कारणे विशद करतांना जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलकर्ता यांनी विचारलेली माहिती, माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने अपिलार्थीचा मूळ अर्जच जन माहिती अधिकारी यांनी रद्द केला असल्याने अपिलार्थीचे अपील रद्द केले असल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी

यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग या कार्यालयामध्ये असून त्यांच्याकडे उपविभागाची माहिती उपलब्ध असते. अपिलार्थीने नांदेड विभागाची माहिती विचारली होती. अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे माहितीची मागणी केली त्यावेळी हदगांव येथील कामे चालू होती.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील ' निविदा प्रकाशित करण्यात आली नसेल तर त्याची कारणे काय आहेत ' या मुद्दयावरील माहिती वगळता उर्वरित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर संबंधित उप विभागीय अभियंता यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे पाच दिवसाच्या आत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध असेल त्यांच्याकडे पाठवावयास हवा होता, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचा मूळ अर्जच रद्द केल्याचे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या पत्राने कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांचा प्रथम अर्जास दिलेला हा प्रतिसाद म्हणजे त्यांनी माहिती देण्यासाठी केलेली टाळाटाळ असेच म्हणावे लागेल. आज रोजी युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे हदगांव येथे, अपिलार्थीने ज्या प्रकारच्या कामाची माहिती मागविली आहे त्या प्रकारची कामे चालू होती अशी कबूली दिली आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस खरोखरच माहिती देण्याची इच्छा असती तर त्यांनी किमान हदगांव येथील कामांची माहिती अपिलार्थीस देऊ केली असती तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही येथे केलेली नाही व अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील

कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर उपलब्ध असते असे आयोगास अवगत केले, त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यातील निविदा न उघडण्याची कारणे वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) प्रादेशिक विभाग, पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीने दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, निविदा न बोलाविण्याची कारणे वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) प्रादेशिक विभाग, पुणे यांना, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), प्रादेशिक कार्यालय, बंगला नं. १२, पुणे - ०६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४०६

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना उद्देशून लिहिलेल्या अपिलार्थीच्या दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या पत्राची सत्यप्रत त्यांच्या प्रतिनिधीमार्फत आयोगास सादर केली असून, या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांच्याकडून दिनांक ३०-०७-२००७ रोजी मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्याचे, प्राप्त माहितीवर त्यांचे समाधान झाल्याचे व आता यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने जन

अपिलीय अधिकारी यांना त्यांचे प्रकरण निकाली काढण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या व्दितीय अपिलाची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंद झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००९ रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थीचा माहिती मिळविण्याचा उद्देश साध्य झाल्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर आयोगाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन नाही, मात्र संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना, या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ४०६/२००८, दिनांक ११-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), प्रादेशिक कार्यालय, बंगला नं. १२, पुणे - ०६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २७०६/०७ व २७०७/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७०६ व २७०७

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक २७०६/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम,
जिल्हा परभणी

अपील क्रमांक २७०७/०७

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू,
जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, दोनही प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या दोनही अपील अर्जांसंदर्भात अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांच्याकडे दोनही प्रकरणी दिनांक ०१-०५-२००७ रोजी रितसर अर्ज पाठवून काही माहितीची मागणी केली होती. तथापि मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी विलंब लावल्याने व टाळाटाळ केल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी, पालम व सेलू यांच्याकडे अनुक्रमे दिनांक १२-०६-२००७ व दिनांक १५-०६-२००७ रोजी प्रथम अपिले दाखल केली असता, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांची कोणतीही दखल न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), पालम व सेलू यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचे माहितीसाठीचे कथित दिनांक ०१-०५-२००७ रोजीचे मूळ माहितीसाठीचे अर्ज व कथित प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले नाहीत, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये देखील त्यांनी या दोनही प्रकरणी संबंधितांकडे पोस्टाने अर्ज पाठविल्याप्रीत्यर्थ कोणताही पुरावा जोडला नसल्याने व तसेच आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस यासंदर्भात आयोगास कोणताही पुरावा दाखविता न आल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीस आजही या माहितीची आवश्यकता असेल तर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी माहितीसाठीचा अर्ज

अधिनियमातील तरतुदीनुसार नव्याने दाखल करावा व अर्ज माहिती अधिका-याकडे दाखल केल्याची नोंद स्वतःकडे ठेवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक २७०६/२००७ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक २७०७/२००७ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७०८

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, औंढा नागनाथ,
तालुका औंढा नागनाथ,जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा
नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०५-२००७ रोजी पोस्टाव्दारे माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला होता,

तथापि मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जाणुनबुजून विलंब व टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले होते, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी विलंब व टाळाटाळ केल्याने विचाराधीन अपील त्यांनी आयोगास सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक ०७-०५-२००७ रोजीचा मूळ अर्ज व अपील अर्ज प्राप्त झाला नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर व अपील अर्जावर त्यांना कोणतीही कार्यवाही करता आली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी पाठविलेल्या दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ कोणताही पोस्टाचा दाखला सादर केला नाही, मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०६-२००७ रोजी अपील केल्याचा पोस्टाचा पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील सादर केले असल्याचे निष्पन्न होते, मात्र मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाव्दारे प्रथम अर्ज पाठविल्याप्रीत्यर्थ कोणताही पुरावा आज रोजी त्यांच्याकडे उपलब्ध नाही, हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांनी आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून व या पृष्ठ्यर्थ आवश्यक ती नोंद पुरावा म्हणून त्यांच्याकडे ठेऊन घेऊन माहितीची मागणी करावी. ही माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही विहीत मुदतीत करावी. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यवाहीने समाधान न झाल्यास अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जाची प्रत विहीत मुदतीत सादर करावी. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम कार्यवाही केल्यानंतर, ४५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९

(३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ,जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७०९

निर्णय दिनांक २२-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती माहिती अधिका-याने न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे दिनांक २४-०१-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करता आजपर्यंत अपिलार्थीस माहिती पुरविली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविण्यास तयार असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस आयोगाच्या कार्यालयात अपील क्रमांक ३९९/०८, ४००/०८, २७०६/०८, २७०७/०८ व २७०८/०८ या अपील सुनावणी प्रकरणी अपिलार्थीचे प्रतिनिधी हजर होते. तथापि विचाराधीन प्रकरणाशी संबंधित सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी गैरहजर आहेत याची आयोगाने नोंद घेतली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अर्ज प्राप्त झाला नाही, जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने अर्ज पाठविल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने कोणताही पुरावा आयोगाकडे व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा कथित दिनांक २४-०१-२००७ रोजीचा अपील अर्ज प्राप्त नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत, हे पाहता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे व अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३४५

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक
शाळा, सय्यदान, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी, मार्फत
इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक शाळा, मोहल्ले
सय्यदान, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००७ रोजी

प्रथमतः माहिती मागविली असता, ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांचे प्रथम अपील प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील वरील कथनामध्ये तथ्यांश असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता व तसेच आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/ ६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या आदेशान्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांची अशा प्रकारे शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली असल्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी, माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच,

झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक शाळा, सय्यदान, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी, मार्फत इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक शाळा, मोहल्ले सय्यदान, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३४६/०८ व ३४७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३४६ व ३४७

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, नुरुल हुदा उर्दू प्राथमिक शाळा,
मस्तानपुरा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष, अशोक शिक्षण प्रसारक मंडळ मार्फत
बॉम्बे फिटवेल टेलर, शिवाजीनगर, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी संस्थेचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१०-२००७ रोजी दोन प्रथम

अपिले सादर केली होती. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील क्रमांक ३४६/२००८ च्या संदर्भात रुपये ८५५८ इतक्या रकमेची मागणी केल्याने व अपील क्रमांक ३४७/२००८ च्या संदर्भात त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही माहिती न देता अपिलार्थीची दिशाभूल केल्याने त्यांनी ही दोन स्वतंत्र व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित दोन वेगवेगळ्या प्रकारची माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दोनही प्रकरणी दिनांक ०५-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, अशोक शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड यांच्याकडे प्रथम अपिले केली. मात्र या अपिलासंदर्भात संबंधितांकडून वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिसाद प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वर परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक १२-०२-२००८ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांनी दोनही अपील प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती दिनांक १२-०२-२००८ रोजी दिली असल्याचे व यासंदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे कबूल केले आहे व तसेच त्यांनी या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचाराधीन दोनही अपिले निकाली काढण्याची विनंती केली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या या पुराव्याचे खंडन करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे व आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर

आहेत हे पाहता, अपिलार्थीची दोनही विचाराधीन अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३४६/०८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ३४७/०८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नुरुल हुदा उर्दू प्राथमिक शाळा, मस्तानपुरा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, अशोक शिक्षण प्रसारक मंडळ मार्फत बॉम्बे फिटवेल टेलर, शिवाजीनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६८८

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०६-२००७ रोजी त्यांचा अर्ज रितसर दाखल केला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळले त्यामुळे त्यांनी दिनांक २४-०७-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची सुनावणी घेऊन नियमानुसार अर्जदारास

माहिती न देता अर्जदाराची दिशाभूल केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दैनिक वरके ताजा (उर्दू) या वृत्तपत्रात नांदेड आवृत्तीसाठी जाहिरात दिली असता त्यांनी परभणी आवृत्तीत ती कोणत्या नियमानुसार जाहिरात प्रकाशित केली व जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या नियमानुसार त्याचे बील अदा केले याबाबतची माहिती मागितली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा हा अर्ज दिनांक २२-०६-२००७ रोजी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांच्या कार्यालयात दाखल केल्याचा पुरावा, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाच्या प्रतीसोबत आयोगाकडील व्दितीय अपील अर्जामध्ये जोडला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीस कोणताही निर्णय दिल्याचे आढळून येत नाही.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने

अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक २५-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६८९

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली असता त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०३-१०-२००६ या दिवसाची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या वतीने नांदेड विमानतळ इमारतीच्या भूमिपूजन समारंभासाठी नांदेड, परभणी, हिंगोली या जिल्ह्यातील किती वृत्तपत्रांना जाहिराती देण्यात आल्या, कोणकोणत्या भाषेत प्रकाशित होणा-या वृत्तपत्रांना या जाहिराती देण्यात आल्या, परभणी जिल्ह्यात मराठी वृत्तपत्रांना जाहिरात का देण्यात आली नाही. शासनमान्य जाहिरात यादीवर असलेल्या वृत्तपत्रांची यादी मागविण्यात आली होती काय ? ही जाहिरात फक्त आठ वृत्तपत्रांना कोणत्या नियमानुसार देण्यात आली ? दैनिक वरखे ताजा या वृत्तपत्राला कोणत्या नियमानुसार जाहिराती देण्यात आली, त्यांनी सादर केलेल्या बिलासोबत शासनाने प्रमाणित केलेल्या दरपत्रकांची लेखी माहिती, या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १७-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०६-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या प्रकरणाची सुनावणी झाली किंवा कशी, याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चितपणे कोणता निर्णय दिला हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन समजून येत नाही, तसेच आज रोजी उपस्थित असलेल्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळच्या अधिका-यांना यासंदर्भात कोणताही समाधानकारक खुलासा आयोगासमोर करता आला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून शासनमान्य जाहिरात यादीवर असलेल्या वृत्तपत्रांची यादी मागविली होती,

या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांना प्राप्त झालेली माहिती आजतागायत अपूर्ण आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक २६-०७-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी परभणी जिल्ह्यात मराठी वृत्तपत्रांना जाहिरात का देण्यात आली नाही, शासनमान्य जाहिराती यादीवर असलेल्या वृत्तपत्राची यादी मागविण्यात आली होती काय, या मुद्दयांवर मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत नाही. मात्र उर्वरित मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय होत आहे. अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी, अधिनियमाव्दारे माहिती देण्यासाठीचा विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सोपे व मर्यादित होते. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद न देण्याची कोणतीही कारणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची मर्यादित व्याप्ती व सोपे स्वरुप पाहता मूळात समर्थनीय असू शकत नाहीत. अपिलार्थीस देय असलेल्या माहितीबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात देणे अभिप्रेत आहे. अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ती देण्यासंदर्भात कार्यवाही करणे या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी त्यांना त्यांच्या कोणत्याही निर्णयाबाबत अथवा कृतीबाबत खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारे प्रश्न विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अशा प्रकारच्या प्रश्नांना उत्तरे देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांच्याकडून वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही, हे पाहता अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्याचा युक्तिवाद, आयोग मान्य करीत नाही. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत प्रतिसाद न देता विलंबाने माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव पुरेपूर स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास

महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी, महाकाली गुफा रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९०

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, इस्माईल अमल उर्दू हायस्कूल,
मोहल्ले सय्यदान, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती मागितली असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ती न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१)

नुसार दिनांक २०-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर सुनावणीच्या दिवशी जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर राहिल्याने व त्यांना पुढील सुनावणीची तारीख न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित काही माहिती सन १९९० ते २००६ या कालावधीशी संबंधित मागविली होती. मात्र या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक २०-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे दिसून येते. मात्र या प्रकरणी शिक्षणाधिका-यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय अद्यापपावेतो दिलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे, मात्र अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, आजपर्यंत त्यांना माहिती प्राप्त नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होऊ शकली नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००७ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती.

जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्या युक्तिवादातील विसंगती पाहता जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन,

त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इस्माईल अमल उर्दू हायस्कूल, मोहल्ले सय्यदान, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९१

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिरा बाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, सना उर्दू प्राथमिक शाळा,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन
सोसायटी, मार्फत सना उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे काही माहिती मागविली असता मुदतीच्या आत माहिती न मिळाल्याने त्यांनी सचिव, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय

अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेतल्याने व माहिती देण्यासाठी जाणुनबुजून टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या दिनांक ०५-०५-२००९ रोजीच्या सुनावणीच्या नोटिशी व्यतिरिक्त दिनांक १९-०५-२००९ रोजी सायंकाळी ०५-१५ वाजता शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयातील श्री. सुरावार, वरिष्ठ लिपीक यांच्याकडे निरोप देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचे प्रतिनिधी हे कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच अपिलार्थीचा मूळ प्रथम अर्ज व त्यावरील प्रथम अपील त्यांनी संबंधितांकडे मूळात सादर केले होते किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सादर केलेल्या मूळ अर्जाच्या व अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर संबंधितांच्या कार्यालयाच्या संबंधित लिपिकाची सही व शिक्का नाही या सर्व बाबी पाहता सर्व संबंधितांना या अपील प्रकरणामध्ये स्वारस्य नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१.	अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२५-०५-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिरा बाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सना उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सना वेल्फेअर अॅण्ड एज्युकेशन सोसायटी, मार्फत सना उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९२

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड,
मार्फत नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम अर्ज केला असता मुख्याध्यापकाने त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये सहा इतके शुल्क

भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक २५-०७-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क मनीऑर्डरव्दारे भरुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जाणुनबूजून विलंब लावून टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास दाखविलेली कागदपत्रे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतला गेल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्यावेळी संबंधित संस्थेचे सचिव यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. मात्र आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांची अशा प्रकारच्या शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी शिक्षणाधिकारी

(माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड, मार्फत नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २६९३/०७, २६९४/०७ व २६९५/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९३, २६९४ व २६९५

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक, धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी
विकास प्रकल्प, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती,
जिल्हा अमरावती

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सहायक आयुक्त, अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय, अमरावती

**निर्णय**

**अपील क्रमांक २६९३/२००७**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विशिष्ट अशी कोणत्याही स्वरुपाची आयोगास विनंती न करता आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यामधील आदिवासी मुलामुलींना संगणकाचे प्रशिक्षण देणा-या एजन्सीच्या नावाची व प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या नावाची यादी व संबंधित एजन्सीला त्यांनी संगणकाचे प्रशिक्षण दिल्याच्या मोबदल्यात शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान व खर्च, याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक ३१-०७-२००७ रोजीचा कथित प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. त्यांनी आयोगास असे अवगत केले की,

त्यांच्या विभागाकडील सहायक प्रकल्प अधिकारी हे जन माहिती अधिकारी व प्रकल्प अधिकारी हे अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने पुरविली आहे, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली ही माहिती त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीने कोणत्याही स्वरुपात लेखी अभिप्राय आयोगाकडे अवगत केले नाहीत हे पाहता अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. फक्त अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे समर्थन केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती तथापि अपिलार्थी हे माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. यासंदर्भात येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितल्यास, त्यांच्या प्रथम अर्जानंतर झालेल्या घडामोडी या अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याशी अथवा त्यांच्या कार्यालयाशी व्यक्तिशः संपर्क साधून ज्ञात करुन घेणे हे त्यांना अनिवार्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः कधीही, आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता उपस्थित राहीले नाहीत अथवा या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही. हे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी ते आयोगासमोर आज सुनावणीस उपस्थितही नाहीत त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे

उत्तरदायित्व पूर्णपणे पार न पाडल्याचा हा युक्तिवाद आयोग मान्य करीत असून अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक २६९४/२००७**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विशिष्ट अशी कोणत्याही स्वरुपाची आयोगास विनंती न करता आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-०७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाने न्यूकलेज बजेट व केंद्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या साहित्यासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात कोणताही निर्णय प्राप्त न

झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती, तथापि अपिलार्थी हे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे त्यांनी अंतीमतः दिनांक १५-११-२००७ रोजी स्वतः होऊन अपिलार्थीस ८४ पृष्ठांची माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी यासंदर्भात प्रत्येक टप्प्यावर अर्जासंदर्भातील घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदारावर असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे अशा प्रकारचे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नाही. ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित राहिले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि हा अपील अर्ज त्यांच्या कार्यालयास केल्याचा कोणताही पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत सादर केला नाही. अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक २४-१२-२००७ रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. मात्र यापूर्वीच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक १५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. याचा उल्लेख अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात कोठेही केला नाही. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे दिसून येते. जरी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने प्राप्त झाली असली तरी

या विलंबास अपिलार्थी हे व्यक्तिशः जबाबदार आहेत कारण त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता व्यक्तिशः उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>अपील क्रमांक २६९५/२००७</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विशिष्ट अशी कोणत्याही स्वरुपाची आयोगास विनंती न करता आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे न्यूकलेज बजेट योजनेअंतर्गत त्यांनी केलेली कामे व तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळा व वस्तीगृहासाठी खरेदी केलेल्या साहित्याच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्याकडे दिनांक १२-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. यासंदर्भात अपिलार्थीने त्यांचा अपील अर्ज अपर आयुक्त कार्यालयात दिनांक १२-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ योग्य तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीचे प्रथम

अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे, मात्र अपर आयुक्तांनी या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जासंबंधित माहिती दिनांक १५-११-२००७ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली आश्रमशाळा व वस्तीगृहाचे संदर्भातील माहिती अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने ही माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती त्यांच्याकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर या प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक, धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सहायक आयुक्त, अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय, अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, आदिवासी विकास, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक (आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड), नाशिक

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २६९८/०७ व ३४३/०८**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९८ व ३४३/०८

निर्णय दिनांक २५-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक
शाळा, सय्यदान, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी, मार्फत
इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक शाळा, मोहल्ले
सय्यदान, नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ व दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने ही दोनही अपिले त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या माहितीच्या मूळ अर्जासंदर्भात केली आहेत. अपिलार्थीने या प्रकरणी एकाच अर्जाच्या संदर्भात दोन स्वतंत्र प्रथम व व्दितीय अपिले अनुक्रमे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे व आयोगाकडे सादर केली असल्याने या दोनही अपील अर्जाची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

वरील दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी रजिस्ट्री स्वीकारण्याचे स्पष्टपणे नाकारले, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्याकडे रजिस्ट्रीव्दारे प्रथम अपील दाखल केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती न देता हे प्रकरण प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०८-२००७ व दिनांक २९-०९-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास अवगत केले. आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले संस्थेचे सचिव यांनी अपिलार्थीच्या म्हणण्यास दुजोरा दिला आहे. आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या आदेशान्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक) यांची अशा प्रकारच्या शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. अपिलार्थीच्या या प्रकरणांमध्ये प्रथम अपील अर्जाची सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०८-२००७ व दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या दोनही अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत. जन

अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न  झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे, व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २६९८/०७ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ३४३/०८ निकाली काढण्यात येत आहे.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०८-२००७ व दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी  घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक शाळा, सय्यदान, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मोमीन एज्युकेशन सोसायटी, मार्फत इस्लाहूल अमल उर्दू प्राथमिक शाळा, मोहल्ले सय्यदान, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना अपिलार्थीच्या दिनांक १७-०८-२००७ व २९-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२९९
निर्णय दिनांक २६-०५-२००९

१ श्री. सखाराम किशनराव सावते, : अपिलार्थी
रा. आसेगाव,ता. जिंतूर, जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, जिंतूर, जि.परभणी.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, सेलू,जि.परभणी.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने त्यांनी उपविभागीय अधिकारी, सेलू यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी देखील अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"रॉकेल वाटपाचे प्रमाणपत्र, रॉकेलसाठा रजिस्टर,साठास्थिती, दररोजचा अहवाल, मोहखेड, जूननवाडी येथील वरिल कागदे झेरॉक्स करुन, तीस दिवसात मिळावे"

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१८४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे दि. ३०.०१.२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीची पोचसही असलेले जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले अपिलार्थीचे दि. ३०.१.२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याचे व यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे नमूद केले आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दुसऱ्या दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य माहिती मिळाली आहे. याहीपेक्षा या प्रकरणी दुसरी महत्त्वाची बाब अशी आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केला नाही, त्यामुळे अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असणाऱ्या माहितीचे अंदाजित अनुमान काढून त्यांना रु.१८४/-इतके माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केला नाही. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहिल्या असता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे प्रयोजन आयोगास

आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सखाराम किशनराव सावते,रा. आसेगाव,ता. जिंतूर, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिंतूर, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सेलू,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३०३
निर्णय दिनांक २६-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रणजीत नामदेव चव्हाण,<br>रा. पिंपरखेडा (हिवरा), ता.आष्टी, जि. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,आष्टी,जि.बीड. | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,आष्टी, जि.बीड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. परंतु त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य माहिती देण्याचे आयोगाने आदेशित करावे व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आष्टी तालुक्यातील रॉकेल वाटपासंदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - घाऊक, अर्धघाऊक आणि किरकोळ रॉकेल विक्रेते परवानाधारकांची नावे, गावाचे नाव, परवाना क्रमांक, शिधापत्रिका संख्या, लोकसंख्या, लोकसंख्येनुसार नियतन - यांच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर देखील कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील लेखी म्हणण्यानुसार आयोगासमोर युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर सात महिन्यापासून रुजू झाले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती का पुरविली नाही, याचे कारण ते आयोगास आवश्यक सांगू शकत नाहीत. तथापि त्यांनी आता माहे सप्टेंबर, २००७ या कालावधीची माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे दोन दिवसांपूर्वी पाठविली आहे व त्याची एक प्रत आज रोजी अपिलार्थीस देण्यास ते तयार आहेत, असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता व अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांना निश्चित कोणत्या कालावधीची माहिती हवी आहे, यासंदर्भात अपिलार्थीने कोणताही उल्लेख त्यांच्या प्रथम अर्जामध्ये केलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची ठरत आहे. परिणामी ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळणे संभवत नाही, एवढे जरी असले तरी अपिलार्थीस सप्टेंबर, २००७ या महिन्याशी संबंधित माहिती हवी असेल,

अशा कल्पनेने जन माहिती अधिकारी यांनी आता त्यांना ती पाठविली आहे व त्याची एक जादा प्रत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत. हे पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत परिणामी अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्यासाठी दुसरा कोणताही मुद्दा आयोगासमोर शिल्लक राहत नाही.

उपरोक्त प्रकरणी, मूळात अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती कोणत्या कालावधीची आहे, याचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये केला नसल्याने अपिलार्थीस निश्चितपणे आवश्यक असणारी माहिती, जन माहिती अधिकारी यांना देता येणे शक्य नाही. एवढे जरी असले तरी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे दि. २३.१०.२००७ रोजी अगर तत्पूर्वी या प्रकरणी प्रतिसाद देणे अपेक्षित होते, मात्र त्यांनी या प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अक्षम्य उपेक्षा केली आहे, असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अक्षम्य उपेक्षा करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. क

त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार आष्टी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल न घेऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(६) चा भंग करुन या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, त्यांच्या अशाप्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, बीड यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (दि.२४.०९.२००७ रोजी नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,आष्टी या पदावर कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रणजीत नामदेवराव चव्हाण,रा. पिंपरखेड (हिवरा), ता.आष्टी, जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, आष्टी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,आष्टी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

## क्रमांक ४२१/०८,४२२/०८,४२३/०८ व ४२४/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४२१,४२२,४२३ व ४२४

निर्णय दिनांक २६-०५-२००९

१. श्री. सलीम कासिम पटेल वाहेगावकर, :अपिलार्थी
रा.मलिक अंबरनगर, औरंगाबाद.

**विरुध्द**

१. अपील क्र.४२१/०८

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास<br>महामंडळ, (म.) परभणी | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास महामंडळ,<br>(म.) परभणी | : प्रतिवादी |

२. अपील क्र.४२२/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास<br>महामंडळ, (म.) हिंगाली | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास महामंडळ,<br>(म.) हिंगाली |

३. अपील क्र.४२३/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास<br>महामंडळ, (म.) लातूर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास महामंडळ,<br>(म.) लातूर |

४. अपील क्र.४२४/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास<br>महामंडळ, (म.) उस्मानाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>वसंतराव नाईक विमुक्त जाती व<br>भटक्या जमाती विकास महामंडळ,<br>(म.) उस्मानाबाद |

उपरोक्त चारही प्रकरणातील प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : व्यवस्थापक (वित्त व लेखा), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.)मुंबई.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०१.२००८ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात येत असून, सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने ही सर्व अपिले औरंगाबाद विभागातील परभणी,हिंगोली,लातूर व उस्मानाबाद येथील जिल्हा व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) यांच्याविरुध्द एकाच दिवशी आयोगाकडे केली असल्याने व या प्रकरणातील मूळ अर्जाद्वारे अपिलार्थीने चारही जन माहिती अधिकारी यांच्याकडे एक सारखीच माहिती मागितली असल्याने, या सर्व अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मराठवाडा क्षेत्रातील परभणी,हिंगोली,लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) च्या जिल्हा व्यवस्थापकाकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती दि. ३१.१०.२००७ रोजी मागितली होती. तथापि जिल्हा व्यवस्थापकाने (अपील क्र.४२१/०८)त्यांना माहिती देण्यास नकार देऊन दि. ०७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना उडवाउडवीची उत्तरे पाठविली. त्यामुळे त्यांना वेळोवेळी अपिले दाखल केल्यानंतरसुध्दा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतेही उत्तर न आल्याने त्यांनी आयोगाकडे विचाराधीन एकूण ४ स्वतंत्र अपिले दाखल केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने एकच माहिती मराठवाडा क्षेत्रातील परभणी, हिंगोली, लातूर व उस्मानाबाद जिल्हयामधील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) च्या जिल्हा व्यवस्थापकांकडे दि. ३१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या

या अर्जास जिल्हा व्यवस्थापक,परभणी यांनी त्यांच्याकडील दि.०७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निश्चित स्वरुपाची नसल्याने आणि ती त्रयस्थ पक्षाच्या हिताची असल्याने त्यांना देण्याचे नाकारले. जिल्हा व्यवस्थापक,हिंगोली यांनी त्यांच्या दि. ०२.११.२००७ रोजीच्या प्रथम प्रतिसादाद्वारे अपिलार्थीस याच कारणास्तव माहिती देण्याचे नाकारले. जिल्हा व्यवस्थापक लातूर यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने दि.१०.१२.२००७ रोजी केल्यानंतर त्यांना दि.१५.१२.२००७ रोजी दोन पृष्ठांची माहिती त्यांनी दिली.जिल्हा व्यवस्थापक, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या अर्जास दि.१३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि.१८.१२.२००७ रोजी माहिती पाठविली.

या सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने परत जिल्हा व्यवस्थापकांकडेच अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपिले दि.१४.११.२००७ रोजी केली. तथापि या अपील अर्जांसंदर्भात संबंधित जिल्हा व्यवस्थापकांनी अपिलार्थीस काहीही न कळविल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर आहेत. त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, ते विमुक्त जाती भटक्या जमाती जागृती मंचचे अध्यक्ष असून वसंतराव नाईक महामंडळ,म.कडे शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचे वितरण योग्य पध्दतीने केले जात नसल्याच्या तक्रारी त्यांच्याकडे प्राप्त झाल्याने, या तक्रारी निवारणापृष्ठयर्थ व त्याद्वारे व्यापक जनहित साध्य करण्यासाठी त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळणे आवश्यक आहे. वसंतराव नाईक महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामध्ये माहिती अधिकारी व अपिलीय

अधिकारी यांच्या नावाचे अभ्यागतांच्या सहजपणे दृष्टीस पडतील, असे कोणतेही फलक आजपावेतो लावण्यात आले नाहीत. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील प्रथम अपील व्यवस्थापकांकडेच केले आहे. त्यांची अपेक्षा अशी होती की, व्यवस्थापक हे त्यांनी दाखल केलेले प्रथम अपील अर्ज योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे पाठवून देतील व याबाबत त्यांना न्याय मिळेल. व्यवस्थापकांनी या संदर्भात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने त्यांना आयोगाकडे द्वितीय अपील करणे भाग पडले आहे. या सर्व जिल्हा व्यवस्थापकांकडे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्या माहितीपोटी लागणाऱ्या आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे करुनही त्यांना केवळ २ ते ४ पृष्ठांची माहिती लातूर व उस्मानाबाद येथील व्यवस्थापकांकडून प्राप्त झाली. मात्र या प्रकरणी त्यांनी अनुक्रमे रक्कम रु.२००/- व १३०/- इतके त्यांच्या कार्यालयात माहितीपोटी भरणा केलेले आहेत.त्यांची अशी अपेक्षा आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी. त्यांना लातूर व उस्मानाबाद कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये लाभार्थ्यांची नावे व पत्ते असलेली माहिती प्राप्त झालेली नाही व परभणी व हिंगोली व्यवस्थापकांकडून त्यांना कोणताही सकारात्मक प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी सुनावणीस आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत. याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी संबंधित वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) या सार्वजनिक प्राधिकरणाचे सर्व अधिकारी किती निष्क्रियतेने सामाजिक न्याय विभागाच्या योजना क्षेत्रीय स्तरावर राबवित आहेत, याचे पुरेपूर दर्शन या प्रकरणाचे अवलोकन केल्यास दिसून येईल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे - जिल्हयामध्ये सन २००५ ते २००७ या कालावधीत बीज भांडवल कर्ज योजना,थेट कर्ज योजना, अनुदान कर्ज योजना, पन्नास अनुदान योजना, प्रशिक्षण योजना, मुदत कर्ज

योजना,मार्जिन कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज योजना,स्वयंसक्षम कर्ज योजना, स्वर्णिम कर्ज योजना, सुक्ष्म कर्ज पुरवठा योजना, महिला समृध्दी कर्ज योजना, दिनदयाल लघु ऋण (अपंगाकरिता) योजना - या एकूण १३ योजना जन माहिती अधिकारी यांच्या जिल्हयात लागू होतात किंवा कसे व या १३ योजनांपैकी काही योजना अंमलात आल्या नसल्यास, त्या अंमलात का आणण्यात आल्या नाहीत व या योजनांतर्गत ज्या लाभार्थ्यांना कर्ज वाटप केले आहे, त्या लाभार्थ्यांची नावे व पत्यासह यादी - अशी माहिती विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म) च्या सर्व जिल्हा व्यवस्थापकांकडे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, - या योजना संबंधित जिल्हयाला लागू होतात की नाही व तसेच काही योजना अंमलात आणल्या नसल्यास त्याची कारणे - या १४ क्रमांकाच्या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मात्र या अर्जामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती म्हणजे सर्व लाभार्थ्यांची नाव व पत्त्यासह यादी, ही अपिलार्थीस, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने देय होत आहे. अपिलार्थीस माहिती नाकारताना जिल्हा व्यवस्थापक, परभणी व हिंगोली यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे कारण देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. जिल्हा व्यवस्थापक, लातूर व उस्मानाबाद या दोघांनीही अपिलार्थीस या योजनांसंदर्भात त्यांना प्राप्त झालेला निधी आणि या निधीच्या संबंधाने किती प्रकरणे निकाली काढले आहेत, या मुद्यांच्या संदर्भात माहिती देताना, लातूर जिल्हा व्यवस्थापकांनी, लाभार्थ्यांची नावे व पत्ते, अपिलार्थी हे तिसरा पक्षकार असल्याने व तसेच लाभार्थ्यांकडून कर्जाच्या वसूलीवर परिणाम होत असल्यामुळे व लाभार्थी या महिला असल्याने माहिती देण्याचे नाकारले व उस्मानाबाद जिल्हा व्यवस्थापकांनी अपिलार्थीस ही माहिती उघड केल्यास त्यांचे कर्ज वसूलीमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. मात्र अपिलार्थीस ही माहिती दिल्यानंतर त्यांना कर्ज वसूलीत कशाप्रकारे अडथळा निर्माण होतो, याचे स्पष्टीकरण त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या पत्रामध्ये केलेले नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शासकीय अनुदानाच्या वितरणासंदर्भातील माहिती आहे. शासकीय अनुदान हा सार्वजनिक निधी आहे. जनतेकडून शासनास त्यांनी भरलेल्या विविध कराद्वारे प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून अशाप्रकारच्या अनुदानाचे वाटप शासनाकडून वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत लाभार्थ्यांना केले जाते व सदर महामंडळ हे शासनाचे अंगीकृत महामंडळ असल्याने ते अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरण ठरते. या अनुदानाचे वाटप हे महामंडळ योग्य प्रकारे करते किंवा कसे, हे सर्वसामान्य जनतेला कळणे, हे या महामंडळांच्या कारभाराच्या पारदर्शकतेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियमाची मूळ संकल्पना मूळात सार्वजनिक प्राधिकरणाच्या कारभाराच्या पारदर्शकतेवर आधारलेली आहे किंबहुना सार्वजनिक प्राधिकरणाकडील व्यवहारांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता यावी, असा तिचा एक उद्देश आहे. सामान्य जनतेने भरलेल्या कराचा विनियोग हे महामंडळ कसे करते, हे सर्वसामान्यांना कळणे हा सामान्य जनतेचा हक्क आहे, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी त्या माहितीचे स्वरुप वर नमूद केल्याप्रमाणे 'सार्वजनिक' असल्याने ही माहिती उघड करण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये, याउलट  ही महामंडळे शासकीय अनुदानाचे वाटप ज्या-ज्या वेळी वेगवेगळया लाभार्थ्यांना करीत असतात, त्याबाबतची माहिती त्यांच्या वेबसाईटवर स्वयंप्रेरणेने अथवा जाहीर प्रसिध्दीद्वारे घोषित करणे अभिप्रेत आहे.माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(ख) मधील उपकलम क्र.'बारा'चे अवलोकन करता माहिती अधिकार अधिनियमामध्ये देखील ही माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करणे हे त्यांना बंधनकारक आहे. कलम ४(ख) मधील उपकलम 'बारा'मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील". ही तरतुद असे स्पष्ट करते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांना कोणताही प्रत्यवाय नाही. या उलट जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची माहिती त्यांच्या कार्यालयातील नोटीसबोर्डवर, वेळोवेळी लावणे हे या प्रकरणी जास्त संयुक्तिक ठरले असते. अपिलार्थीस लाभार्थ्यांची नावे व

पत्ते नाकारण्याची जिल्हा व्यवस्थापक, लातूर व उस्मानाबाद यांनी दिलेले कारण आयोगास मान्य नाही. अधिनियमातील कलम ४(ख) उपकलम (बारा) नुसार ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी देणे अनिवार्य आहे. जिल्हा व्यवस्थापक, लातूर व उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती अपूर्ण दिली आहे, तर जिल्हा व्यवस्थापक, परभणी व हिंगोली यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. त्यामुळे या प्रकरणी सर्व व्यवस्थापक हे अपिलार्थीस विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देण्यासाठी जबाबदार असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. सबब सर्व जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, परभणी, हिंगोली, लातूर व उस्मानाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यामधील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच जिल्हा व्यवस्थापक,लातूर व उस्मानाबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहिती देण्यासाठी आकारलेले शुल्क अनुक्रमे रु.२००/- व १३०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत परत करावे.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळांतर्गत जिल्हा व्यवस्थापक कार्यालयामध्ये माहिती व अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनामे असलेले फलक अद्यापपावेतो लावण्यात आलेले नाहीत. या संदर्भात सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या विभागांतर्गत असणाऱ्या महामंडळाच्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये अशाप्रकारचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची नावे व पदनामे दर्शविणारे फलक अभ्यागतांना सहज दृष्टोत्पत्तीस येतील, अशाप्रकारे लावण्याच्या त्यांनी सर्व संबंधित कार्यालयांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सूचना द्याव्यात व या सूचनांचे त्यांच्या अधिनस्त सर्व महामंडळातील कार्यालये अनुपालन करतील, असे त्यांनी पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन चारही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.४२१/०८,४२२/०८,४२३/०८ व ४२४/०८ मान्य करण्यात येत आहेत.

२. जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, (म.) परभणी,हिंगोली,लातूर व उस्मानाबाद या सर्वांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यामधील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, (म.) लातूर व उस्मानाबाद यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क अनुक्रमे रु.२००/-व १३०/-इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सलीम कासिम पटेल वाहेगावकर,रा.मलिक अंबरनगर (किराडपुरा),रहेमानिया कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक (वित्त व लेखा),वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, (म.) जुहू सुप्रिम शॉपींग सेंटर,गुलमोहर क्रॉस रोड नं.९,विलेपार्ले (प) मुंबई-४९ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४२५/०८ व ४२६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४२५ व ४२६
निर्णय दिनांक २६-०५-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, रा.नांदेड. :अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जमाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.),नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जमाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.),नांदेड : प्रतिवादी
प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : व्यवस्थापक (वित्त व लेखा), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ,(म.)मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,(म.) नांदेड.
जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,(म.) नांदेड
प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,(म.) लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी नोंदविलेली, क्रमांक ४२५/०८ व ४२६/०८ ही दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन असून या दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २६.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी दोनही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने या दोनही अपिलांशी संबंधित मूळ अर्जांद्वारे एकाच दिवशी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ (म.), नांदेड व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.),नांदेड यांच्याकडे एक सारखी माहिती मागितली होती व या संदर्भातील प्रथम अपील एकाच दिवशी केल्याने व तदनंतर आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी द्वितीय अपील केल्याने या दोनही स्वतंत्र द्वितीय अपिलाची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

**अपील क्र. ४२५/०८ :**

आयोगाकडे दाखल केलेल्या या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०७.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अर्ज पाठवून दिला असता, माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म) नांदेड यांच्याकडे दि. १६.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले, परंतु त्यांनी देखील माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आर्थिक वर्ष २००५ ते २००७ या कालावधीमधील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.०८.२००७ रोजी परत जिल्हा व्यवस्थापक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म)नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. हे अपील केल्यानंतर त्यांना जिल्हा व्यवस्थापकाच्या कार्यालयाने दि. २७.०८.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून, यानंतर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देण्याचे कारण म्हणजे अपिलार्थीने ज्या वेळी माहितीसाठीचा अर्ज केला होता, त्यावेळी संबंधित जिल्हा व्यवस्थापक श्री.एम.जी.राठोड हे रजेवर असल्यामुळे अपिलार्थीस वेळीच माहिती देता आली नसल्याचे आयोगास अवगत केले. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि.१३.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणी घेतली गेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीचे दि. १३.०८.२००७ रोजीचे प्रथम अपील प्राप्त झाल्याचे आयोगासमोर कबूल केले. मात्र त्यांनी अपिलार्थीचा हा अपील अर्ज, या प्रकरणी ज्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली आहे, त्या व्यवस्थापक (वित्त व लेखा), मुंबई यांच्याकडे पाठविले असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि.१३.०८.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज मूळ प्रतीत संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत पोहोचेल, अशी व्यवस्था करावी. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक,(वित्त व लेखा) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ(म),मुंबई यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तो त्यांना प्राप्त झाल्यापासून, पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला अंतिम निर्णय पारित करावा. अपिलार्थीस या सुनावणीचे सूचनापत्र किमान दहा दिवसांच्या अगोदर प्राप्त होईल, याची दक्षता त्यांनी घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

**अपील क्र. ४२६/०८ :**

आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी नोंदविलेल्या या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.) नांदेड यांच्याकडे पोस्ट रजिस्टर क्र. ४८१९, दि. ०७.०७.२००७ रोजी रितशीर अर्ज पाठवून दिला असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,नांदेड यांच्याकडे पोस्ट रजिस्टर क्र. १४६१ दि. १६.०८.२००७ रोजी प्रथम अपील केल्यानंतरही त्यांना माहिती देण्यासाठी संबंधितांनी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा दि. ०७.०७.२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही, मात्र अपिलार्थीचे दि. १३.०८.२००७ रोजीचे प्रथम अपील त्यांना प्राप्त झाले असून या अपील अर्जास त्यांनी दि.११.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व काही माहिती देण्याचे नाकारले. यानंतर त्यांचा अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार झाला नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक,अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, लातूर यांनी अपिलार्थीच्या या दि. १३.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही, कारण हा अपील अर्ज त्यांच्याकडे पाठविला गेला नाही. सबब जिल्हा व्यवस्थापक, आण्णाभाऊ साठे, विकास महामंडळ, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीचा दि. १३.०८.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज मूळ प्रतीत त्यांनी प्रादेशिक व्यवस्थापक,अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,लातूर यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत पाठवावा. प्रादेशिक व्यवस्थापक,अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, लातूर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर, हे आदेश निर्गमित होताच,

झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला अंतिम निर्णय पारित करावा. अपिलार्थीस या सुनावणीचे सूचनापत्र किमान दहा दिवसांच्या अगोदर प्राप्त होईल, याची दक्षता त्यांनी घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची वरील दोनही अपिले क्र.४२५/०८ व ४२६/०८ निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. ४२५/०८ व ४२६/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ४२५/०८ व ४२६/०८ चे संदर्भात अनुक्रमे जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक,(वित्त व लेखा) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.),मुंबई व प्रादेशिक व्यवस्थापक, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, (म.) लातूर यांनी या प्रकरणांशी संबंधित अपिलार्थीच्या दि.१३.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले नि-र्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक, साप्ताहिक सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.) नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,(म.) नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक,(वित्त व लेखा), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (म.),जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर,गुलमोहर क्रॉस रोड नं.९, विलेपार्ले (प),मुंबई-४९ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,(म.) लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३७४
निर्णय दिनांक २६-०५-२००९

१ श्री. सरदार हरजीतसिंग सहानी, औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (म), महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वॉर्ड अधिकारी,वार्ड 'ड', महानगरपालिका,औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांना आज जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती संपूर्ण माहिती पुरविली असल्याने, त्यांचे विचाराधीन अपील ते मागे घेत असल्याचे आयोगास अवगत केले व तसे त्यांनी रु.२०/- एवढया किमतीचे कोर्ट-फी-स्टॅम्प असलेले लेखी पत्र आज आयोगास सादर केले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन असलेले त्यांचे अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे द्वितीय अपील क्र.२३७४/०७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे

आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२३७४/०७, दि. १९.११.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सरदार हरजीतसिंग सहानी,घर नं.५-१-५५/१-पी १,उस्मानपूरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी,वॉर्ड 'ड',महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (म),महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३४
निर्णय दिनांक २६-०५-२००९

१ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, : अपिलार्थी
रा.परळी वैजनाथ,जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,
परळी वैजनाथ,जि.बीड
२ जन अपिलीय अधिकारी,
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,
परळी वैजनाथ,जि.बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्राध्यापक (क्रीडा विभाग)
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला
महाविद्यालय,
परळी वैजनाथ,जि.बीड

जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य,
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला
महाविद्यालय,
परळी वैजनाथ,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असून या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,३ व ५ या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दि. २०.१०.२००७ रोजी सादर केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी न घेता माहिती अधिकारी यांनी

दिलेल्या चुकीच्या माहितीवर पांघरुण घालून माहिती अधिकार अधिनियम २००५ चे उल्लंघन केले आहे. या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अपिलार्थीस जाणूनबुजून संगनमताने सत्य माहितीपासून वंचित ठेवत आहेत. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर नियमानुसार शास्ती व शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश आयोगाकडून निर्गमित व्हावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व अपिलार्थीविषयी काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे "सत्य प्रत"या स्वरुपात अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करेपर्यंत असा आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५८/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले, परंतु या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २२.०९.२००७ रोजी पूर्ण व सत्य स्वरुपात माहिती साक्षांकित करुन दिलेली आहे. ही माहिती अपिलार्थीस दि. २५.०९.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांच्या युक्तिवादाबरोबरच त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती

आयोगास दाखविली. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यांनी आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. २३.०५.२००९ रोजीच्या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थीचा कथित दि. २०.१०.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही.अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रथम अपील अर्ज न करता सरळ राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे आणि या अपिलामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर खोटे आरोप केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत योग्य ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी आहे. ही माहिती अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. मूळात अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ पूर्ण व मुद्दा क्र.५ मधील अंशतः माहिती देय होत नाही.कारण या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण मागितले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न अथवा त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा त्यांच्या कृतीबद्दल स्पष्टीकरणे निर्णयाबद्दल स्पष्टीकरण विचारणे आणि या प्रश्नांची उत्तरे अथवा त्यांच्या कृतीबद्दल स्पष्टीकरणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदींचे पालन करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, इतकीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी ही प्रक्रिया पूर्णपणे पार पाडल्याचे अपिलार्थीस

पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे "प्रा. देशमुख एच.व्ही. यांची स्थानिक निवड समितीद्वारे दि. ०८.०७.२००० ते २००३ या शैक्षणिक वर्षातील नेमणूकीस वैयक्तिक मान्यता अहवालाची तीन वर्षाच्या मान्यतेबाबतची सत्यप्रत" ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अवगत केल्यावरुन वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांच्या नेमणूकीस वैयक्तिक मान्यता संबंधित प्राधिकरणाकडे प्राप्त झालेली नाही. श्री. देशमुख यांच्या नेमणूकीसंदर्भात महाविद्यालयाने विद्यापिठाकडे प्रस्ताव पाठविला असता,विद्यापीठाने अपिलार्थीचा प्रस्ताव अमान्य केला आहे व विद्यापीठाच्या या पत्राची प्रत महाविद्यालयाने अपिलार्थीस पुरविली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी विद्यापीठास दि. ११.१०.२००१ रोजी पाठविलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत अपिलार्थीस दिल्याचे आढळून येत नाही. ती प्रत आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी म्हणजे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकेल.

अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या उर्वरित माहितीच्या मुद्यांचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी पूर्णपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत नाही, तसेच अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. सबब अपिलार्थीचा सदर आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे.

प्रसंगावशात, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. परंतु या प्रतीबरोबर त्यांनी हा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचा कोणताही पुरावा जोडलेला नाही व जन अपिलीय अधिकारी हे, अपिलार्थीचा प्रथम

अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे त्यांच्याकडील दि. २३.०५.२००९ रोजीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या निवेदनामध्ये म्हणत आहेत, हे पाहता, जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरुन अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, इतःपर आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील सादर करताना त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या पत्रव्यवहाराच्या पुराव्यापृष्ठयर्थ आवश्यक ती कागदपत्रे सादर करावीत व इतःपर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील न करता सरळ राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करणे टाळावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमधील मुद्दा क्र. २ शी संबंधित (महाविद्यालयाने विद्यापीठास दि. ११.१०.२००१ रोजी पाठविलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत) ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हनुमंत वसंतराव देशमुख,द्वारा कनकदंडे निवास,सरकारवाडा,अंबावेस,रा.परळी वैजनाथ, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक (क्रीडा विभाग), कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वैजनाथ,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वैजनाथ,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७११
निर्णय दिनांक २६-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपायुक्त (सा.प्र.),
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०६.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, माहिती अधिकार कायदा, २००५ अंतर्गत अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत माहिती मागविता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उत्तर दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी सदर माहिती, माहिती अधिकारांतर्गत मागता येत नाही, असा निर्णय देऊन अपिलार्थीची दिशाभूल केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मदरसे कुरेशिया, मनियारगल्ली, नांदेड, या शाळेचे अनधिकृत बांधकाम

गेल्या सहा वर्षापासून महानगरपालिकेतर्फे पाडण्यात आलेले नाही याबद्दलचा लेखी खुलासा व बांधकाम पाडण्यात आले नाही, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, "बांधकाम पाडणे ही बाब प्रशासकीय आहे, व तसेच शाळेचे बांधकाम पाडणे ही बाबही धार्मिक व सार्वजनिक स्वरुपाची आहे, करिता नियमाप्रमाणे कार्यवाही चालू आहे, माहितीस्तव" अशी माहिती अपिलार्थीस पुरविली व त्याचबरोबर सदर अनधिकृत बांधकामाचा पंचनामा अहवाल व नकाशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या परंतु या माहितीने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०५.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु ही सुनावणी झाली किंवा कसे, अथवा अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणता निर्णय झाला, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे, कळण्यास मार्ग नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयातर्फे दि.१२.०५.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि. २०.०५.२००९ रोजी ठीक ०१.४० वा. श्री. रत्नाकर वाघ,उपायुक्त यांच्यामार्फत कल्पना देऊनही ते अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही आयोगासमोर आज उपस्थित नाहीत, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेल्या बांधकामाबाबत, गेल्या सहा वर्षात कोणतीही कार्यवाही का केली नाही यासंदर्भात खुलासा अपेक्षित असल्याचे दिसून येते. या मुद्यावर येथे असे स्पष्ट करण्यात येते की,

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात त्यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येईल की, अपिलार्थीने ज्या प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, अशा प्रकारच्या माहितीचा, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश नाही. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारचे खुलासे,स्पष्टीकरणे अर्जदारास करणे अशा प्रकारच्या प्रक्रिया मूळात या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेला दि. ०२.०४.२००७ रोजीचा मूळ अर्जच या प्रकरणी अवैध ठरत आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज या प्रकरणाचा पाया असल्यामुळे व तो अशाप्रकारे मूळात अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.),नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.  जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१२
निर्णय दिनांक २६-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा व्यवस्थापक,
महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ
मर्यादित,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा व्यवस्थापक,
महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ
मर्यादित,नांदेड
प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक व्यवस्थापक,
महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ
मर्यादित,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार कायदा, २००५ अंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०७.२००७ रोजी रीतसर अर्ज पाठवून माहिती मागितली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००५-०७ या कालावधीतील काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार परत जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ,म.नांदेड यांच्याकडे दि. १३.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. वास्तविक या प्रकरणी जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ,म.नांदेड हे माहिती अधिकारी असून या महामंडळाचे औरंगाबाद येथील प्रादेशिक व्यवस्थापक हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले होते. अपिलार्थीच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०८.२००७ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु १५,९४०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात कधीही केला नाही, मात्र त्यानंतर त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दि. ०७.०७.२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्याचे आयोगासमोर कबूल केले. मात्र यासंदर्भात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही का झाली नाही व अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यावेळी का पाठविला नाही, याचा खुलासा ते आयोगासमोर करु शकले नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचा दि. १३.०८.२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत पाठवून द्यावा. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील

अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ म.,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१३.०८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**<br>
**दिनांक : २६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**<br>
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड, रा.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

**क्रमांक ४१६/०८ व ४१७/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१६ व ४१७

निर्णय दिनांक २७-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर,
तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक ४१६/०८ १ श्री. दंडेवार मारोती हुलगुंडे
२ श्री. प्रल्हाद दामोधर जाधव
अपील क्रमांक ४१७/०८ १ श्री. सुरेश शेषेराव सोनकांबळे
२ श्री. राजुरे बालाजी विश्वनाथ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेली अपील क्रमांक ४१६/२००८ व ४१७/२००८ अशी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी अंतर्गत त्यांनी नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय,

देगलूर यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००७ व दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथम अर्ज केले असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या दोनही प्रकरणी कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०९-२००७ व दिनांक ०३-११-२००७ रोजी अनुक्रमे अपील क्रमांक ४१६/२००८ व ४१७/२००८ च्या संदर्भात प्रथम अपील दाखल केले होते, तथापि या दोनही प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता व अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न करता त्यांची प्रथम अपिले प्रलंबीत ठेवली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन दोन स्वतंत्र अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपील क्रमांक ४१६/२००८ च्या संदर्भात अपिलार्थी यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे तहसीलदार, देगलूर यांच्याकडून श्री. दंडेवार मारोती हुलगुंडे यांना " धनगड " जातीचे दिनांक २६-१०-१९९० रोजी दिलेले प्रमाणपत्र व श्री. प्रल्हाद दामोधर जाधव यांना दिनांक ०४-०७-१९९१ रोजी " लमाणी " जातीचे दिलेले प्रमाणपत्र तहसीलदार यांच्याकडून घेण्यासाठी संबंधितांनी त्यांच्याकडे दाखल केलेल्या कागदपत्रांच्या संचिकाच्या सत्यप्रतीची माहिती मागविली होती.

अपिलार्थीने त्यांच्या अपील क्रमांक ४१७/२००८ च्या संदर्भातील मूळ अर्जाव्दारे अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांना, श्री. सुरेश शेषेराव सोनकांबळे यांना दिनांक ११-०६-१९९९ रोजी दिल्या गेलेल्या " महार " जातीच्या प्रमाणपत्रासंदर्भात व श्री. राजुरे बालाजी विश्वनाथ यांना दिनांक १८-०७-१९९२ रोजी दिलेल्या " धनगर " जातीच्या प्रमाणपत्रासंदर्भात मागितली होती.

अपिलार्थीच्या या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक ४१६/२००८ च्या संदर्भात दिनांक २८-०९-२००७ रोजी व अपील क्रमांक ४१७/२००८ च्या संदर्भात दिनांक ०३-११-२००७ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम

अपिले दाखल केली. तथापि या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

वरील दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही अपिलाशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्वजण गैरहजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने लिखित नोटीशी व्यतिरिक्त दिनांक २०-०५-२००९ रोजी दुपारी ०१-५० वाजता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील पेशकार श्री. चिंप्रपू यांच्यामार्फत संदेश देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वत: किंवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने माहितीसाठीचे अनुक्रमे प्रथम अर्ज व प्रथम अपील केले होते असे म्हटले आहे व याप्रीत्यर्थ त्यांनी अपील क्रमांक ४१६/२००८ च्या संदर्भात मूळ अर्जासंदर्भात पोस्टाची पावती क्रमांक १३१६, दिनांक ३०-०७-२००७ व प्रथम अपिलाच्या संदर्भात पोस्टाची पावती क्रमांक ४५९० दिनांक २९-०९-२००७ असा संदर्भ दिला आहे. तसेच अपील क्रमांक ४१७/२००८ च्या संदर्भात मूळ अर्जासंदर्भात रजिस्टर्ड पावती क्रमांक ४५९३, दिनांक २९-१०-२००७ व प्रथम अपिलाच्या संदर्भात पावती क्रमांक ५१२९, दिनांक ०३-११-२००७ असा संदर्भ दिला आहे. मात्र या संदर्भात त्यांनी कोणताही वैध पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे या दोनही प्रकरणी प्रथम अर्ज व अपील खरोखरच दाखल केले होते किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या या दोनही प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागविली आहे, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना

अधिनियमातील कलम ११ मधील तरतूदी लक्षात घेऊन यासंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आपले आदेश पारित करावे लागतील.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०९-२००७ व ०३-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर कलम ११ च्या तरतुदीसह प्रथमतः निर्णय घेणे आयोगास आवश्यक वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी प्रथमतः संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे पोहोचला आहे याची खात्री करुन घ्यावी व नंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०९-२००७ व ०३-११-२००७ रोजीचे प्रथम अपील अर्ज पुनश्च सादर करावेत. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे, अपिलार्थीचे प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदी लक्षात घेऊन, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घ्यावी व या प्रकरणी आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ४१६/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ४१७/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

३. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०९-२००७ व ०३-११-२००७ रोजीच्या दोनही अपील अर्जांवर अपिलार्थीचे प्रथम अपील अर्ज अपिलार्थीकडून प्राप्त

झाल्यानंतर ४५ दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदी लक्षात घेऊन, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घ्यावी व या प्रकरणी आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ४१८/०८ व ४१९/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१८ व ४१९

निर्णय दिनांक २७-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक ४१८/०८ १ श्री. मुडगुरे दिगंबरराव लक्ष्मणराव
अपील क्रमांक ४१९/०८ १ श्री. शेख सलाहोद्दीन पि. चांदसाब
२ श्री. शेख अब्दुल नईम पि. अब्दुल अजीज

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०७-२००७ व दिनांक १८-०८-२००७ रोजी माहितीसाठीचे दोन स्वतंत्र अर्ज रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविले असता त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी

अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपील क्रमांक ४१८/२००८ संदर्भात दिनांक २८-०९-२००७ रोजी व अपील क्रमांक ४१९/२००८ च्या संदर्भात दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपिले दाखल केली असता या दोनही अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता माहिती देण्याचे टाळले असल्याने, त्यांनी विचाराधीन दोनही अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपील क्रमांक ४१८/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे श्री. मुडगुरे दिगंबरराव लक्ष्मणराव यांना दिनांक ०५-०८-१९९७ रोजी दिले गेलेल्या " धनगड " जातीच्या प्रमाणपत्रासाठी श्री. मुडगुरे दिगंबरराव लक्ष्मणराव यांनी त्यांच्या कार्यालयास केलेल्या मूळ अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या संचिकांच्या सत्यप्रतीची माहिती मागविली होती. अपील क्रमांक ४१९/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाने श्री. शेख सलाहोदीन पिता चांदसाब यांना दिनांक २४-०४-१९८३ रोजी आणि श्री. शेख अब्दुल नईम पिता अब्दुल अजीज यांना दिनांक १६-०९-१९८२ रोजी अनुक्रमे लद्दाफ व छप्परबंद ह्या जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास केलेल्या अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती आणि त्यांना जातीची प्रमाणपत्रे देण्याकरिता मंडळ निरीक्षक, तलाठी, पोलीस पाटील व सरपंच यांनी दिलेल्या अहवालाची माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक ४१८/२००८ व ४१९/२००८ च्या संदर्भात अनुक्रमे दिनांक २८-०९-२००७ व दिनांक १५-१०-२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली, तथापि या अपील अर्जांवर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील दोनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने लिखित नोटीशी व्यतिरिक्त दूरध्वनीव्दारे दिनांक २०-०५-२००९ रोजी दुपारी ०१-५५ वाजता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील अव्वल कारकून श्री. उस्मान यांच्यामार्फत संदेश देऊनही जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वतः किंवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने माहितीसाठीचे अनुक्रमे प्रथम अर्ज व अपील केले होते असे म्हटले आहे व याप्रीत्यर्थ त्यांनी अपील क्रमांक ४१८/२००८ च्या प्रथम अर्जासंदर्भात पोस्टाची पावती क्रमांक ५६८७, दिनांक ३०-०७-२००७ व प्रथम अपिलाच्या संदर्भात दिनांक २८-०९-२००७ असा संदर्भ दिला आहे. तसेच अपील क्रमांक ४१९/२००८ च्या प्रथम अर्जासंदर्भात रजिस्टर्ड पावती क्रमांक १४९८, दिनांक १८-०८-१९९७ व प्रथम अपिलाच्या संदर्भात पावती क्रमांक ४५८९, दिनांक ३०-१०-२००७ असा संदर्भ दिला आहे. मात्र या संदर्भात त्यांनी कोणताही वैध पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे या दोनही प्रकरणी अनुक्रमे प्रथम अर्ज व अपील खरोखरच दाखल केले होते किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या या दोनही प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागविली आहे, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदी लक्षात घेऊन, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आपल्याशी संबंधीत कार्यवाही करावी लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०९-२००७ व १५-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर प्रथमतः निर्णय घेणे आयोगास आवश्यक वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी प्रथमतः संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे पोहोचला आहे याची खात्री करुन घ्यावी, व नंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०९-२००७ व १५-१०-२००७ रोजीचे प्रथम अपील अर्ज पुनश्च सादर करावेत. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे, अपिलार्थीचे प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसाच्या आत अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदी लक्षात घेऊन, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घ्यावी व या प्रकरणी आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील क्रमांक ४१८/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ४१९/२००८ निकाली काढण्यात येत आहे.

३. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०९-२००७ व १५-१०-२००७ रोजीच्या दोनही अपील अर्जांवर अपिलार्थीचे प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदी लक्षात घेऊन, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४२०

निर्णय दिनांक २७-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,
जालना, तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना,
तालुका जिल्हा जालना

त्रयस्थ पक्ष : १ श्रीमती सईदा बेगम अब्दुल करीम

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविला असता त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता माहिती देण्यासाठी टाळले असल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातून दिनांक २०-०२-१९८७ रोजी सईदा बेगम अब्दुल करीम यांना " मोमीन " जातीच्या दिल्या गेलेल्या प्रमाणपत्रासाठी त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे असे प्रमाणपत्र घेण्यासाठी आवश्यक असलेल्या व त्यांच्याकडे दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती, हे प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित अधिकारी, मंडळ निरीक्षक यांच्याकडून केलेल्या चौकशी अहवालाच्या सत्यप्रती, याची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही - १९८७ सालाशी संबंधित आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या मते त्यांनी हे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाच्या पावती क्रमांक ४५८५ अन्वये दिनांक २९-१०-२००७ रोजी पाठविले होते. मात्र या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे सईदा बेगम यांना दिनांक २०-०२-१९८७ रोजी दिल्या गेलेल्या " मोमीन " जातीच्या प्रमाणपत्रासाठी सईदा बेगम यांनी त्यांच्या कार्यालयास केलेल्या मूळ अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या संचिकांच्या सत्यप्रतीची माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा दिनांक १८-०८-२००७ रोजीचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. मात्र अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले दिनांक १५-१०-२००७ रोजीचे कथित प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त झाले नाही, त्यामुळे त्यावर निर्णय होऊ शकला नाही, असे त्यांच्या कार्यालयाचे तत्कालीन तहसीलदार यांनी त्यांना सांगितले आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, ते या पदावर दिनांक २३-०३-२००९ रोजी रुजू झाले असून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीही कार्यवाही न करण्याचे कारण त्यांना ठाऊक नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने दिनांक २९-१०-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेले टपाल त्यांना प्राप्त झाले नाही. अपिलार्थीने जरी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये रजिस्टर्ड पावतीचा क्रमांक निर्देशित केला असला तरी यासंदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आता त्यांचा दिनांक १५-१०-२००७ रोजीचा, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी पाठविलेला कथित प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना हे आदेश निर्गमित होताच त्वरित पाठवावा. अपिलार्थीने त्यांचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पोहोचेल अशी व्यवस्था करावी व त्याची पोच जतन करुन ठेवावी. सदर अपील अर्ज अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी लक्षात घेऊन हे

आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी (श्रीमती संगीता नारायण वराडे, नायब तहसीलदार (महसूल) दिनांक २२-१२-२००४ ते २००९ पर्यंत कार्यरत) यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २७-०५-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१०

निर्णय दिनांक २७-०५-२००९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, अपिलार्थी

माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,

लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २९-११-२००६ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे ०१ जानेवारी २००१ ते ऑगस्ट २००६ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही मोठ्या स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागेल असे अपिलार्थीस अवगत केले. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी अपंग शाळा, मातोश्री वृध्दाश्रम इत्यादी योजनेसंदर्भात समाजकल्याण अधिकारी गट-अ जिल्हा परिषद यांच्याशी संपर्क साधण्याचे त्यांना सूचित केले.

तदनंतर माहिती प्राप्त होण्याची वाट पाहून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीस निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४-१२-२००६ रोजी एकूण ४५९ पृष्ठांची माहिती दिल्याचे दिसून येते. मात्र ही माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिनांक ०४-१२-२००६ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक २१-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिनांक ०४-१२-२००६ रोजी व्यक्तिश: प्राप्त झाली आहे. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याचे आयोगाकडे केलेल्या

व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीस ही माहिती जरी तांत्रिकदृष्ट्या बरोबर वाटत नसली तरी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच वर्षाची माहिती मागविली होती. त्यांनी मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी घेतलेला कालावधी व विशेषत: अपिलार्थीस त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी वेळ लागणार असल्याची दिलेली कल्पना पाहता, या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करणे आयोग या प्रकरणी उचित समजत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, अशी त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. तथापि या अभिप्रायाचे समर्थन त्यांनी व्दितीय अपील अर्जामध्ये कोणत्याही लेखी स्वरुपात केले नाही तसेच आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे, अपिलार्थीस त्यांनी निश्चित कोणती माहिती पुरविली आहे ती देखील आज रोजी उपलब्ध नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४२७
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. दिपक रंगनाथ काथवटे, : अपिलार्थी
भोईगल्ली,येवला ता.येवला,
जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त,नाशिक महानगरपालिका,
नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त, नाशिक महानगरपालिका,
नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त (प्र.),
नाशिक महानगरपालिका, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका,नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १८.११.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १८.११.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली व जन माहिती अधिकरी यांनी

माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सत्य माहितीची अपेक्षा असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २४.०६.२००८ रोजीच्या (दि.२५.०६.२००८ रोजी प्राप्त) मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाशिक महानगरपालिकेत दि. ०१.०१.२००६ ते दि. ०१.०५.२००८ या कालावधीमध्ये भरती केलेल्या कामगारासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "या कालावधीमध्ये रोजंदारीवर व अनुकंपा तत्त्वावर भरती केलेल्या कामगारांचे नाव,पत्ता व वय व त्यांना दिले जाणारे रोजचे वेतन, या कालावधीत रोजंदारी अनुकंपा तत्त्वावर भरती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या या कालावधीमध्ये परमनंट केलेल्या कर्मचाऱ्यांची अशाच प्रकारची माहिती, अनुकंपा तत्त्वावर कर्मचाऱ्यांच्या कोणत्या वारसास नोकरी दिली आहे, त्यांची नावे व पत्ते व कोणास नाही दिली व गार्डनमधील कर्मचाऱ्यांच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर किती वारसांना नोकरी दिली आहे,-या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात येऊन तपासण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या याच अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून संबंधित कर्मचाऱ्याची नावे इत्यादी तपशील दिल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दि. २६.०८.२००८ रोजी प्राप्त झाला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१०.२००८ रोजी निर्णय देऊन जन महिती अधिकारी

यांना अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना त्वरित पुरविण्याचे सूचित केले.या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोणतीही कालमर्यादा निश्चित करुन दिली नाही. तथापि अपिलार्थीस या आदेशानंतरही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नसल्याचे व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी तीन दिवसांत पुरविता येणे शक्य असल्याचे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. १३.१०.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस त्वरित माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी जन माहिती अधिकारी यांच्या दि. २१.०७.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, त्यांनी अपिलर्थीस मुद्दा क्र.४ च्या व्यतिरिक्त कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे माहिती हवी असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. मात्र या विनंतीचा कोणताही विचार न करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील माहिती न देता ती माहिती पाहण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलावले व मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात त्यांनी उलट अपिलार्थीकडून माहिती मागविली. जन माहिती अधिकारी यांची, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्याची अशाप्रकारची कृती, अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत असून या मुद्यावर

येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षिली आहे त्याच माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीत ही माहिती अर्जदारास पुरविणे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने टपालाद्वारे माहिती मागविली असता, अपिलार्थीस स्वतःच्या कार्यालयात माहिती पाहून जाण्याचे सूचित करण्याची जन माहिती अधिकारी यांची या प्रकरणातील ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांच्या आवाक्याबाहेरचे काम होते किंवा यासाठी त्यांना त्यांच्या कार्यालयातील मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत होती अशातील कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीतच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३.१०.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे सूचित करुनही माहिती पुरविली नाही. अशाप्रकारच्या कृतीद्वारे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती न देऊन व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे व त्यांच्या दि. २१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविल्याचे अशाप्रकारे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस या प्रकरणी पात्र असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्पष्ट स्वरुपात माहिती मागविली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महानगरपालिकेतर्फे गार्डन विभागात अनुकंपा तत्त्वावर कर्मचाऱ्यांच्या कोणत्या वारसांना नोकरी दिली आहे, त्यांची नावे, पत्ते व पद याची माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीने कोणाही एखाद्या कर्मचाऱ्यास डोळयासमोर ठेवून जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या या मुद्यावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडील गार्डन शाखेमध्ये दि. ०१.०१.२००६ ते ०१.०५.२००८ या कालावधीमध्ये ज्या कर्मचाऱ्यांची अनुकंपा तत्त्वावर भरती करण्यात आली आहे, त्या सर्व कर्मचाऱ्यांची अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आता विनामूल्य देणे भाग आहे. अपिलार्थीने सर्व कर्मचाऱ्यांची माहिती मागविली असता, अपिलार्थीकडून त्यांना ज्या कर्मचाऱ्यासंदर्भात माहिती अपेक्षित आहे, त्या कर्मचाऱ्यांची नावे विचारण्याची जन माहिती अधिकार यांची ही कृती, अपिलार्थीस माहिती देण्यापेक्षा अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा त्यांचा हेतू असल्याचे अधिक स्पष्ट करते, असे आयोगाचे मत आहे. इत:पर त्यांनी आपली अशाप्रकारची कार्यशैली बदलावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक रंगनाथ काथवटे,भोईगल्ली,येवला ता.येवला,जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (प्र.),नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन),नाशिक महानगरपालिका,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, नाशिक महानगरपालिका,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४२८
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. जयप्रकाश जोशी, : अपिलार्थी
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक संचालक (नगर रचना),
नाशिक महानगरपालिका, नाशिक.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
नाशिक महानगरपालिका,नाशिक.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता (नगर रचना),
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही, जनहितार्थ असून ही माहिती देण्यासाठी जन माहिती व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे केलेली माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे नाशिक शहरातील महात्मा गांधी रोडवरील 'सारडा संकुल' या व्यावसायिक संकुलाबाबत एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलैल्या माहितीमध्ये - सारडा संकुल इमारतीचे बांधकाम जन माहिती अधिकारी यांनी मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे आहे काय? इमारत वापराचा परवाना तथा पूर्णत्त्वाचा दाखला देण्यात आला आहे काय? इमारतीमध्ये तळघराची व्यवस्था आहे काय? असल्यास कशासाठी? इमारतीच्या खालील मजल्याला किती गाळयांचा परवाना आहे? व त्यांचे आकारमान काय आहे? इमारतीचा तळमजला सोडून उर्वरित वरील मजल्यावर कुठल्या कारणास्तव वापराबाबत आराखडयात मंजूरी देण्यात आली आहे? सदर संकुलातील व्यावसायिकांना कुठल्या दराने घरपट्टी आकारली जाते? आकारलेला कर आजपावेतो पूर्णतः वसूल झाला आहे का? नसल्यास किती कालावधीसाठी थकबाकी प्रलंबित आहे? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८(ञ) व कलम ११ प्रमाणे त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने ती माहिती देण्यास अपिलार्थीस नकार दिला. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०४.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाला पत्र देऊन त्यांचा खुलासा मागवावा व तदनंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशा अर्थाचा निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर देखील कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, नाशिक शहरातील मध्यवस्तीत संबंधित मिळकतधारकाने मंजूर आराखडा क्षेत्र ३२००० चौ.फू. च्या जागी

६०००० चौ.फू. बांधकाम केल्याचे त्यांच्या ऐकीवात आहे. हे बांधकाम गेल्या ३० वर्षापासून पूर्ण झाले आहे. परंतु अद्यापपावेतो या इमारत बांधकामास पूर्णत्त्वाचा दाखला प्राप्त नाही व या संदर्भात महानगरपालिकेने मिळकतधारकला कायदेशीर नोटीसही दिली नाही, तसेच कायद्यातील तरतुदीनुसार मिळकतधारकाकडून महानगरपालिकेतर्फे योग्य दराने कर वसूल केला जात नाही. सदर कराची वसूली न झाल्याने, पर्यायाने महानगरपालिकेकडे नागरिकांच्या हिताकरिता करावयाच्या कामांसाठी निधी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित आहे आणि या व्यापक जनहिताप्रित्यर्थ त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे. आयोगास त्यांनी पुढे असेही अवगत केले की, या इमारतीच्या गाळयांचे, इमारतीस पूर्णत्त्वाचा दाखला नसतानाही खरेदी-विक्रीचे व्यवहार गेल्या ३० वर्षांपासून अव्याहतपणे चालू आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्याकरिता त्रयस्थ पक्षाकडे त्यांचे अभिप्राय मागितले असता, त्यांनी दि.०७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, माहिती अधिकार अधिनियम हा त्यांना लागू होत नसल्याचे नमूद केले आहे. या पृष्ठयर्थ त्रयस्थ पक्षाने त्यांची विचाराधीन वास्तू, 'जनक कन्स्ट्रक्शन प्रा.लि.' या कंपनीच्या खाजगी मालकीची असल्याने त्यांची माहिती देणे चुकीचे ठरेल, असे जन माहिती अधिकारी यांना कळविले व तसेच त्रयस्थ पक्षाने त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीकडून त्यांना भविष्यामध्ये मानसिक किंवा आर्थिक ब्लॅकमेलिंग होण्याची शक्यता संभवत असल्याने भविष्यात अशाप्रकारचा त्रास झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जन माहिती अधिकारी यांच्यावर येईल, असे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. या सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांची मते व अभिप्राय मागितल्याचे दिसून येते. मात्र अपिलार्थीने त्यांच्या

युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या व्यापक जनहिताचा विचार करता, या प्रकरणी नाशिक महानगरपालिकेकडे 'सारडा संकुल' या इमारतीचा जो मंजूर केलेला बांधकाम नकाशा उपलब्ध आहे, त्या नकाशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ते ५ च्या संदर्भात माहिती मिळू शकेल, असे आयोगास वाटते. मुद्दा क्र.६ च्या संदर्भात कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी आयोगास असे अवगत केले की, अशाप्रकारच्या पूर्णत्त्वाचा दाखला न दिला गेलेल्या बांधकामासंदर्भात कशाप्रकारे कर आकारणी करावयाची याची महानगरपालिकेने एका ठरावाद्वारे निश्चिती केली आहे. त्यांच्याकडे या इमारतीतील मिळकतधारकांकडून अद्यापपावेतो किती थकबाकी प्रलंबित आहे, याची माहिती उपलब्ध आहे व ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने कोणत्याही व्यक्तिच्या खाजगी बाबीशी संबंधित अशी मागितलेली नाही. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे ही इमारत अथवा तिचा काही भाग जर भाडेतत्त्वावर दिला गेला असेल व इमारतीतील गाळयांचे खरेदी-विक्रीचे व्यवहार जर राजरोसपणे होत असतील तर, या इमारतीच्या मंजूर बांधकामाचे मंजूर आराखडे संबंधित गाळेधारकांकडे व जिल्हाधिकारी, नोंदणी महानिरीक्षक इ. कार्यालयालयाकडे निश्चित स्वरुपात उपलब्ध असणार. अपिलार्थीने मूळ अर्जात संदर्भित केलेली इमारत शहरातील सर्व जनता उघड डोळयांनी पाहत आहे. त्यामुळे या बांधकामाबाबत आता लपविण्यासारखे काही उरले नाही. अशाप्रकारे ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची ठरते, त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना उघड करावी लागेल. या इमारतीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता फक्त या इमारतीस परवानगी देताना त्यांनी मंजूर केलेले नकाशे एवढीच माहिती उपलब्ध आहे व ही माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. हे व मंजूर नकाशासंदर्भात इतर प्रकरणांमधील आयोगाने यापूर्वी घेतलेली भूमिका पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी महात्मा गांधी रोडवरील 'सारडा संकुल' या इमारतीच्या बांधकामास परवानगी दिलेल्या मंजूर प्लॅनच्या प्रती व मुद्दा क्र. ६ शी संबंधित करासंदर्भातील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयप्रकाश जोशी,द्वारा, जोटो ॲब्रॅसिव्हज प्रा.लि. भूखंड क्र.सी-११/४३, नाईस एरिया,सातपूर,नाशिक-४२२ ००७.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नगर रचना),नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,नाशिक महानगरपालिका,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४२९
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. विजय रामराव शिंदे, : अपिलार्थी
मु.पो. सायाळे,ता.सिन्नर,जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,सिन्नर,जि. नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,सायाळे,
ता.सिन्नर,जि.नाशिक

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
सिन्नर,जि. नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना सायाळे ग्राम पंचायत, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील ग्राम पंचायत रेकॉर्ड अपूर्णतेबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली नाही. तसेच या अर्जामध्ये त्यांनी, त्यांना दि. २०.१२.२००७ रोजी सायाळे ग्राम पंचायत रेकॉर्ड अपूर्णतेबाबत जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर झालेल्या चौकशीच्या अहवालाच्या माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २४.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिन्नर तालुक्यातील सायाळे ग्राम पंचायतीच्या रेकॉर्ड अपूर्णतेबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"दि. २०.१२.२००७ रोजी सायाळे ग्राम पंचायतीचे संपूर्ण रेकॉर्ड (हा शब्द मूळ अर्जाच्या प्रतीमध्ये अस्पष्ट दिसून येत आहे) चौकशी कामी आपणाकडे ताब्यात मिळाले आहे. सदर विषयी आजपर्यंतचा संपुर्ण शासकीय अहवाल मिळावा."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, "ग्राम पंचायत सायाळे येथील दि. २०.१२.२००७ रोजीचे दप्तर अपुर्ततेबाबत खास चौकशी केली जात आहे, चौकशी पूर्ण होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल" असे कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. ३०.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यानी कोणताही निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपिलावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, दि. २०.१२.२००७ रोजी सायाळे ग्राम पंचायतीच्या रेकॉर्डच्या अपूर्णतेबाबत चौकशी केली जात होती व या चौकशीच्या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि.०२.०९.२००८ रोजी पुरविली आहे. सदर अहवाल अपिलार्थीस मिळाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीने त्यावर पोचसही देखील दिली असल्याचे त्यांनी आयोगास दाखविले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या चौकशी संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.०४.२००८ रोजी प्रथम अर्ज केला होता, त्यावेळी ही चौकशी चालू असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या पत्राने कळविले आहे. तथापि आयोगाकडे झालेल्या सुनावणीमध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने दि. २०.१२.२००७ रोजी सायाळे ग्राम पंचायतीच्यासंदर्भात केलेल्या तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०५.२००८ रोजी आपला अहवाल तयार करुन ठेवला होता. परंतु असे असतानाही त्यांनी अपिलार्थीस दि. २०.०५.२००८ रोजी चौकशी चालू आहे व चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता येईल, असे कळविले व अंतिमतः अपिलार्थीस त्यांच्याकडील अहवालाची प्रत दि. ०२.०९.२००८ रोजी उपलब्ध करुन दिली. या संपूर्ण प्रकारावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०५.२००८ रोजीच्या प्रथम पत्राद्वारे असत्य माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास त्यांनी सत्य माहिती पुरविणे अभिप्रेत आहे. परंतु या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः असत्य माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे आयोगास आढळले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. ०२.०९.२००८ रोजी पुरविली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात आहे.

**नाशिक**
**दिनांक : २८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय रामराव शिंदे,मु.पो. सायाळे,ता.सिन्नर,जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,सायाळे,ता.सिन्नर,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,सिन्नर,जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३०
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. जयंत शंकरलाल मुथा, : अपिलार्थी
शिवाजीनगर,चिंचखेड रोड,
मु.पो.पिंपळगाव बसवंत,ता.निफाड,जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
चांदवड, जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (ग्रा)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
चांदवड, जि.नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
चांदवड, जि.नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०८.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्ज केला असता, प्रथमतः माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी

यांनी त्यांना दि. २३.०१.२००८ रोजी काही माहिती पुरविली ही माहिती अपूरी, दिशाभूल करणारी व खोटी असल्याची त्यांना खात्री असल्याने त्यांनी स्वत: माहिती प्राप्त होण्याकरिता त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमत: त्यांच्या दि. २०.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि. ०१.०१.१९९८ ते दि. ३१.१२.२००६ या कालावधीमधील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- चांदवड विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी,मर्यादित या कंपनीने औद्योगिक वापरासाठी थ्री फेज ग्राहकांचे मंजूरभार २० किलो वॅट पेक्षा कमी असे ग्राहक व मंजूर २० किलो वॅट पेक्षा जास्त असे ग्राहक, या ग्राहकांची यादी व त्यांना आकारलेला दंड व यासंदर्भात (MERC) विद्युत नियामक आयोगाचे जास्तीच्या रकमेच्या वसूलीबाबत आणि त्याच्या परताव्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे प्रथम अपील केल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयाचे दि. २१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पाठविली. तथापि ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे अपिलार्थीस वाटल्यावरुन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्यापमाणे अपील दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी म.रा.वि.वि.कं.तर्फे दि. २१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीची विसंगती पुराव्यासह त्यांच्या निदर्शनास आणलेली आहे.

अपिलार्थीच्या या युक्तिवादास जन माहिती अधिकार यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी दुजोरा दिला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाने दि. २१.०१.२००८ रोजीच्या

अर्जातील माहिती परत तपासून घेऊन त्यातील विसंगती असल्यास, ती दूर करुन अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे आता कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मा हिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकार यानी पुरविलेल्या माहितीमध्ये पिंपळगाव,चांदवड व निफाड या उपविभागातर्फे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्यांवर 'निरंक' अशी माहिती दर्शविली आहे. अपिलार्थी यांच्या मते पिंपळगाव येथे मंजूर भारापेक्षा जास्त भार घेतलेल्या थ्री फेज ग्राहक या परिक्षेत्रात उपलब्ध आहेत. त्यांची नावे व या अनुषंगाने इतर माहिती त्यानी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या या पुराव्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०१.२००८ रोजी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये विसंगती असल्याचे स्पष्ट होत आहे. अज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पिंपळगाव, चांदवड व निफाड या उपविभागातर्फे अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे पुनर्विलोकन करुन त्यामध्ये विसंगती आढळल्यास ती दूर करुन अपिलार्थीस माहिती देण्यास आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना सत्य स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीने त्याच्या निदर्शनास, जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये जर काही विसंगती आढळली तर त्यांनी संबंधित सहा.अभियंता यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी व तसा अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत सादर करावा.

या प्रकरणी आयोगाचे असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने दि. २०.११.२००७ रोजी मागितलेली माहिती दि. १९.१२.२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत असताना त्यांना

ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २१.०१.२००८ रोजी प्राप्त झाली आहे.अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी लागलेल्या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. वाणी) हे आता नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या विलंबाप्रित्यर्थ कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे विनामूल्य पुरवावी.

३. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे आवश्यकता असल्यास संबंधित सहायक अभियंता यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी व तसा अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत सादर करावा.

**नाशिक**
**दिनांक : २८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयंत शंकरलाल मुथा, शिवाजीनगर,चिंचखेड रोड,मु.पो.पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.चांदवड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (ग्रा)महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी मर्या.चांदवड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३१
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. सुनिल दावलराव घरटे, सिडको,नाशिक. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त,नाशिक शहर, नाशिक : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,नाशिक शहर,नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय,नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०५.०८.२००८ रोजीचे, राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील, आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश दिले नाहीत व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोलीस वेलफेअर फंडातील रक्कम परत मिळण्यासाठी केलेल्या अर्जाविषयी

काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "आमची रक्कम आम्हाला व्याजासह मिळेल अगर कसे?शासनाचा नियम नसताना, त्यांच्याकडून वसूल केलेली रक्कम जर त्यांनी बँकेत जमा केली असती तर ती रक्कम आता दामदुप्पट झाली असती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडील अपिलार्थीस रकमेचे व्याज आता देणार अगर कसे, अथवा जमा असलेली रक्कम एक महिन्याचे आत परत होईल का?"- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिश: अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत केणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी देखील अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याने व अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीस कुठल्याही प्रकारची वस्तुस्थिती अवगत न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांचा विभाग व अपिलार्थी यांच्यामध्ये रस्त्यावरील बेकायदेशीररित्या उभी केलेली वाहने ओढून नेण्याकरिता क्रेनचा वापर करण्यासंदर्भात करार झाला होता. या करारामध्ये अपिलार्थीस या कामी प्राप्त होणाऱ्या रकमेपैकी २० टक्के रक्कम ते पोलीस वेलफेअर फंडात जमा करण्याची लेखी परवानगी अपिलार्थीने पोलीस आयुक्तालय, नाशिक यांना दिली होती. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीच्या बीलातील रक्कम पोलीस वेलफेअर फंडात जमा केली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली रक्कम त्यांना परत करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पोलीस महासंचालक कार्यालयास संपर्क साधला असता, महासंचालक कार्यालयाने त्यांना पोलीस वेलफेअर फंडात जमा झालेली रक्कम परत करता येत नाही, अशा अर्थाच्या सूचना दिल्या. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या त्यांच्या बिलातून वसूल केलेली रक्कम त्यांना ते परत देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबाबत कारणे,स्पष्टीकरणे, अभिप्राय अपेक्षित करणाऱ्या स्वरुपाची माहिती मागविली आहे, जी अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास, ती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्न विचारणे, कारणे विचारणे व त्यांच्या प्रश्नांना जन माहिती अधिकारी यांनी उत्तरे व स्पष्टीकरण देणे अशाप्रकारची प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादात वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. २४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस या प्रकरणाची वस्तुस्थिती अवगत केली आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जरी अधिनियमातील तरतुदींशी विसंगत होती तरीही अपिलार्थीच्या दि. १४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजेच अंदाजे आठ महिने इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतर प्रतिसाद दिला आहे, ही बाब आयोग नजरेआड करु शकत नाही. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या संबंधित सहायकांनी त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विलंबाने दिली. संबंधित सहायकांकडे त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांना

आवश्यक तो प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत प्रतिसाद देता आला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतुद आहे. हे पाहता, अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे सर्व संबंधित सहायक जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकाऱ्यांच्या सर्व संबंधित सहायकांवर अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस पोलीस आयुक्त, नाशिक यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. पोलीस आयुक्त, नाशिक यांना, जन माहिती अधिकारी यांना विलंबाने माहिती पुरविण्यास जबाबदार असलेल्या या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायकांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : २८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल दावलराव घरटे, एन-५२ ए.डी.२/१/१, राजरत्ननगर,सिडको,नाशिक

२.	जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	पोलीस आयुक्त,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३२
निर्णय दिनांक २८-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बाळासाहेब शहाराम सोमासे,<br>संभाजी नगर,पारेगावरोड, येवला<br>जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, येवला,<br>जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,निफाड,<br>जि.नाशिक. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लावूनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दंड व शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित न केल्याने आणि माहिती देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २१.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा पुरवठा खात्याच्या नियंत्रणाखालील भारत गॅस

व स्वागत गॅस एजन्सी, येवला यांच्यासंदर्भात एकूण १४ मुद्यांद्वारे विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दि. २४.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित गॅस एजन्सीकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पाठविला व त्याप्रमाणे अपिलार्थीस वेगळया पत्राद्वारे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०७.२००८ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी संबंधित गॅस एजन्सीस माहिती पुरविण्याचे लेखी आदेश देण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी दि. २१.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्षपणे उपलब्ध नसते. संबंधित गॅस एजन्सीवर जीवनावश्यक वस्तूंचा कायदा अधिनियम १९६६ मध्ये विहित केलेल्या मर्यादेतच त्यांना नियंत्रण ठेवणे अभिप्रेत आहे. या कायद्यानुसार त्यांना नियमितपणे गॅस एजन्सीकडे असलेले गॅसचे साठे तपासणे व या संदर्भात संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे अहवाल सादर करणे व तदनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने गॅस एजन्सीचे परवाने मंजूर करणाऱ्या प्राधिकरणाकडे हे अहवाल पाठविणे एवढयापुरते त्यांचे अधिकार मर्यादित आहेत. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी प्रथमतः संबंधित गॅस एजन्सीकडून मागविली, तथापि गॅस एजन्सीकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्याच्याकडे

प्रत्यक्षपणे 'शासकीय अभिलेखे' या स्वरुपात उपलब्ध नाही. त्यांचे संबंधित गॅस एजन्सीवर नियंत्रण देखील मर्यादित स्वरुपाचे आहे, आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधित गॅस एजन्सीकडे वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. परंतु संबंधित एजन्सी त्यांना माहिती उपलब्ध करुन देत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गॅस वितरकांशी संबंधित असल्याने व गॅस वितरकांना गॅस वाटपाचे परवाने मंजूर करण्याऱ्या गॅस कंपनीवर केंद्र शासनाच्या पेट्रोलियम खात्याचे नियंत्रण आहे हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची मागणी त्यांनी संबंधित पेट्रोलियम कंपनीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यास त्यांना ती माहिती अधिक सुलभतेने प्राप्त होऊ शकेल, असे अपिलार्थीस या मुद्यावर सूचविण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० चे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी संबंधित गॅस एजन्सीच्या फेब्रुवारी, मार्च व एप्रिल, २००८ मध्ये केलेल्या तपासणी अहवालाची प्रत मागितली आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासकीय अभिलेखे म्हणून निश्चितपणे उपलब्ध असणार. सबब अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश त्यांना निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यासंदर्भात संबंधित गॅस एजन्सीकडे परत एकदा पाठपुरवा करुन अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न करावा. जर या कालावधीमध्ये अपिलार्थीस गॅस पुरवठाधारकाकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, तर अपिलार्थीस तसे याच कालावधीमध्ये पत्राद्वारे कळवावे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असताना ती माहिती अपिलार्थीस का दिली नाही, असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज

करतेवेळी जन माहिती अधिकारी म्हणून दुसरे अधिकारी (श्री. उदय किसवे, सध्या भुसावळ,प्रांत अधिकारी म्हणून कार्यरत) कार्यरत होते, त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती न देण्याचे कारण त्यांना आता सांगता येणार नाही. संबंधित जन माहिती अधिकारी हे आता जरी या पदावरुन बदलून गेले असतील तरी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अधिनियमाद्वारे विहत केलेल्या मुदतीत देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नसल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस खचितच पात्र ठरत आहेत, हे पाहता, जिल्हाधिकारी, नाशिक/जळगाव यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांसंदर्भात अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने, संबंधित गॅस एजन्सीकडे वरील मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कालावधीत परत एकदा पाठपुरावा करुन त्याचा तपशील अपिलार्थीस याच कालावधीमध्ये कळवावा.

४. जिल्हाधिकारी, नाशिक/जळगाव यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब शहाराम सोमासे,संभाजी नगर,पारेगाव रोड, येवला, ता.येवला, जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, येवला,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,निफाड,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नाशिक/जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३३
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, पंचवटी, नाशिक. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
संत ज्ञानेश्वर विद्यालय,कातरणी,
ता.येवला,जि.नाशिक. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
संत ज्ञानेश्वर विद्यालय,कातरणी,
ता.येवला,जि.नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. २८.०५.२००९ रोजीचे रु.२०/- इतक्या किमतीच्या कोर्ट-फी-स्टॅम्प लावलेल्या पत्राद्वारे एक अर्ज जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत सादर केला असून, यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विचाराधीन अपील प्रकरणाशी संबंधित सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील क्र. ४३३/०८ हे, अपिलार्थी स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील आयोगाकडे वरीलप्रमाणे मागे घेतले असल्याने, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ४३३/०८, दि.११.०१.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड,३,संतोषी कृपा,आडगाव नाका,पंचवटी, नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,संत ज्ञानेश्वर विद्यालय, कातरणी, ता.येवला,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,संत ज्ञानेश्वर विद्यालय, कातरणी, ता.येवला, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३४
निर्णय दिनांक २८-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गोविंद तानाजी शिलावट,<br>नाशिक शहर, जि.नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन)<br>पोलीस आयुक्तालय,नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)<br>पोलीस आयुक्तालय,नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

प्रथम अर्ज दिनांक : **१०.०१.२००८** प्रथम प्रतिसाद दिनांक : **२५.०४.२००८**

प्रथम अपील दिनांक : **२९.०२.२००८** प्रथम अपील निर्णय दिनांक : **नाही**

द्वितीय अपील दिनांक : **०७.०६.२००८**

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस पदोन्नती प्राप्त न झाल्याने व त्यांच्यापेक्षा सेवाजेष्ठतेमध्ये कनिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्याने, त्यांचे मूळ वेतन रु.७००/- ने कमी होत आहे. अपिलार्थी दोन वर्षाने सेवानिवृत्त होत असूनही त्यांच्या पदोन्नतीस हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन महिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आजपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आली नसून त्यांना देय कालावधीनंतर विलंबाने पदोन्नती देण्यात आली.त्यांना माहिती देण्यासाठी विलंब लावला, त्यामुळे संबंधितावर कारवाईचे आदेश व्हावेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्षतः उपलब्ध नव्हती. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापना शाखेची मदत घ्यावी लागत होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी आस्थापना शाखेतील संबंधितांना एकूण ५ वेळा स्मरणपत्रे पाठवूनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणतीही कार्यवाही न केल्याने त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद देण्यासाठी विलंब लागला व त्याप्रमाणे त्यांनी अखेरीस अपिलार्थीस त्यांच्या दि. १०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस वस्तुस्थिती कळविली.

जन अपिलीय अधिकरी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, संबंधितांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भातील आवश्यक ती नस्ती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर न केल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय झाला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थी म्हणतात, त्याप्रमाणे त्यांच्या दि. १०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास व दि. २९.०२.२००८ रोजी प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद अथवा निर्णय दिला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि.१०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०८.१९७७ नंतर व सन १९७८-७९ मध्ये पोलीस कर्मचारी, पोलीस नाईक,पोलीस हवालदार व सहा.पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली, या विषयावर- "वरील पदोन्नती अर्जदार

यांना उशिरा देण्याचे कारण काय? व अर्जदारानंतर भरती झालेल्या सन १९७८-७९ च्या लोकांना अगोदर पदोन्नती देण्याचे कारण काय? व संबंधित कागदपत्र मिळावीत." अशाप्रकारची माहिती मागितली होती. यापैकी अपिलार्थीस त्यांना पदोन्नती उशिरा देण्याचे कारण व १९७८-७९ च्या लोकांना अगोदर पदोन्नती देण्याचे कारण, या मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्यावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे विचारणे, खुलासे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या निर्णयाबद्दलची कारणे व खुलासे देणे अशाप्रकारची प्रक्रिया मूळात अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येईल की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याचस्वरुपात अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया 'माहिती मागणे' व 'माहिती देणे' यामध्ये अभिप्रेत आहे.

मात्र अपिलार्थीच्या अर्जातील, "संबंधित कागदपत्रे मिळावीत" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही १९७८-७९ च्या पोलीस कर्मचारी, पोलीस नाईक,पोलीस हवालदार व सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना दिलेल्या पदोन्नती, या विषयाशी संबंधित त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभाग या विभागाशी संबंधित आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये सन १९९५-२००७ या विशिष्ट कालावधीशी संबंधित माहिती हवी असल्याचे स्पष्टपणे लिहिलेले आहे. हे पाहता जन माहिती अधिकरी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये निर्देशित केलेल्या पदोन्नतीसंदर्भात सन १९९५-२००७ या कालावधीतील संपूर्ण

माहिती त्यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०२.२००८ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे अपेक्षित असलेला प्रथम प्रतिसाद न देता अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, संबंधित शाखेकडून माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत, असे खुलासेवजा पत्र पाठविले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी केवळ माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेला अधिकारीच संपूर्णपणे जबाबदार असतो, असे नसून अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचा "माहिती अधिकारी" या शब्दाच्या  व्याख्येमध्ये समावेश होतो. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेकडून त्यांना, त्यांनी संबंधित शाखेला ५ वेळा स्मरणपत्रे पाठवूनही माहिती न दिली गेल्याने त्यांना अपिलार्थीस त्यांना अंतिमतः माहिती पुरविता आली नाही. हे पाहता, पोलीस आयुक्त कार्यालयातील, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित आस्थापना शाखेतील सर्व कर्मचारी व अधिकारी यासाठी जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. यास्तव पोलीस आयुक्त,नाशिक यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्या आस्थापना शाखेतील सर्व संबंधित सहायकांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न देऊन संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द झाले आहे. त्यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्याच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा

अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद सचिव (गृह) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती व त्यांच्या वेळोवेळीच्या पदोन्नतीसंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती (टिपणीच्या प्रतीसह) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

३. पोलीस आयुक्त,नाशिक यांना, त्यांच्या कार्यालयातील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित, आस्थापना विभागातील,जन माहिती अधिकारी यांच्या सर्व संबंधित सहायकांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद तानाजी शिलावट,पोलीस हवालदार ब.नं.४६९, पंचवटी पोलीस स्टेशन,नाशिक शहर, जि.नाशिक-४२२१०१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	पोलीस आयुक्त,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	सचिव (गृह), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३५
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. जयप्रकाश जोशी, : अपिलार्थी
नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रैतवादी
सहायक संचालक (नगर रचना),
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
नाशिक महानगरपालिका,नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,नगररचना
नाशिक महानगरपालिका,नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम अर्ज दिनांक : | **२०.०२.२००८** | प्रथम प्रतिसाद दिनांक : | **नाही,** (दि. ०४.०३.२००८ रोजी अर्ज कर विभागाकडे पाठवून दिला.) |
| प्रथम अपील दिनांक : | **१९.०३.२००८** | प्रथम अपील निर्णय दिनांक : | **११.०४.२००८** |
| | द्वितीय अपील दिनांक : | **०२.०५.२००८** | |

आज रोजी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, नाशिक शहरातील मध्यवस्तीत संबंधित मालमत्ता धारकाने चॅरिटेबल ट्रस्ट बनवून उद्दीष्टांविपरीत मिळकतीचा वापर करीत आहे,

त्यामुळे आजुबाजूच्या नागरिकांना प्रचंड गैरसोयीस तोंड द्यावे लागत आहेत. महानगरपालिकेचे अधिकारी संबंधित मालमत्ता धारकास करामध्ये विशेष सवलत देऊन मिळकतधारकास मनमानी पध्दतीने वापर करण्यास सहाय्य करीत आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा विपर्यास करुन त्यांना जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये वर उल्लेखित केल्याप्रमाणे युक्तिवाद केला व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कराव्यतिरिक्त त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यावरील माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती उघड करण्याबाबत दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्रयस्थ पक्षाकडे संमती मागितली असता, त्रयस्थ पक्षाने त्यांच्याकडील दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांची माहिती उघड करण्यास जन माहिती अधिकारी यांना नकार कळविल्याने त्यांनी, अपिलार्थीस ही माहिती दिली नाही.

जन अपिलीय अधिकरी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. १९.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. ११.०४.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमध्ये- नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील नंदिनी नाशिक क्लबच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये - सदर मिळकतीचे आराखडे कुठल्या कारणासाठी वा वापरासाठी मंजूर केले होते? सदर ठिकाणी उच्चभ्रू लोकांसाठी व्यावसायिक रीतीने मद्यपानासहित क्लब चालवला जातो.तसेच उर्वरित भागात मंगल कार्यालय, स्वागत समारंभ व

विविध कार्यक्रमांसाठी वापर होत आहे. त्यास अधिकृत परवाना प्राप्त आहे काय? सदर मालमत्तेवर कुठल्या रीतीने तथा दराने कर आकारला आहे, आकारलेला कर आजपावेतो पूर्णतः वसूल झाला आहे काय? नसल्यास किती कालावधी पासून थकबाकी रकमेसहित प्रलंबित आहे, यासंबंधी संपूर्ण नस्तीसह माहिती, -या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती मागविली आहे, त्यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे बहुतांश मुद्यांवर खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील नंदिनी-नाशिक क्लबचे आराखडे कोणत्या वापरासाठी मंजूर केले आहे, या मुद्याशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे या क्लबच्या बांधकामाच्या संबंधित दिलेल्या पूर्णत्त्वाच्या प्रमाणपत्रामध्ये उपलब्ध आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील, या मालमत्ताधारकाचे आराखडे कोणत्या कारणास्तव मंजूर केले आहेत, याची माहिती अपिलार्थीस मिळू शकेल. कर विभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कराविषयीच्या मुद्यावरील माहिती दि. ०२.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविली आहे. ही माहिती संबंधितांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित त्यांना अपेक्षित माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०८.०८.२००१ रोजीच्या विचाराधीन इमारत वापराच्या पूर्णत्त्वाच्या दाखल्याची प्रत दिल्यास अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील व त्यांना देय असलेली माहिती प्राप्त होऊ शकेल. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी, त्यांच्याकडील नंदिनी नाशिक क्लब या इमारतीच्या वापर पूर्णत्त्वाच्या दाखल्याची प्रत, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नंदिनी-नाशिक क्लब या इमारतीस दिलेल्या पूर्णत्त्वाच्या दाखल्याची दि.०८.०८.२००१ रोजीची प्रत हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जयप्रकाश जोशी,द्वारा जीटी ॲब्रेसिव्हज प्रा.लि.,सी-११/४३,नाईस एरिया, सातपूर, नाशिक-४२२ ००७.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,नगररचना, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नाशिक महानगरपालिका,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३६
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. मधुकर नथु घुगे, सिडको, नवीन नाशिक : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), नाशिक शहर,जि.नाशिक : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),पोलीस आयुक्तालय,नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रथम अर्ज दिनांक : **२८.१२.२००७** प्रथम प्रतिसाद दिनांक : **२०.१२.२००८**

प्रथम अपील दिनांक : **०६.०२.२००८** प्रथम अपील निर्णय दिनांक : **नाही**

द्वितीय अपील दिनांक : **२६.०२.२००८**

आज रोजी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो निर्णय दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. २०.१२.२००८ रोजी

उपलब्ध करुन देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. ०६.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही, याचे कारण त्यांना आयोगास स्पष्ट करता आले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अंदाजे अकरा महिने इतक्या विलंबाने दि. २०.१२.२००८ रोजी म्हणजे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीस ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना इतका कालावधी लागण्यासाठीचे सर्वसाधारण परिस्थितीत कोणतेही कारण समर्थनीय असू शकत नाही. अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्याचे कारण, प्रामुख्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या शाखेशी संबंधित आहे, त्या शाखेने अथवा लिपीकाने दिली नसल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी अकरा महिने इतका असमर्थनीय विलंब झाला आहे असे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी केवळ माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेला अधिकारीच संपूर्णपणे जबाबदार असतो, असे नसून अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे सर्व संबंधित कर्मचारी/अधिकारी यांचा "माहिती अधिकारी" या शब्दाच्या  व्याख्येमध्ये समावेश होतो. अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ाली आहे. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना उघड करण्यासाठी

घेतलेला कालावधी हा, निश्चितच कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय असू शकत नाही, या मुद्याकडे देखील दुर्लक्ष करणे योग्य होणार नाही. अशाप्रकारे या प्रकरणी अपिलार्थीस असमर्थनीय विलंबाने माहिती पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी संबंधित त्यांच्या सर्व सहायक कर्मचाऱ्यांनी स्वतःला, अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द केले आहे.सबब पोलीस आयुक्त, नाशिक यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच त्यांनी या मुद्यासंदर्भात आयोगाकडे कोणतेही लेखी स्वरुपात आपले अभिप्राय नोंदविलेले नाहीत, हे पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. पोलीस आयुक्त, नाशिक यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर नथु घुगे, एन-५२/केए १/२८/३,सिंहस्थनगर,सिडको, नवीन नाशिक-४२२

००९

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), नाशिक शहर,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),पोलीस आयुक्तालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस आयुक्त, नाशिक शहर,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६०
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. शेख मजहर शेख कमरुद्दीन, : अपिलार्थी
मालेगाव ता.मालेगाव जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप अभियंता, बांधकाम विभाग,
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि. नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शहर अभियंता,
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि.नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : १) संकीर्ण कर वसूली अधीक्षक,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जि.नाशिक.
२) उपअभियंता,बांधकाम,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जि.नाशिक.

जन अपिलीय अधिकारी : १) सहायक आयुक्त (कर),
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जि.नाशिक.
२) शहर अभियंता,
मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जि.नाशिक.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, (कर) महानगरपालिका, मालेगाव यांच्या दालनात दि. २४.०१.२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या संदर्भात कोणताही आदेश त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे अपील केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १३.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०१.२००० ते दि. १३.११.२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण १९ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका मराठी प्राथमिक शाळा क्र.१ लगत प्रस्तावित शॉपींग सेंटर संदर्भातील होती. अपिलार्थीने या संपूर्ण १९ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती करसंकलन विभाग व बांधकाम विभाग या दोन विभागांशी संबंधित होती. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास बांधकाम विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०१.२००८ रोजी व कर विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०१.२००८ रोजी दोन वेगवेगळया पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार शहर अभियंता,बांधकाम विभाग यांच्याकडे दि. १९.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले, कर विभागाच्या प्रतिसादासंदर्भात अपिलार्थीने कर विभागाकडे प्रथम अपील केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या या दि. १९.१२.२००७ रोजीच्या बांधकाम विभागाकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, बांधकाम विभाग यांनी दि. २२.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले.त्याप्रमाणे बांधकाम विभागाच्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.०१.२००८ रोजी माहिती दिली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. कर व बांधकाम विभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना अनुक्रमे दि. ०२.०१.२००८ व ०३.०१.२००८ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले. तसेच या प्रकरणाशी संबंधित शहर अभियंता यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या वस्तुस्थिती संदर्भात असा खुलासा केला की, मूळात अपिलार्थीने त्यांच्याकडे सर्व माहिती त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी व प्रश्नार्थक स्वरुपात मागितली आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या प्रस्तावित शॉपिंग सेंटरसंदर्भात माहिती मागितली आहे, अशा कोणत्याही शॉपींग सेंटरच्या बांधकामाचा प्रस्ताव मालेगाव महानगरपालिकेकडे सध्या विचारार्थ देखील नाही. अपिलार्थीस अनधिकृतरित्या महानगरपालिका प्राथमिक शाळा क्र.१ च्या शेजारी शॉपिंग सेंटरचे बांधकाम करण्यात येणार असल्याची माहिती प्राप्त झाल्याने,त्यांनी ही माहिती महानगपालिकेकडे विचारली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कथित प्रस्तावासंदर्भात काही माहिती मागविली आहे. मूळात हा प्रस्ताव कोणत्याही स्वरुपात केवळ अस्तित्त्वातच नव्हे तर विचारार्थ देखील नसल्याने या प्रस्तावाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात माहिती उपलब्ध असण्याचा प्रश्न या प्रकरणी उद्‌भवत नाही. उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात, या प्रकरणी बांधकाम विभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे व इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देण्यासंदर्भात कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : २८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख मजहर शेख कमरुद्दीन,सर्वे नं. ९०,प्लॉट नं.४५,जाफर नगर,मालेगाव ता.मालेगाव जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, बांधकाम विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा संकीर्ण कर वसूली अधीक्षक, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,जि. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त (कर), मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६१
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. हरिहर पद्माकर पाटील, : अपिलार्थी
रा.धरणगाव जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य प्रशासन अधिकारी,
उपसंचालक,आरोग्य सेवा नाशिक मंडळ यांचे
कार्यालय,नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक (आरोग्य)
नाशिक मंडळ, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक,आरोग्य सेवा नाशिक
मंडळ,नाशिक

त्रयस्थ पक्ष : १) श्री. के.टी.बडगुजर,
२) श्री. एम.एच.बिलाडे

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष श्री. के.टी.बडगुजर उपस्थित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम अर्ज दिनांक : | **१४.०७.२००७** **(प्राप्त दि.१९.०७.२००७)** | प्रथम प्रतिसाद दिनांक : | **१३.०८.२००७** |
| प्रथम अपील दिनांक : | **०६.०९.२००७** | प्रथम अपील निर्णय दिनांक : | **नाही** |
| | द्वितीय अपील दिनांक : | **०५.०१.२००८** | |

आज रोजी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या १७ असून ही माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचा ४५/- इतका खर्च झाला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यापोटी लावलेले शुल्क रु.८९/- हे जादा आहे. त्यामुळे त्यांच्याकडून माहितीपोटी वसूल केलेले शुल्क हे बेकायदेशीर आहे. याचबरोबर त्यांना सुनावणीची संधी न देता त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी फेटाळून लावले आहे. सबब जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या बेकायदेशीर वर्तनाबाबत त्या दोघांकडून अपिलार्थीस झालेल्या नुकसानीपोटी रु.१०,०००/- अपिलार्थीस देवविण्यात यावे आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे आदेशित करुन अपिलार्थीस पूर्ण माहिती प्राप्त होईपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्तीची कारवाई करावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्याकडून असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ च्या व्यतिरिक्त उर्वरित मुद्यांवरील माहिती प्राप्त झाली नाही व त्यांना माहिती देण्यासाठी जादा शुल्काची आकारणी केली गेली आणि त्यांनी मूळ अर्जाद्वारे विनंती केल्याप्रमाणे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रमाणित प्रती दिल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. १४.०७.२००७ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. १९.०७.२००७ रोजी प्रथम प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. १३.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु. ८९/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने त्यांना मनीऑर्डरने पाठविले असता ते त्यांना दि. २४.०८.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर दि. २८.०८.२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांनी या प्रकरणी दि. १३.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेले शुल्क रु.८९/- इतके त्यांच्या कार्यालयात मनीऑर्डरने भरण्याचे सूचित केले. तथापि या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क)च्या तरतुदीप्रमाणे या रकमेचा संपूर्ण तपशील - संभाव्य पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर कळविलेला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि.१३.०८.२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहितीपोटीचे कळविलेले शुल्क व अपिलार्थीचे सदरचे शुल्क त्यांना प्राप्त झाल्याचा दिनांक विचारात घेता ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २९.०८.२००८ रोजी अगर तत्पूर्वी देय होत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०८.२००८ रोजी म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पाठविली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस शुल्कापोटीचा संपूर्ण तपशील न कळविल्याने व परिणामी जन माहिती अधिकारी यांचे दि. १३.०८.२००७ रोजीचे पत्र अवैध सिध्द होत असल्याने, त्यांना आता वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीकडून या माहितीपोटी स्वीकारले शुल्क रु. ८९/- इतके अपिलार्थीस परत करावे लागेल.अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता अपिलार्थी यांचा युक्तिवाद आयोगास योग्य वाटतो. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरीही तिचे सार्वजनिक स्वरुप पाहता, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की त्यांनी, श्री. एम.एच.बिलाडे यांनी बदली वाहतुक भत्त्यासंदर्भात घेतलेल्या आक्षेप व तक्रारीबाबत त्यांनी सर्व संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व यासंदर्भात त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व कार्यालयीन टिपणीच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

उर्वरित मुद्यांसंदर्भात देखील जन माहिती अधिकारी यांनी अशीच कार्यवाही करणे अपेक्षित आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०६.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासदृश परिस्थिती उद्‌भवली आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.८९/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**नाशिक**
**दिनांक : २८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरिहर पद्माकर पाटील,९६/३२४+३२७, धरणगाव, जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,उपसंचालक,आरोग्य सेवा नाशिक मंडळ,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (आरोग्य)नाशिक मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१३
निर्णय दिनांक २८-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अर्जुन नामदेव सोनवणे,<br>नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>अनुसूचित जाती-जमाती प्रमाणपत्र पडताळणी<br>समिती,नाशिक विभाग,नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहआयुक्त,<br>अनुसूचित जाती-जमाती प्रमाणपत्र पडताळणी<br>समिती,नाशिक विभाग,नाशिक | | |

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : | संशोधन अधिकारी,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी<br>समिती,नाशिक |
| जन अपिलीय अधिकारी: | उपसंचालक (सं),<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी<br>समिती,नाशिक |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम अर्ज दिनांक : | **२८.१२.२००६** | प्रथम प्रतिसाद दिनांक : | **२५.०१.२००७** |
| प्रथम अपील दिनांक : | **१३.०९.२००७**<br>**प्राप्त दि.१९.०९.२००७** | प्रथम अपील निर्णय दिनांक : | **नाही** |
| द्वितीय अपील दिनांक : | **०३.११.२००७** | | |

आज रोजी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २७.१२.२००६ रोजी त्यांनी विचारलेली व तदनंतर वेळोवेळी स्मरणपत्रे पाठवूनही

माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व त्यानंतरही त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन, अद्यापपर्यंत अपिलार्थीने या प्रकरणी दि. १९.०९.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन व अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्णतः संधी देऊन कोणतेही आदेश पारित न केल्याचे निष्पन्न झाले आहे. अपिलार्थीने मागतलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. १९.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपले अंतिम निर्णय पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१९.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अर्जुन नामदेव सोनवणे,जानकी निवास, गंधर्व नगरी, उत्सव मंगल कार्यालय रोड, नाशिक रोड, नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं),अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,नाशिक यांना अपिलार्थीच्या दि. १९.०९.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१४
निर्णय दिनांक २८-०५-२००९

१ श्री. देवाजी वामनराव ठोके , : अपिलार्थी
रा. काजी सांगवी, ता.चांदवड,जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन चांदवड,जि.नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभाग, मनमाड,ता.नांदगाव,जि.नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड, ता.नांदगाव जि.नाशिक
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम अर्ज दिनांक : | **१२.०४.२००७** | प्रथम प्रतिसाद दिनांक : | **०४.०५.२००७** |
| प्रथम अपील दिनांक : | **२१.०६.२००७** | प्रथम अपील निर्णय दिनांक : | **निर्णय नाही** |
| | द्वितीय अपील दिनांक : | **२८.०९.२००७** | |

आज रोजी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण स्वरुपाची असल्याने पूर्णपणे माहिती मिळण्याच्या दृष्टीने

त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करता त्यांना माहिती दिली नाही. त्यामुळे मागणी

केलेली परिपूर्ण माहिती मिळण्यासाठी त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची विनंती व त्याचबरोबर अधिनियमातील कलम १९(८)(ख) प्रमाणे त्यांना या प्रकरणी झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत आदेश निर्गमित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांनी चांदवड पोलीस स्टेशनकडून त्यांच्याकडील जा.क्र.६४२/०७, दि. ०४.०५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली असून हीच माहिती तत्कालीन उप विभागीय पोलीस अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १२.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केला असून या संदर्भातील त्यांचे प्रथम अपील देखील त्यांनी चुकीच्या प्राधिकरणाकडे केले आहे. या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड हे असून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाशी संबंधित अपिलीय अधिकारी हे अप्पर पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक, जि.नाशिक हे आहेत. त्याामुळे या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज पोलीस निरीक्षक यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो पाच दिवसांच्या आत उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड यांच्याकडे व या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज अप्पर पोलीस अधीक्षक(ग्रामीण), नाशिक, जि.नाशिक यांच्याकडे हस्तांतरित करणे गरजेचे होते. परंतु या प्रकरणी अशी कार्यवाही झालेली दिसत नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे पोलीस निरीक्षक, चांदवड यांच्याकडे त्यांनी दि. २९.१२.२००६, १८.०१.२००७, ०९.०२.२००७ व दि. २६.०२.२००७ रोजी दिलेल्या सर्व अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कायदेशीर

कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास पोलीस निरीक्षक यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या दि. १२.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे संपूर्ण माहिती पुरविल्याचे आयोगास या प्रकरणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, ही माहिती अपूर्ण असून ती परिपूर्ण नाही. अपिलार्थीस प्राप्त झालेली ही माहिती अपूर्ण आहे व ती परिपूर्ण नाही,मात्र हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आज सुनावणीसाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत, अथवा या मुद्यासंदर्भात त्यांनी कोणतीही लेखी कागदपत्रे आयोगास आयोगास सादर केलेली नाहीत. अपिलार्थीने पोलीस निरीक्षक, चांदवड यांच्याकडे केलेल्या अर्जावर दिवाणी स्वरुपातील कार्यवाही अपेक्षित असल्याचे पोलीस निरीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील तक्रारीची तड लावण्याकरिता दिवाणी न्यायालयाकडे दाद मागावी लागेल, असे दिसून येते. अपिलार्थीस सर्व संबंधितांनी पुरविलेली माहिती व अपिलार्थीची, आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर असलेली, अनुपस्थिती पाहता, उपरोक्त प्रकरणी विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : २८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देवाजी वामनराव ठोके,रा. काजी सांगवी, ता.चांदवड,जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड ता. नांदगाव, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चांदवड, जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३८

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. बाळू बंडू हाडपे, अपिलार्थी
मु. पो. जातेगांव, तालुका नांदगांव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, जातेगांव,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव,
तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जातेगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (ग्रापं), पंचायत समिती, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष : १ श्रीमती कमलाबाई शिवाजी वर्पे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे व तसेच या प्रकरणी त्यांचे प्रथम अपील फेटाळले गेले असल्यामुळे त्यांनी हे अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०७-२००८ रोजीचा माहितीसाठीचा केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः रजिस्टर्ड टपालाव्दारे दिनांक २९-०७-२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०९-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि दिनांक ११-०९-२००८ रोजी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव यांच्याकडे दाखल केलेले प्रथम अपील मागे घेतले, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे निकाली काढले.

या सुनावणीसाठी वेळी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हजर होते, तथापि यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपील त्यांनी मागे घेतल्यानंतरही राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील मागे घेतल्याचे पत्र आयोगास दाखविले. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगांव यांच्याकडे दाखल केलेले प्रथम अपील मागे घेतले आहे. अपिलार्थीने

त्यांचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी दाखल केलेले प्रथम अपील त्यांच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीस मूळात राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचा कोणताही हक्क राहत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विचाराधीन व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचा उल्लेख केला आहे, मात्र ही माहिती अपूर्ण कशी आहे याचे स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाही. याहीपेक्षा महत्वाचे असे आहे की, अपिलार्थीने या विषयावरील त्यांचे प्रथम अपील दिनांक ११-०९-२००८ रोजी मागे घेतले असल्याने त्यांचा आयोगाकडे व्दितीय अपील करण्याचा अधिकारच मूळात दिनांक ११-०९-२००८ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जर आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटत असेल तर त्यांनी उर्वरित माहितीकरिता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे नव्याने अर्ज करणे भाग आहे, असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात नमूद केलेल्या बाबी पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्ष येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळू बंडू हाडपे, मु. पो. जातेगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जातेगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रापं), पंचायत समिती, नांदगांव, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३७

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. योगेश मधुकर घोडे, अपिलार्थी

घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी,

पंचवटी, नाशिक - ०३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य लेखाधिकारी, मनपा,नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका,

नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपलेखापाल, लेखा विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक

**<u>निर्णय</u>**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम अर्ज | : | २५-०७-२००८ | प्रथम प्रतिसाद | : | १८-०८-२००८ |
| प्रथम अपील | : | २९-०८-२००८ | निर्णय दिनांक | : | १७-०९-२००८ |
| व्दितीय अपील | : | १९-११-२००८ | | | |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे वरील परिच्छेदात उल्लेखिलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २५-०७-२००८ रोजी मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, श्री. योगेश घोडे यांनी दिनांक ०२-०५-२००८ रोजी दिलेल्या अर्जातील माहिती लेखा विभागाने न देता ती आयुक्तांनी काढलेल्या आदेशाप्रमाणे उद्यान विभागाने परस्पर द्यावी, या अर्थाची आयुक्तांच्या आदेशाची प्रत, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची नांवे व हुद्दे या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन मुद्दा क्रमांक १ संदर्भात, आयुक्तांनी अपिलार्थीने नमूद केल्याप्रमाणे कोणतेही आदेश निर्गमित केले नाहीत असे नमूद करुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे हुद्दे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील प्रश्नांप्रमाणे सदरची माहिती समक्ष देण्यात आली आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक १८-०८-२००८ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे नाव, हुद्दा ही

माहिती मागितली होती. तथापि आयुक्तांनी काढलेल्या आदेशामध्ये अधिका-यांच्या नावाचा उल्लेख नव्हता, त्यामुळे त्यांना संबंधित अधिका-यांची नांवे प्रथमतः कळविली नाहीत. तदनंतर दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या आदेशाची प्रत अपिलार्थीस व्यक्तिशः पुरविण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती मर्यादित स्वरुपाची होती. ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एका दिवसाच्या आत देणे देखिल अशक्य नव्हते, असे असतांना देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास दिनांक १८-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देतांना संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची नावे कळविली नाहीत. वास्तविक पाहता अपिलार्थीने अर्ज करतेवेळी कोणीतरी अधिकारी निश्चितपणे जन माहिती व अपिलीय अधिकारी म्हणून कामकाज पाहत असणार, तथापि त्यांची नांवे अपिलार्थीस न कळविण्याचे गूढ केवळ मनपा मुख्य लेखाधिकारीच जाणोत. माहिती अधिकार अधिनियम हा सार्वजनिक प्राधिकरणाच्या कारभाराची पारदर्शकता स्पष्ट करण्याकरिता मूळात निर्माण केला गेला आहे. या अधिनियमातील कलम (४) (ख) (सोळा) व (सतरा) प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची नांवे स्वंयप्रेरणेने घोषित करणे मूळातच अभिप्रेत आहे. अपिलार्थीस अंतीमतः ही माहिती दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तिशः पुरविल्याचे त्या आयोगासमोर सांगत आहेत. परंतु यासंदर्भात अपिलार्थीची पोचसही अथवा अपिलार्थीस त्यांनी निश्चितपणे ही माहिती दिल्याचा कोणताही पुरावा त्यांना आज रोजी आयोगासमोर सादर करता आला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधितांची नांवे कळविली नाहीत असा निष्कर्ष आयोग काढत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती - त्यांनी अर्ज करतेवेळी कार्यरत असलेले जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची नावे - त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत टपालाव्दारे पाठवून द्यावी.

वास्तविक पाहता माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (ख) मध्ये स्वंयप्रेरणेने घोषित करावयाच्या १७ मुद्दयांपैकी एक मुद्दा हा अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये समाविष्ट आहे. स्वंयप्रेरणेने घोषित करावयाच्या माहितीची अंतीम मुदत दिनांक १५ ऑक्टोबर २००५ अशी होती, तथापि या प्रकरणात अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केल्यानंतर त्यांना ही माहिती दिनांक ०५-१२-२००८ रोजी प्राप्त झाली असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे मात्र त्यांच्याकडे याबाबतचा वैध पुरावा उपलब्ध नाही त्यामुळे ही माहिती देखील अपिलार्थीस प्रत्यक्षात प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. हे प्रकरण पाहता नाशिक महानगरपालिकेमध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा कशा प्रकारे अनादर केला जात आहे याचे पुरेपूर दर्शन घडते असे येथे नमूद केल्यास फारसे वावगे होईल, असे आयोगास वाटत नाही. नाशिक महानगरपालिकेकडील लेखा विभागाशी संबंधित यापूर्वी देखील काही अपिले माहिती आयोगाकडे आली असता त्यामध्ये देखील महानगरपालिके-तील हा विभाग संबंधित अर्जदारांना माहिती देणे कसे लाबंवता येईल किंवा कसे टाळता येईल हेच बघत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. या विभागाच्या अशा प्रकारच्या प्रवृत्तीची आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी यथायोग्यरित्या व गांभीर्यपूर्वक नोंद घेऊन या विभागामध्ये सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने त्यांच्या पातळीवर ठोस प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे आयोगास वाटते.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना तीन दिवसात टपालाव्दारे विनामूल्य देण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. योगेश मधुकर घोडे, घ. नं. ४५९०, मारुती मंदिरासमोर, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक - ०३.

२ जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, लेखा विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखाधिकारी, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४३९

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. देवाजी वामनराव ठोके, अपिलार्थी
मु. पो. काजीसांगवी, तालुका चांदवड,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळले व तसेच त्यांना जन अपिलीय अधिकारी कोण आहेत याबाबत कळविले नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता

त्यांनी अपिलाचे कामकाज न करता जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घातले. या सर्व घडामोडीत त्यांना झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासाप्रीत्यर्थ त्यांना संबंधितांकडून अधिनियमातील कलम १९ (८) (ख) नुसार नुकसानभरपाई देण्याची व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश निर्गमित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रलंबीत प्रवासभत्ता व वाहनभत्ता यासंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे विनंती केली होती व अखेरीस त्यांनी या प्रकरणी वेळोवेळी केलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील माहिती अधिका-याकडे केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पंचायत स्तरावर असल्याने त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ३०-०६-२००८ रोजीचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चांदवड यांच्याकडे त्याच दिवशी पाठवून दिला. अपिलार्थीच्या या अर्जास गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चांदवड यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या प्रलंबीत प्रवास व वाहनभत्याच्या देयकाकरिता अनुदान प्राप्त झाल्या-नंतर सदर देयके अदा करण्यात येतील असे आरोग्य विभागास कळविले व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. यासंदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांनी विचारलेल्या माहितीची सद्यस्थिती त्यांना गट विकास अधिकारी यांच्याकडून दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अवगत केली गेली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २८-०७-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय न

दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाप्रमाणेच तोंडी युक्तिवाद केला. तसेच त्यांनी आज रोजी त्यांचा लेखी युक्तिवादही आयोगाकडे सादर केला असून त्यामध्ये त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या म्हणण्याची पुनरोक्ती करुन या प्रकरणी जन माहिती आणि सहायक जन माहिती अधिकारी यांना प्रत्येकी २५००० रुपये इतकी शास्ती लावण्याची व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची पुनःश्च मागणी केल्याचे दिसून येते.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे संचालक कुष्ठरोग विभाग यांच्याकडील कर्मचारी असून कुष्ठरोग विभागाकडे अपिलार्थीचे बील अदा करण्याकरिता त्यांनी संबंधिताशी वेळोवेळी पत्रव्यवहार करुनही त्यांना आतापर्यंत उपलब्ध अनुदानातून अपिलार्थीस फक्त वाहनभत्त्याची बिले अदा करता आली व अनुदानाअभावी त्यांना अपिलार्थीची प्रवासभत्त्याची बिले अदा करता आली नाहीत. अपिलार्थीच्या प्रलंबीत बिलाची रक्कम अंदाजे २००० रुपये इतकी आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये प्रामुख्याने त्यांनी प्रवासभत्ता व वाहनभत्ता बिलासंदर्भात संबंधितांशी पत्रव्यवहार करुनही त्यांची बिले मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने त्यांच्या अर्जाची चौकशी करुन झालेल्या कार्यवाहीची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-०६-२००६, ०४-०४-२००८ व ३१-०५-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांनी इतर संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. या प्रकरणी असे आढळून

आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर हा माहितीसाठीचा अर्ज आहे हे विसरुन या अर्जामध्ये अपिलार्थीने उपस्थित केलेले प्रश्न सोडविण्यामध्येच विहित कालावधी व्यपगत केला आहे. वास्तविक पाहता अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती वेळीच दिल्या असत्या तर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली असती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ प्रश्न सोडविण्याकरिता केलेला पत्रव्यवहार पाहता त्यांनी अपिलार्थीपासून हेतूतः किंवा कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविली आहे, असे म्हणता येणार नाही, त्यामुळे अपिलार्थीची संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मागणी आयोग मान्य करु इच्छित नाही. अपिलार्थीच्या प्रलंबित बिलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आरोग्य विभागाच्या कुष्ठरोग विभागाच्या संचालकांशी स्वतः प्रत्यक्ष संपर्क साधून अपिलार्थीची प्रलंबित देयके मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना या प्रकरणी झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासाबद्दल नुकसानभरपाई मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, येथून पुढे अपिलार्थी या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार ज्या ज्या वेळी उपस्थित राहतील त्या त्या वेळेस त्यांच्या प्रवासाचे एसटीचे जाण्या-येण्याचे प्रवासाचे भाडे त्यांना अदा करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देवाजी वामनराव ठोके, मु. पो. काजीसांगवी, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४०

निर्णय दिनांक   २९-०५-२००९

१ सौ. तारा उर्फ ताराबाई पुंडलिक खाडे, अपिलार्थी
फ्लॅट नं. १२, रत्नप्रभा हौसिंग सोसायटी लि.
नविन पंडील कॉलनी, जुने महानगरपालिकेच्या मागे,
शरणपूर रोड, नाशिक - ४२२ ००२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक पोलीस आयुक्त, विभाग २, नाशिक
शहर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ), नाशिक शहर
त्रयस्थ पक्ष : श्री. नारायण शंकर आरिगळे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्वजण हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती व कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत. ते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी दिनांक ३१-०७-२००८ रोजी उपस्थित झाले असता त्याच दिवशी त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे त्यांनी कोर्टात दाखल केल्याचे त्यांनी अपिलार्थीस सांगितले व त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यांनी गुन्ह्याचा तपास किंवा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे किंवा कसे याची जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारची विचारणा केली नसतानाही त्यांना नकळत स्पष्ट नकार देऊन, माहिती न देता त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाशिक रोड येथील FIR No. I 90/2008, दिनांक १८-०२-२००८ भादंवि क्रमांक ४२०, ४६५, ४६७, ४६८, ३४ प्रमाणे दिलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात एकूण दहा मुद्दयावर व्यक्तिश: माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०६-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये सात इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस एक पृष्ठाची माहिती देण्यात आली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कनिष्ठ स्तर, सह दिवाणी न्यायालय, नाशिक रोड न्यायालयात सादर केल्याचे नमूद करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय

अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०६-२००८ रोजी एका पृष्ठाची व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली. एक पृष्ठाच्या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सात रुपये इतके शुल्क आकारले आहे. त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीमधील काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २३-०५-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. तथापि ती अपूर्ण आहे. यामध्ये अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यंच्याकडून जी माहिती प्राप्त झाली नाही त्याची यादी त्यांनी आयोगास सादर केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज ज्यावेळी केला त्यावेळी सदर गुन्ह्याचा तपास चालू होता. अर्जदाराने मागणी केलेली माहिती उघड केल्याने या तपासात अडथळा येण्याची शक्यता असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती देण्यासाठी नाकार दिला. तथापि तपास पूर्ण होऊन संबंधितांवर चॉर्जशीट दाखल करतेवेळी ही माहिती अपिलार्थीस पुरविण्याचे तपासणी अमलदार यांनी कबूल केले होते, मात्र तपासणी अमलदार यांनी ही कागदपत्रे अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे न पाठविल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही. सध्या संबंधित तपासणी अमलदार हे शासकीय सेवेतून निवृत्त झाले आहेत. नंतर त्यांनी पोलीस प्रोसिक्यूटरकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊन दिनांक २३-०५-२००९ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये हस्ताक्षर तज्ञांच्या अहवालाची प्रत मागितली आहे. तथापि हा अहवाल त्यांना अद्यापपावेतो हस्ताक्षर तज्ञांकडून प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती देऊ शकले नाहीत. तसेच अपिलार्थीने विधी सल्लागाराने त्यांच्याकडे नोंदविलेल्या अभिप्रायाची प्रत मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, विधी सल्लागार हे वेळोवेळी जन माहिती

अधिकारी यांना कायदेशीर सल्ला देत असतात, तथापि या सल्ल्याच्या शेवटी विधी सल्लागार हे त्यांना, त्यांचा सल्ला हा अधिकृत कागदपत्रे म्हणून नोंदविण्यात येऊ नये असे अभिप्राय देत असतात त्यामुळे विधी सल्लागाराच्या अभिप्रायाच्या मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो दिली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील या प्रकरणाशी संबंधित माहिती दिनांक २३-०५-२००९ रोजी विनामूल्य पुरविली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने आयोगाकडे अर्ज केला असून त्यामध्ये त्यांना अद्यापपावेतो जी कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहेत याचा उल्लेख केला आहे. या प्रकरणी गुन्ह्याचा तपास पूर्ण होऊन आवश्यक ती कागदपत्रे नाशिक रोड येथील दिवाणी न्यायालयात दाखल केली आहेत त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो प्राप्त न झालेल्या मुद्दयांची कागदपत्रे त्यांना देण्यासंदर्भात जिल्हा न्यायालयाशी संपर्क साधून अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अधीन राहून त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना विधी अधिका-यांनी दिलेल्या अभिप्रायाची प्रत मागितली आहे. आता या प्रकरणी पोलीस यंत्रणांकडून चौकशी पूर्ण झाली असल्याने जरी संबंधित विधी अधिका-याने त्यांचा सल्ला हा अधिकृतरित्या कागदपत्र म्हणून नोंदविण्यात येऊ नये असा सल्ला दिला असला तरी या सल्ल्याची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे अभिलेख्यावर उपलब्ध आहे, ती प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी आयोगास असे अवगत करुन देण्यात आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी, त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने त्यांचे अपील निकाली काढावे असे

लेखीपत्र दिल्याने, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या विधानाच्या पृष्ठ्यर्थ अपिलार्थीच्या अर्जाची प्रत आयोगास सादर केली आहे. तथापि या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने या पत्रावरील सही त्यांची नसल्याचे आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आवश्यक असलेली माहिती त्या कोर्टातून परस्पर प्राप्त करुन घेतील असे सांगितल्याने त्यांनी अपिलार्थीस मध्यंतरीच्या काळात कोणतीही माहिती पुरविली नाही.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती अपेक्षिली होती व त्यांनी त्याप्रमाणे ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः दिनांक १३-०६-२००८ रोजी व्यक्तिशः प्राप्त करुन घेतली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीचे पृष्ठ एक असून त्याचे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे एकूण शुल्क रुपये दोन इतके होत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून घेतलेले जादाचे शुल्क रुपये पाच इतके त्यांना, याच कालावधी-मध्ये परत करावे लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे जादा आकारलेले शुल्क रुपये पाच इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. तारा उर्फ ताराबाई पुंडलिक खाडे, फ्लॅट नं. १२, रत्नप्रभा हौसिंग सोसायटी लि. नविन पंडील कॉलनी, जुने महानगरपालिकेच्या मागे, शरणपूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, विभाग २, नाशिक शहर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ), नाशिक शहर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४१

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. राजेंद्र पोपटराव पाटील, : अपिलार्थी
३ वरदायनी अपार्टमेंट, हिरावाडी, पंचवटी,
नाशिक ३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण विभाग,
पुणे - ४११ ००१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण सह संचालक, (उच्च शिक्षण), पुणे
विभाग, पुणे - ४११ ००१

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय, पुणे विभाग, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०८-

२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती संबंधित महाविद्यालयाकडून मागितली असल्याचे व संबंधित माहिती महाविद्यालयाकडून प्राप्त होताच ती अपिलार्थीस देण्याचे आश्वासीत केले. तथापि त्यांना यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक २४-०७-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर दिनांक ०७-१०-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि शासकीय कामानिमित्त जन अपिलीय अधिकारी यांना मुंबई येथे जावे लागल्याने ते त्यावेळी सुनावणी घेऊ शकले नाहीत व आजपर्यंत ते या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊ शकले नाहीत, त्यामुळे त्यांनी हे अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांना आतापर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भोसला मिलीटरी महाविद्यालय, नाशिकला दिलेल्या वेतन अनुदानासंदर्भात सन १९८८ ते १९९६ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - भोसला कॉलेजला अनुदानाची रक्कम दिलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती, या अनुदानासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झालेली तपासणी व लेखापरिक्षण अहवालाच्या छायांकीत प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०८-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला मात्र तत्पूर्वीच अपिलार्थीने दिनांक २४-०७-२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त

झाली परंतु अनुदानासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झालेली तपासणी व लेखा परीक्षण अहवाल अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सन १९८८ ते १९९६ या कालावधीशी संबंधित होती. या कालावधीशी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयात न सापडल्याने त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेकडे उपलब्ध असल्यास ती त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडे पाठविण्याचे संबंधित संस्थेला सूचित केले. त्यांनी पुढे अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना आता हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत पुरविण्यात येईल असे आयोगास आश्वासीत केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे जतन करुन ठेवण्याच्या कालावधीविषयी जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारणा केली असता, त्यांना याची कल्पना नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित असणारी काही माहिती विचारली होती. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने ती माहिती अपिलार्थीस देय असणार नाही, मात्र यातील वेतन अनुदानाची छायांकीत प्रत, कार्यालयाच्या तपासणी अहवालाच्या प्रती ही व मुद्दा क्रमांक ३ मधील वेतन लेखा परीक्षण अहवालाच्या प्रती ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. याबाबत वेतन अनुदानाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-१२-२००८ रोजी म्हणजेच त्यांनी मागणी केलेल्या दिनांकानंतर पाच महिन्याच्या विलंबाने पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रामुख्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने जतन करुन ठेवणे अभिप्रेत आहे, तथापि आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, शिक्षण विभागातील क्षेत्रीय प्रशासकीय

कार्यालयाकडे कोणत्याही अर्जदाराने त्यांच्या कार्यालयातील माहिती जरी मागितली तरी ही कार्यालये, संबंधित अर्जदाराने त्यांना मागणी केलेली माहिती, संबंधित शिक्षण संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे अर्जदारास सुचवितात. यावरुन शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये त्यांच्याकडील उपलब्ध माहितीचे व्यवस्थापन योग्य त्या प्रकारे केले जात नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब सचिव (शालेय शिक्षण) व सचिव (उच्च शिक्षण) यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) च्या तरतुदीप्रमाणे असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शाळा व महाविद्यालये यांना त्यांच्याकडील माहितीचे व्यवस्थापन योग्य रितीने करण्यासंदर्भात आवश्यक ते परिपत्रक त्यांच्या स्तरावर जारी करावे, जेणेकरुन शिक्षण विभागातील पारदर्शकता अधिक पारदर्शक होईल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असे आयोगाचे मत आहे. सबब संचालक (शिक्षण) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक (शिक्षण) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा-नियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र पोपटराव पाटील, ३ वरदायनी अपार्टमेंट, हिरावाडी, पंचवटी, नाशिक ३.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण) कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तथा सह संचालक, (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे - ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (उच्च शिक्षण) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४२

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. प्रभाकर रंभाजी बेलोटे, : अपिलार्थी
मु. पो. पंचाळे, तालुका सिन्नर,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पंचाळे,
तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर,
तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती, सिन्नर, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णय प्राप्त झाला नाही, त्यांना

अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांना आता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित मे २००५ ते ०५ फेब्रुवारी, २००८ या कालावधीशी संबंधित ग्रामपंचायतीच्या मासिक सभा व ग्रामसभेच्या ठरावाची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रुपये एक या दराने त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २५-०३-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ४१५ /- रुपये इतक्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक २७-०३-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती पुरविली, तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०५-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना दिनांक ०७-०५-२००८ रोजी उर्वरित पूर्ण माहिती द्यावी असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. सुनावणीचे इतिवृत्त जन अपिलीय अधिकारी यांनी बैठकीचे इतिवृत्त नोंदवून ठेवावे त्याप्रमाणे नोंदवून ठेवले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती अधिका-याने कोणतीही माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

या युक्तिवादावरुन अपिलार्थीस अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त होणे बाकी असल्याचे सिध्द होत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०३-२००८ रोजी लिहिलेल्या पत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या एकूण शुल्काचा तपशीलवार उल्लेख जो जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे त्यांना अनिवार्य आहे तो या पत्रामध्ये उल्लेखिला नसल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी मूळात अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००८ रोजी दिलेला प्रतिसाद अवैध असल्याचे दिसून येत आहे, कारण या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे कळविणे अनिवार्य होते तो त्यांनी दिलेला नाही. अपिलार्थीकडून ४१५ रुपये इतके शुल्क घेऊनही त्यांना दिनांक २७-०३-२००८ रोजी अपूर्ण माहिती दिली आहे. अपिलार्थीस अद्यापपावेतो जून २००६ ते जुलै २००७ या कालावधीतील ग्रामसभेचे ठराव व मे २००५ ते जुलै २००५ या कालावधीतील मासिकसभेचे ठराव जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त असल्याचे त्यांनी सांगितले. त्यापैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता ऑगस्ट २००६ ते २६ जानेवारी २००७ पर्यंतच्या ग्रामसभेचे ठराव उपलब्ध झाले आहेत व ते त्यांनी अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. आजच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क निर्देशित करणारे जन माहिती अधिकारी यांचे पत्र, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे शुल्काचा तपशील न दिल्याने व शुल्काची रक्कम न कळविल्याने अवैध ठरत आहे, त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क ४१५ रुपये इतके त्यांना

परत करावे लागेल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. या माहितीपैकी काही माहिती आता त्यांच्याकडे उपलब्ध आहे व उर्वरित संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या, या घटनाक्रमातील विविध टप्प्यावरील कृतीचे अवलोकन करता, या पूर्ण प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना, संबंधीत ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पंचाळे, तालुका सिन्नर यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती आता त्यांनी हे आदेश निर्गमित होताच त्यांना १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी व तसेच अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४१५ इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४१५ इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर रंभाजी बेलोटे, मु. पो. पंचाळे, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पंचाळे, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती, सिन्नर, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४३

निर्णय दिनांक २९-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अभंग रायभान शंकर,<br>युनिट नं. ४, प्लॉट नं. ५०, नंदनगर, सुमतीनगर<br>जवळ, लासलगांव, तालुका निफाड,<br>जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, निफाड,<br>तालुका निफाड, जिल्हा नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, निफाड, तालुका निफाड,<br>जिल्हा नाशिक | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत लासलगाव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २१-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विस्तार अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी दिनांक ०५-०६-२००८ रोजी गट विकास अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. तथापि त्यांनी या अपिलाची, दखल न घेतल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांना दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या दिलेल्या पत्रावर विस्तार अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे इष्ट राहील, असे आयोगास वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक

०५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अभंग रायभान शंकर, युनिट नं. ४, प्लॉट नं. ५०, नंदनगर, सुमतीनगर जवळ, लासलगांव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत लासलगाव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४४

निर्णय दिनांक २९-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड,<br>३, संतोषी कृपा, आडगांव नाका, पंचवटी,<br>नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, श्री. संत ज्ञानेश्वर विद्यालय,<br>भायगांव, तालुका पेठ, जिल्हा नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अध्यक्ष श्री संत ज्ञानेश्वर विद्या प्रसारक मंडळ,<br>तळेगांवरोही, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर मान्य नसल्याने त्यांनी श्री. संत ज्ञानेश्वर विद्या प्रसारक मंडळ, तळेगांवरोही, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक या संस्थेच्या अध्यक्षांकडे प्रथम अपील केले, मात्र संस्थेच्या

अध्यक्षांनी कोणत्याही प्रकारची अपिलाची सुनावणी न घेता परस्पर अपील निकाली काढल्याचे पत्र पाठविल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी अपिलार्थीने आयोगासमोर असे कबूल केले की जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक २२-०९-२००७ रोजी जवळजवळ संपूर्ण माहिती प्राप्त झाली मात्र त्यांना आवश्यक असलेला पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेताच अपिलार्थीस त्यांचे अपील निकाली काढल्याचे कळविले. त्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याचा त्यांचा उद्देश नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०९-२००७ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. तसेच शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. जेणेकरुन इतःपर अपिलार्थीच्या, त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे तक्रारीस वाव राहणार नाही, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१.	अपील खारीज करण्यात येत आहे.

नाशिक	( वि. बा. बोरगे )

दिनांक	२९-०५-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, ३, संतोषी कृपा, आडगांव नाका, पंचवटी, नाशिक.

२	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत ज्ञानेश्वर विद्यालय, भायगांव, तालुका पेठ, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष श्री संत ज्ञानेश्वर विद्या प्रसारक मंडळ, तळेगांवरोही, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४५

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, : अपिलार्थी
३, संतोषी कृपा, आडगांव नाका, पंचवटी,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, श्री. संत ज्ञानेश्वर विद्यालय,
मावडी, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष श्री संत ज्ञानेश्वर विद्या प्रसारक मंडळ,
तळेगांवरोही, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विचाराधीन प्रकरणी संबंधित मुख्याध्यापकाकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व चुकीची वाटल्या कारणाने त्यांनी दिनांक २७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर संस्थेच्या

अध्यक्षांनी कोणत्याही प्रकारे अपिलीय सुनावणी न घेता अपिलार्थीचे प्रथम अपील परस्पर निकाली काढल्याचे कळविले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित काही माहिती मागविली होती. यासंदर्भात त्यांनी संस्थेच्या अध्यक्षांकडे दिनांक २७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्या संस्थेच्या अध्यक्षांनी या अपिलावर कोणतीही सुनावणी न घेता दिनाक ११-१०-२००७ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढल्याचा निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढल्याने, जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १७-०८-२००७ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले आहे व प्राप्त माहितीने समाधान झाले असल्याचे देखील त्यांनी आयोगास सांगितले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, या प्रकरणी संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या अपिलावर दोनही बाजूंना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून निर्णय देणे त्यांना अपेक्षित होते. तथापि अशा पध्दतीने निर्णय न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. त्यांनी त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जावर दिनांक २८-०८-२००७ ही तारीख चुकीने टाकली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक २७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले व त्यानंतरच्या दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या तारखेचा मूळ अर्ज त्यांनी माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. आज रोजी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०८-२००७ रोजी माहिती दिल्याचे आयोगासमोर कबूल

केले आहे. अपिलार्थीचा मुख्य आक्षेप, संबंधित अध्यक्षांनी सुनावणी न घेता दिनांक ११-१०-२००७ रोजी पारित केलेल्या निर्णयाविरुध्द आहे. यासंदभात असे स्पष्ट करण्यात येते की, शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली असल्याने अपिलार्थीचा हा प्रश्न आपोआप निकाली निघत आहे. अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना चूकीचा अर्ज केला आहे व अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

नाशिक — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड, ३, संतोषी कृपा, आडगांव नाका, पंचवटी, नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत ज्ञानेश्वर विद्यालय, मावडी, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, श्री संत ज्ञानेश्वर विद्या प्रसारक मंडळ, तळेगांवरोही, तालुका चांदवड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४६

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. नंदकिशोर लोटन बोरसे, : अपिलार्थी
एन ३२ एफ १ ४ ३, सप्तशृंगी चौक, जुना सिडको,
नाशिक - ४२२ ००९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका,
माध्यमिक विद्यालय, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी
संचलित, जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, जुने
सिडको, नाशिक - ४२२ ००९

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे त्यामध्ये नमूद केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित सन २००४ ते २००७ या कालावधीतील विद्यार्थ्यांच्या सहलीच्या खर्चाविषयी वर्षनिहाय माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वर्षनिहाय सहलीचे ठिकाण, सहलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या, प्रती विद्यार्थी आकारलेले शुल्क, एकूण जमा रक्कम, खर्च रक्कम, खर्चाच्या प्रत्येक पावतीची झेरॉक्स व सदर रक्कम शिल्लक राहिली असल्यास ती विद्यार्थ्यांना परत केली असेल तर पालकाची अथवा विद्यार्थ्याची सही, जर अशी रक्कम संस्थेत जमा केली असेल तर संस्थेच्या खात्यात जमा केली असेल तर जमा केल्याच्या पावतीची झेरॉक्स किंवा अन्य कोणत्याही कामासाठी ही रक्कम खर्च केली त्या कारणाची लेखी महिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवाकडे या प्रकरणी दिनांक २०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना ही माहिती आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मागील कालावधीशी संबंधित असल्याने ती अपिलार्थीस विहित कालावधीत त्या देऊ शकल्या नाहीत. याकरिता त्यांना शाळेतील जुन्या अभिलेख्यांचा शोध घ्यावा लागणार होता. अपिलार्थीने ज्या कागदपत्रांची माहिती त्यांच्याकडे मागितली आहे अशा प्रकारच्या कागदपत्रांचा जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा एक वर्षाचा असतो. अपिलार्थी हे त्यांच्या शाळेच्या शिक्षक

पालक संघाचे उपाध्यक्ष असून अपिलार्थीने इतक्या वर्षात त्यांच्याकडे अशा प्रकारची माहिती कधीही मागितली नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास मुदतीत उत्तर न दिल्याचे कबूल करुन त्याबद्दल दिलगीरी व्यक्त केली व अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, आजच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न देऊन माहिती न दिल्याबद्दल आयोगाकडे दिलगीरी व्यक्त केली आहे व अपिलार्थीस सात दिवसाच्या आत संपूर्ण माहिती देण्याचे आश्वासीत केले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जर वेळीच सुनावणी घेऊन हा प्रश्न त्यांच्या स्तरावर सोडविला असता तर अपिलार्थीस आयोगाकडे येण्याची वेळ आली नसती. या प्रकरणी संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे निर्णय न देऊन व त्याव्दारे अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. तसेच उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहितीसाठीच्या अर्जांवर अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नंदकिशोर लोटन बोरसे, एन ३२ एफ १ ४ ३, सप्तशृंगी चौक, जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, माध्यमिक विद्यालय, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित, जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, जुना सिडको, नाशिक - ४२२ ००९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४७

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. नंदकिशोर लोटन बोरसे, : अपिलार्थी
एन ३२ एफ १ ४ ३, सप्तशृंगी चौक, जुने सिडको,
नाशिक - ४२२ ००९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका,
प्राथमिक विद्यालय, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी
संचलित, जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष / सचिव, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी,
जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी जास्तीचे शुल्क आकारले व माहिती दिली नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित सन २००२ ते २००६ व सन १९९३ ते १९९४ या दोन वेगवेगळ्या कालावधीमधील वेगवेगळ्या विषयावर काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००२ ते २००६ या वर्षामधील अन्य सांस्कृतिक फीचा हिशोब, पालक शिक्षक संघाचे ऑडिट रिपोर्ट, १९९३ ते १९९४ या कालावधीमध्ये भरती केलेल्या शिक्षकांची यादी, जाहिरातीची प्रत, शिक्षकांना दिलेल्या नेमणूक आदेशाची प्रत व जन माहिती अधिकारी यांनी संबधित शिक्षकांना नेमणूक दिल्याबद्दल त्यांच्याकडून घेतलेल्या पोच पावतीची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने माहितीसाठी केलेला प्रथम अर्ज अपूर्ण आहे, तसेच अपिलार्थीस माहिती का व कशासाठी पाहिजे याचा बोध त्यांच्या अर्जावरुन होत नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवाकडे या प्रकरणी दिनांक १२-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना द्यावयास लागणा-या माहितीपोटीचा खर्च रुपये २००० इतक्या खर्चाची माहिती अपिलार्थीस कळविली व शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे अपिलार्थीस आश्वासीत केले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही जण आयोगासमोर उपस्थित आहेत. दोनही बाजूंच्या युक्तिवादाची आयोगाने नोंद घेतली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ज्या शाळेकडे माहितीची मागणी केली आहे त्या शाळेस राज्य शासनाकडून नियमित अनुदान प्राप्त होत असल्याने संबंधित शाळा हे एक सार्वजनिक प्राधिकरण होत आहे. अपिलार्थीच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००७ रोजी दिलेले उत्तर पाहता असे आढळून येते की, केवळ अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही याच उद्देशाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र लिहिले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही स्पष्ट स्वरुपात आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीवरुन निश्चितपणे कोणताच बोध जन माहिती अधिकारी यांना होत नाही, याचा आयोगास बोध होत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आता नियत वयोमानानुसार शाळेच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांना याबद्दल कोणतीही माहिती नाही. अपिलार्थीने दिनांक १२-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपिलावर सुनावणी घ्यावयाचे टाळून संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीकडे त्यांच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये २००० रुपये इतक्या माहितीपोटीच्या शुल्काची मागणी करुन प्रथम शुल्क भरा व नंतर माहिती मिळेल असे उध्दट मजकूराचे पत्र अपिलार्थीस पाठविले. या घटनाक्रमामध्ये या टप्प्यावर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची एकूणच भूमिका अपिलार्थीपासून माहिती दडविण्याची व कसेही करुन अपिलार्थीस माहिती न देण्याची होती, असे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य होते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी या आपले कर्तव्य विसरुन अपिलार्थीपासून माहिती दडवित राहिल्या व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय

कारणाशिवाय वंचित राहिले. या संपूर्ण घटनाक्रमाकडे त्रयस्थ दृष्टीने पाहिल्यास जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारचे वर्तनाचे कोणतेही समर्थन मूळात असू शकत नाही, अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतूने टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे व त्या अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. तथापि त्या आता दिनांक ३१-०३-२००९ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या असल्याने त्यांचेवर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही. मात्र सध्याच्या जन माहिती अधिका-यास असे सूचित करण्यात येत आहे की, इत:पर अशा प्रकारची सार्वजनिक स्वरुपाची माहिती त्यांनी स्वयंप्रेरणेने त्यांच्याकडे नेहमी उपलब्ध करुन ठेवावी व ज्याप्रमाणे मागणी होईल त्याप्रमाणे सर्व संबंधितांना ती त्वरीत कशा प्रकारे देता येईल याकडे लक्ष द्यावे. जन माहिती अधिकारी यांना आता या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे त्यांना विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

नाशिक
दिनांक २९-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नंदकिशोर लोटन बोरसे, एन ३२ एफ १ ४ ३, सप्तशृंगी चौक, जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक विद्यालय, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित, जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, जुने सिडको, नाशिक - ४२२ ००९ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६२

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. चंद्रकांत जिभाऊ शेलार, अपिलार्थी

मु. पो. तळेगांव, तालुका इगतपूरी, जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विभागीय महसूल आयुक्त, विभागीय आयुक्त

कार्यालय, नाशिक रोड, तालुका जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील हे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द आहे. या

प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक २८-०२-२००८ रोजी त्यांना लिहिलेले पत्र म्हणजे जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय असल्याचे अपिलार्थीने नमूद केले आहे. अपिलार्थीने विचाराधीन अपिलामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " त्यांची प्राथमिक शिक्षक या पदावर केलेली सेवा सलग करण्याबाबत " या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" प्र.१ ला: अर्जदार पुणे जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील शाळांमध्ये ७/६/१९९४ पासून १०/०८/९७ अखेर प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा केली आहे. असे मा. शिक्षणाधिकारी प्राथमिक व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांनी दिलेल्या सेवा प्रमाणपत्राच्या दाखल्यामध्येच नमूद केलेले आहे तर त्याबाबत काय ?

प्र. २ रा : अर्जदार यांनी पुणे जिल्हा परिषद येथे प्राथमिक शिक्षक पदाचा विहीत पध्दतीने नोटीस देवून राजीनामा दिलेला आहे, असे मा. शिक्षणाधिकारी प्राथ. व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांच्या सेवा प्रमाणपत्राच्या दाखल्यामध्येच नमूद केलेले आहे तर त्याबाबत काय ?

प्र.३ रा : मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांच्या आदेशान्वये जावक क्र. शिक्षण/प्राथ/१७७८/९७, दि. ४/८/१९९७ च्या आदेशान्वयेच अर्जदार सिन्नर पंचायत समिती येथे ११/८/१९९७ रोजी हजर झाले व मा. गटशिक्षणाधिकारी सिन्नर यांचा ११/८/१९९७ चा आदेशच अर्जासोबत जोडत आहे. तर त्याबाबत काय ?

प्र. ४ था: अर्जदार यांची ७/६/१९९४ पासुन प्राथमिक शिक्षक सेवेमध्ये अजिबात खंडच पडलेला नाही तर त्याबाबत काय ?

प्र.५वा:         अर्जदार यांचे सेवा पुस्तक व सेवा अभिलेख उपलब्ध करुन देता येत असल्यामुळेच हे सेवा प्रमाणपत्र देण्यात येत आहे, असे मा. शिक्षणाधिकारी प्राथ. व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी दिलेल्या सेवाप्रमाणपत्राच्या दाखल्यामध्येच नमूद केलेले आहे व ते पत्र अर्जासोबत जोडत आहे. तर त्याबाबत काय ? "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कोणती माहिती हवी आहे याचा बोध नाही असे अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय म्हणजे अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे दिनांक २८-०२-२००८ रोजीचे पत्र आहे. या पत्राव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांची प्राथमिक शिक्षक म्हणून सलग सेवा धरण्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्राची व त्यांचे अपिलार्थीच्या मूळ प्रश्नाशी संलग्नित प्रस्तावावर त्यांचे आक्षेप याची यादी अपिलार्थीस दिली आहे. या पत्राच्या विरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत. संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस या प्रकरणी मुख्यत्वे करुन त्यांची सेवा सलग करुन घेण्यासंदर्भात शिक्षणाधिका-यांचे आदेश अपेक्षित आहेत. अपिलार्थीस अपेक्षित असलेली कार्यवाही ही संबंधित प्रशासनाच्या अखत्यारितील बाब आहे. राज्य माहिती आयोगास सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय प्रक्रियेमध्ये कोणताही निर्णय देण्याची अधिकारिता नसल्यामुळे अपिलार्थीच्या मूळ प्रश्नावर आयोगास कोणतेही आदेश देता येणार नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार अपिलार्थीच्या या प्रकरणाकडे पाहावयाचे झाल्यास अपिलार्थीने

त्यांच्या दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर परिच्छेदामध्ये मागणी केलेली माहिती पाहता, त्यांनी विचारलेली " माहिती " हा अधिनियमातील तरतुदीनुसार ' माहिती' चा विषय होऊ शकत नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी त्यांनी दिनांक ०६-१०-२००७ रोजीच्या प्रथम अर्जामध्ये पूर्णतः चुकीच्या पध्दतीने केली असल्याने व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत जिभाऊ शेलार, मु. पो. तळेगांव, तालुका इगतपूरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६३

निर्णय दिनांक   २९-०५-२००९

१ श्री. राजेंद्र काळू नानकर, अपिलार्थी

एन-५३, अे. जे. १/२६/५, महात्मा फुले नगर,

पवननगर, सिडको, नविन नाशिक - ०८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,

नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळालेली नाही, त्यामुळे त्यांना उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याची व त्यांना अपूर्ण माहिती विलंबाने दिल्याने

संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करावी, या अर्जामध्ये त्यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय अद्यापपावेतो न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केला आहे. या सर्व कारणास्तव त्यांनी त्यांचे विचाराधीन अपील मंजूर करावे अशी आयोगास या अर्जाच्या अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या आस्थापनेशी संबंधित एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-११-२००७ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस काही माहिती पुरविली. या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या मुद्दा क्रमांक चारशी संबंधित माहितीचा समावेश नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या पत्रावर दिनांक १५-११-२००७ अशी तारीख टाकून तीस दिवसानंतर माहिती दिली आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे त्यामुळे त्यांना उर्वरित मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी व तसेच माहितीसाठीच्या अर्जास व अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन कायद्याची उपेक्षा केल्यामुळे संबंधितांवर अधिनियमातील कलम

२० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करावी व उर्वरित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती दिली व मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहितीसाठी अपिलार्थीस दोन रुपये इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती न देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही भाष्य केले नाही, मात्र आता या मुद्दयावरील माहिती तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात येईल, असे आयोगास आश्वासीत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपूर्ण माहिती देऊन त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती देण्यासाठी अपिलार्थीकडून दोन रुपये इतक्या शुल्काची मागणी केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देतांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे संपूर्ण माहितीसाठीचे शुल्क त्यांना त्याच्या तपशीलासह अर्जदारास कळविणे आवश्यक आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे शुल्क कळवितांना ते विहित तरतुदीनुसार कळविले नाही व अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती त्यांनी दिलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून नाशिक जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, आयुर्वेदिक दवाखाने, यामध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिका-यांनी सन १९८५ पासून ते २००७ पर्यंत वैद्यकीय अधिका-यांच्या नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण केले आहे त्या संबंधित अधिका-यांच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रमाणपत्राची मागणी केली होती. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, प्रत्येक वैद्यकीय अधिका-यांनी त्यांच्या मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाकडे नोंदणी

केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या नुतनीकरणाची जबाबदारी वैयक्तीकरित्या त्यांची असते. याची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसते. यावर जन माहिती अधिकारी यांना आयोगाने असे विचारले की, जर एखाद्या वैद्यकीय अधिका-याच्या नोंदणीपत्राचे नुतनीकरण झाले नसेल व या कालावधी-मध्ये त्याच्या हातून एखादी चूक घडल्यास त्याला संबंधित वैद्यकीय अधिकारी जबाबदार असतो की नसतो ? त्यांची नोंदणी वैध नसलेल्या कालावधीमध्ये त्याच्यावर जबाबदारी कशी निश्चित करणार ? परंतु जन माहिती अधिकारी यांना याचे स्पष्टीकरण आयोगास करता आले नाही. त्यामुळे या मुद्दयावर आयोगाचे असे अभिप्राय आहेत की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व वैद्यकीय अधिकारी त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण करुन घेतील व तसे प्रमाणपत्र जिल्हा आरोग्य अधिका-याकडे सादर करतील असे पाहण्याची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिका-यांची आहे. त्यामुळे विचाराधीन प्रकरणी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वैद्यकीय अधिका-यांची मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे मागितलेली माहिती प्रथमतः प्राप्त करुन घ्यावी व तदनंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात यावी. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भातील सर्व प्रक्रिया हे आदेश निर्गमित झाल्या-पासून ३० दिवसाच्या आत पार पाडावयाच्या असून ही माहिती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधी-मध्ये विनामूल्य द्यावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपूर्ण माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती देण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र काळू नानकर, एन-५३, अे. जे. १/२६/५, महात्मा फुले नगर, पवननगर, सिडको, नविन नाशिक - ०८.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६४

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. राजेंद्र काळू नानकर, अपिलार्थी
एन-५३, अे. जे. १/२६/५, महात्मा फुले नगर,
पवननगर, सिडको, नविन नाशिक - ०८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी
जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक |
| जन अपिलीय अधिकारी | : | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक |
| त्रयस्थ पक्ष | : | श्री. एल. पी. बि-हाडे |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी केलेल्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय दिलेला नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सर्व विभागाच्या कर्मचा-यांची आस्थापनाविषयक माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वेगवेगळ्या विभागाशी संबंधित असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक ०१-११-२००७ रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सूचित केले. तथापि सर्व विभागाकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने संबंधित विभागाचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील अर्ज दाखल केले. यापैकी आज अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलामध्ये अपिलार्थीने दिनांक १९-१२-२००७ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील विचाराधीन अपिलाशी संबंधित असल्याचे दिसून येईल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

प्रसंगावशात् अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, या प्रकरणी त्यांनी जिल्हा परिषदेच्या एकूण बारा विभागाकडे प्रथम अपिले दाखल केली असता त्यापैकी सामान्य प्रशासन विभाग, बांधकाम विभाग क्रमांक १ व २ व ग्रामपंचायत विभाग वगळता उर्वरित ८ विभागाच्या जन अपिलीय अधिका-यांनी त्यांचे प्रथम अपील चालविले नाही. सबब या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी वैयक्तीक लक्ष घालून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर इतर विभागांनी देखील याच कालावधीमध्ये सुनावणी घेऊन निर्णय घेण्याचे आदेश द्यावेत असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र काळू नानकर, एन-५३, अे. जे. १/२६/५, महात्मा फुले नगर, पवननगर, सिडको, नविन नाशिक - ०८.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७१५

निर्णय दिनांक २९-०५-२००९

१ श्री. रामअवतार गुप्ता, अपिलार्थी

टायग्रानिया उद्योग, टायग्रानिया हाऊस,

टायग्रानियानगर, टायग्रानिया रोड,

न्यू मुंबई - आग्रा रोड,

नाशिक - ४२२ ०११

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

महाराष्ट्र शासन, मंत्रालय,

मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा व्यवस्थापकीय संचालक,

रिकॉम, निर्मल, नरिमन पॉईंट,

मुंबई - ३२

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०५-२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १५-०१-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०८-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांच्याकडे सिकॉम कंपनीच्या कार्यक्षेत्राशी संबधित काही माहिती मागविली होती. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम यांच्याकडे दिनांक ०५-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी या प्रकरणी त्यांनी दिनांक १२-०८-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे सिकॉमसंदर्भात मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, मूळात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा सिंकाम या संस्थेला लागू नाही. कारण सिकॉम ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण या शब्दाच्या व्याख्येमध्ये बसत नाही. एका प्रकरणी मा. मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे सुनावणी झाली असता मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी ऑगस्ट २००८ मध्ये त्यांच्या अशा प्रकारच्या एका अपिलावर निर्णय दिला होता. तथापि मा. मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडून अंतीम निर्णय अद्यापपावेतो त्यांना प्राप्त झालेला नाही. मा. मुख्य माहिती आयुक्त हे या प्रकरणी देणार असलेला निर्णय व आता राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने देऊ केलेल्या निर्णयामध्ये विरोधाभास होऊ नये म्हणून त्यांनी विचाराधीन सुनावणी पुढे ढकलण्याची आयोगाकडे विनंती केली आहे.

सिकॉमच्या प्रतिनिधीने केलेल्या विनंतीचा विचार करुन आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणाची सुनावणी आता पुढे ढकलण्यात येत असून सुनावणीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

नाशिक ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामअवतार गुप्ता, टायग्रानिया उद्योग, टायग्रानिया हाऊस, टायग्रानियानगर, टायग्रानिया रोड, न्यू मुंबई - आग्रा रोड, नाशिक - ४२२ ०११.

२ जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, रिकॉम, निर्मल, नरिमन पॉईंट, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४८
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. सुनिल शिवराम पवार, : अपिलार्थी
नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रैतवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,नाशिक
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : धान्य वितरण अधिकारी,नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती समाधानकारक वाटत नसल्याच्या कारणावरुन, त्यांनी आयोगाकडे केल्याचे यामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २४.०६.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नाशिक येथील श्री संत गाडगे महाराज धर्मशाळा येथील चिक्की कारखान्यातील गॅस सिलेंडर जप्तीसंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "श्री संत गाडगे महाराज धर्मशाळेतील चिक्की कारखान्यामध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडर न वापरता घरगुती गॅस सिलेंडरचा वापर केल्यामुळे सदर चिक्की कारखानदारांकडील गॅस सिलेंडर जप्त करुन पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे का, तो गुन्हा किती तारखेला नोंदविण्यात आला, सदर गुन्हा नंबर काय आहे, किती लोकांवर गुन्हा दाखल केला आहे" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या या संदर्भात केलेल्या प्रकरणामध्ये कोणत्याही व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला नाही, त्यामुळे त्यांच्या अर्जातील इतर माहितीवर माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, अशी अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०२.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना एम.डी.जी.मार्केटींग डिसीप्लीन गाईडलाईन्स २००१ ची प्रत अपिलार्थीस सात दिवसांच्या आत पुरविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. ०९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २१.०८.२००८ च्या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीस एम.डी.जी. मार्केटींग डिसीप्लीन गाईडलाईन्सची प्रत सशुल्क देऊ केली असता, अपिलार्थीने त्याचे शुल्क न भरल्याने अपिलार्थीस त्यांनी ही प्रत पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०६.२००८ रोजीच्या प्रथम अर्जास अधिनियमातील तरतुदीनुसार

विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. मूळात जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, संबंधित चिक्की कारखानदारावर कोणताही गुन्हा न नोंदविल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही आपोआपच 'निरंक' होत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती समाधानकारक नाही, असे नमूद केले आहे. मात्र ही माहिती त्यांना समाधानकारक का वाटत नाही, याचे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये एखाद्या टिपणीद्वारे स्पष्टीकरण केलेले नाही व तोंडी युक्तिवादासाठी आज आयोगासमोर अपिलार्थी उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल शिवराम पवार, घ.नं.१३४,१३५ श्री संत गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट,जुने नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा धान्य वितरण अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४४९
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. दिपक गोविंद उपासनी : अपिलार्थी
नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रैतवादी
सहायक आयुक्त (प्रशासन),
महानगरपालिका,नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्रशासन),
महानगरपालिका,नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उशिरा माहिती दिली व जी माहिती दिली, ती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १२.०६.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नती ३% आरक्षण विहित करण्याबाबत राज्य शासनाच्या दि. ५ मार्च, २००२ च्या निर्णयाप्रमाणे, त्यांना दिलेल्या पदोन्नतीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- शासन निर्णयामध्ये ३% आरक्षण कार्यपध्दत विहित करण्यात आली आहे काय?, आली असल्यास

कधीपासून व करण्यात आली नसल्यास का नाही, अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये ३% आरक्षण देण्यासाठी १०० रिक्त पदांची पदनिहाय स्वतंत्र नोंदवही ठेवलेली आहे काय ? ठेवली नसल्यास का नाही, स्वतंत्र नोंदवही ठेवली असल्यास सदर नोंदवहीनुसार महानगरपालिकेतील अधीक्षक,सहायक अधीक्षक,निरीक्षक या पदावर सेवाजेष्ठता क्रमांकानुसार पदनिहाय अपंग कर्मचाऱ्यांची पदोन्नती बिंदू नामावली रजिस्टरची प्रत, पदोन्नती दिली असल्यास उक्त संवर्गातील पदोन्नती कर्मचाऱ्यांची शासन निर्णयातील नमूद नामावली बिंदू रजिस्टरप्रमाणे माहिती, व पदोन्नती दिली नसल्यास शासन निर्णयाचा अवमान झाला आहे, असे वाटत नाही काय?- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०८.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील निकाली काढले.या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या दर्जाबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही व फक्त जन माहिती अधिकारी यांच्या सहायकांवर त्यांनी विलंबाने माहिती दिल्याबद्दल दोषारोपण केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविली असून त्यांना पुरविलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ च्या संदर्भात, "अधीक्षक/सहायक अधीक्षक/निरीक्षक या संवर्गात पदोन्नतीसाठी पदे रिक्त नसल्याने पदोन्नती दिलेली नाही " अशी माहिती दिली आहे, ती चुकीची असून २००२ नंतर नाशिक महानगरपालिकेमध्ये या पदावर पदोन्नत्या दिल्या गेल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, नाशिक, महानगरपालिकेमार्फत अपंग या प्रवर्गासाठी त्यांनी सन २००२ नंतर कोणत्याही पदोन्नत्या दिलेल्या नसल्यामुळे, त्यांनी अपिलार्थीस तसे उत्तर दिले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्र.४ व ५ अंशतः वगळता उर्वरित सर्व मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे, जी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे इतकीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे वा स्पष्टीकरणे विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलची कारणे वा स्पष्टीकरणे पुरविणे, मूळात या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ संपूर्ण व ५ अंशतः - "पदोन्नती दिली असल्यास उक्त पदनिहाय पदोन्नत कर्मचाऱ्यांची बिंदू नामावली रजिस्टर प्रमाणे माहिती" एवढयाच मुद्यावरील माहिती देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे.

यापैकी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०१.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ (अंशतः) शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची,दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, असे आयोगासमोर प्रतिपादन केले. तथापि त्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादामध्ये असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र.५ द्वारे दिलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने दिली असल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. मात्र अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली, हा मुद्दा या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस त्यांनी माहितीसाठीचा अर्ज दि. १२.०६.२००८ रोजी केला असता, त्यांना दि. ११.०७.२००८ रोजी अगर तत्पूर्वी माहिती प्राप्त होणे,तरतुदीनुसार अनुज्ञेय असताना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०८.२००८ रोजी म्हणजेच २१ दिवस विलंबाने दिली असल्याचे दिसून येते. या विलंबाचे समर्थन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी केलेले आहे. या स्पष्टीकरणामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित कर्मचाऱ्यांनी वेळीच प्रस्ताव सादर न केल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांना विलंब लागला. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे, ही तरतूद पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यास जन माहिती अधिकारी व त्यांना या प्रकरणी सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब आयुक्त,महानगरपालिका, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेला मुद्दा हा पूर्णत: महानगरपालिका प्रशासनाशी संबंधित असल्याने व महानगरपालिका प्रशासनाच्यासंदर्भात निर्णय देण्यासाठी स्वतंत्र

प्राधिकरण अस्तित्त्वात असल्याने, या निर्णयामध्ये, विशेषतः अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये मांडलेला, महानगरपालिका, नाशिककडून शासन निर्णयाचे अनुपालन केले जात नाही, हा मुद्दा आयोगाच्या कक्षेबाहेरचा असल्याने त्यावर आयोगास विचार करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ (अंशतः) शी संबंधित माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, महानगरपालिका,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : ३०-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिपक गोविंद उपासनी, २,पार्वती पॅलेस (टिळे सदन) सितागुंफा रोड, पंचवटी,नाशिक-३.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (प्रशासन),महानगरपालिका,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन),महानगरपालिका,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, नाशिक जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५०
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. अजित विश्वनाथ सहाणे, : अपिलार्थी
नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
पुणे.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग,पुणे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. या प्रकरणी त्यांना वेळोवेळी टाईपींग,झेरॉक्स,पोस्टेज,प्रवास खर्च, टेलिफोन बील इत्यादींचा नाहक भुर्दंड सोसावा लागला असल्याने,दि. १२.०४.२००८ ते माहिती मिळेपर्यंतच्या दिवसापर्यंत प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे नुकसानभरपाई प्राप्त व्हावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १३.०३.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे यांच्याकडे ओ.बी.सी. फ्रीशिप च्या तत्कालीन स्थितीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जाद्वारे, "पूणे विद्यापीठातील एम.एस्सी (बायोइन्फर्मेटीक्स) साठीचे ओ.बी.सी.फ्रीशिपची रक्कम आजपावेतो कोणत्या सालापर्यंत आलेली आहे, २००६-२००७ व २००७-२००८ ची रक्कम विद्यापीठाकडे कधी पाठविली आहे. जर पाठविली नसेल तर कधी पाठविणार आहे" अशी माहिती मागितली होती.अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार विभागीय समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे दि. १४.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. मात्र या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही निर्णय दिला नाही किंवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत. राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून दि.१४.०५.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच दि. २७.०५.२००९ रोजी ठीक १४.०० वा. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. कुदळे, स्टेनो यांच्यामार्फत दूरध्वनीद्वारे सुनावणीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना देऊनही, जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित आहेत. त्यामुळे जन माहिती अधिकारी कार्यालयामार्फत अपिलार्थीला देण्यात आलेल्या प्रतिसादाद्वारे नेमकी कोणती माहिती अपिलार्थीस पाठविली गेली, हे आयोगास, जन माहिती /अपिलीय अधिकारी अथवा त्यांच्या कार्यालयातील

त्यांच्या प्रतिनिधीच्या अनुपस्थितीमुळे, समजण्यास मार्ग नाही, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. अपिलार्थीने ज्या फ्री-शिपविषयी माहिती मागविली आहे, ती फ्री-शिप राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून दरवर्षी समाजकल्याण विभागामार्फत विद्यापीठाकडे पाठविली जाते. त्यांना अद्यापपावेतो या फ्री-शिपच्या संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्यांपैकी, "---पाठविली नसल्यास कधी पाठविणार आहे" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अशाप्रकारची प्रश्नोत्तर स्वरुपातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने ज्या संदर्भिय फ्री-शिपविषयी माहिती मागविली आहे, ही फ्री-शिप अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे राज्य शासनाकडून प्रथम समाजकल्याण विभागाकडे व तदनंतर समाजकल्याण विभागाकडून विद्यापीठाकडे पाठविली जाते. फ्री-शिपच्या वितरणाची ही पध्दत पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,पुणे यांच्याकडे असणे या प्रकरणी निश्चितपणे संभवत आहे. त्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या, मुदतीमध्ये देण्यासंदर्भात कार्यवाही करणे अनिवार्य होते. तथापि त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकाऱ्यावर कडी करुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा केली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणेच देय होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली, फ्री-शिप

पाठविली नसल्यास कधी पाठविणार आहेत, हा मुद्दा वगळता, उर्वरित सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

प्रसंगावशात, राज्य माहिती आयोगाला असे आढळून आले की, समाज कल्याण विभागाचे माहिती व अपिलीय अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे वारंवार उल्लंघन करीत आहेत आणि जणूकाही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करणे समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना लागू नाही, अशा दृष्टीने अनेक अर्जदारांच्या त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांवर (एखादा-दुसरा अपवाद वगळता) कोणतीही कार्यवाही करीत नाहीत, विचाराधीन प्रकरण म्हणजे याचे मुर्तीमंत उदाहरण आहे. सबब सचिव (सामाजिक न्याय) यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८)(क) च्या तरतुदीनुसार असे आदेशित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सामाजिक न्याय विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पार पाडावयाची त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यासंदर्भात सूचना देणारे परिपत्रक त्यांच्या स्तरावरुन त्यांनी तात्काळ निर्गमित करावे, जेणेकरुन सामाजिक न्याय विभागातील क्षेत्रीय अधिकारी जनसामान्यांच्या माहितीसाठीच्या अर्जांची व अपील अर्जांची उपेक्षा यापुढे भविष्यात कधीही  करणार नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना कोणताही प्रतिसाद न देता अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. २५.०६.२००८ रोजी पुणे विद्यापीठाकडे पाठविला. अपिलार्थीने दि. १३.०३.२००८ रोजी अर्ज केला असता, त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १२.०४.२००८ रोजी अगर तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी माहितीसंदर्भात त्यांना काही प्रतिसाद देणे अभिप्रेत असताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा माहितीसाठीचा अर्ज दि. २५.०६.२००८ रोजी पुणे विद्यापीठाकडे पाठविला, याची प्रत अपिलार्थीस देण्याचे, जे देणे, जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीप्रमाणे अनिवार्य आहे, ते सौजन्य देखील जन माहिती अधिकारी यांनी दाखविले नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या दि. १३.०३.२००८ रोजीच्या

अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने कार्यवाही करुन अधिनियमातील कलम ७(१) व ६(३)(एक) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : ३०-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित विश्वनाथ सहाणे, १०५१-अ,सहाणे सदन, राजेबहाद्दर लेन, नाशिक-४२२ ००१

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे विभाग,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सामाजिक न्याय विभाग),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५१
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री.प्रभाकर दौलत वाळके, : अपिलार्थी
मौ. खेडले,ता.दिंडोरी,जि. नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रैतवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी, दिंडोरी (प्रा.),जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (जंकास),
पूर्व भाग,नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. विलास रामकृष्ण वाळके

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. १६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता परस्पर निर्णय पारित केला. जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेला निर्णय चुकीचा असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. याच अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, "खेडले तालुका दिंडोरी येथील खरेदीखत दस्तऐवज क्र. १६८९/९९ प्रमाणे झाडाचा उल्लेख असून ग.नं.२८ मधील आंब्याचे फळझाड विनापरवानगी तोडले, त्याचा पंचनामा होऊन माहिती " ही माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केलेली माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस "वृक्षतोड रजिस्टर तपासून बघितले असता, मौ.खेडले ता.दिंडोरी येथील ग.नं.२८ मधील आंब्याचे फळझाड तोडण्यास परवानगी दिलेली नाही व तशी नोंद दिसून येत नाही. " असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे हे अपील,जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन, फेटाळून लावले, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या दि. २१.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, मौ.खेडले येथील ग.नं.२८ मध्ये सन १९९९ ते २००० मध्ये झालेल्या कथित वृक्षतोडीचा पंचनामा करुन हवा आहे. तथापि अशाप्रकारे मागील तारीख टाकून पंचनामा करण्याची पध्दत त्यांच्याकडे प्रचलित नसल्याने व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने, अपिलार्थीस त्यांनी त्याप्रमाणे कळविले आहे.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारची विशिष्ट अशी माहिती मागितली नसून जन माहिती अधिकारी यांनी, सन १९९९-२००० साली, त्यांच्या मते झालेल्या वृक्षतोडीचा पंचनामा त्यांना आता करुन हवा असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या केलेल्या अर्जाद्वारे कोणतीही माहिती अपेक्षिली नसून त्यांचा हा अर्ज त्यांच्या वैयक्तिक उपयोगाकरिता केलेली विनंती असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध अभिलेख्यावरुन अशाप्रकारच्या वृक्षतोडीची नोंद त्यांच्या रजिस्टरमध्ये केलेली नाही आणि तसे त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कळविले आहे. येथे असेही स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये, एखाद्या प्रकरणाची चौकशी करुन अर्जदारास नव्याने माहिती पुरविणे, ही बाब मूळात अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणी अधिनियमाद्वारे विहित केलेली कार्यवाही, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी योग्य प्रकारे पार पाडली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : ३०-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.प्रभाकर दौलत वाळके,मखमलाबाद रोड, वाघमळा, गिताईनगर, सर्व्हेनंबर ८६/४/५/अ पंचवटी, नाशिक-४२२ ००३.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, दिंडोरी (प्रा.),जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास),पूर्व भाग,नाशिक यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५२
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री.लखू विठोबा भले, : अपिलार्थी
सोनेवाडी भोजापूर, ता.सिन्नर, जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रैतवादी
तहसीलदार, सिन्नर,जि.नाशिक.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,निफाड,
जि. नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. वाळीबा सावळीराम भले

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर तहसीलदार,सिन्नर यांनी त्यांना खोटी माहिती दिली, खरी माहिती देण्यास टाळाटाळ केली व मागितलेली माहिती सद्‌भावनेस धरुन दिली नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कार्यवाही व्हावी व अपिलार्थीस झालेल्या आर्थिक,मानसिक नुकसानीची भरपाई मिळावी व त्यांना यासंदर्भात बिनचूक माहिती मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - मौजे मजकुर येथील अवैधरित्या हस्तांतरित झालेल्या जमीन ग.नं. १३अ चा ताबा मूळ मालकांना परत करण्याबाबत या विषयावर ऑक्टोबर २००३ ते मे, २००८ या कालावधीशी संबंधित एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील १० मुद्यांपैकी एकूण ८ मुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे व २ मुद्यांद्वारे, अनुक्रमे "रद्द झाली असल्यास नवीन फेरफारच्या आधारे व ७/१२ च्या आधारे उताऱ्याची प्रत, अपर जिल्हाधिकारी,नाशिक यांच्या निर्णयाप्रमाणे फेरफारची नोंद करणाऱ्या तलाठयाचे नाव व ती नोंद प्रमाणित करणाऱ्या मंडळ अधिकारी यांचे नाव आणि या कर्मचाऱ्यांची नेमणूक सध्या कोणत्या पदावर आहे, त्याचा पत्ता - ही माहिती मागितली आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस देय असलेल्या दोन मुद्यावरील माहितीपैकी एका मुद्यावरील माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०६.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. २३.०७.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे अधिनियमातील कलम २१ च्या अधीन राहून केवळ सद्‌भावनेच्या हेतूने कळवावीत, असे सूचित केले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या विषयासंदर्भात माहिती मागविली होती त्या अनधिकृत हस्तांतरणाच्या विषयावर आता निर्णय झाला असून अपिलार्थीला त्यांची जमीन परत प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २१.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०६.२००८ रोजी त्यांना दिलेली माहिती बरोबर आहे. फक्त या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली नोंद क्र.२३३ ही रद्द करण्यात आली होती व त्याची प्रत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिली होती. एवढेच नव्हेतर अपिलार्थीस नवीन ७/१२ चा व फेरफारचा उतारा देखील तलाठी कार्यालयाकडून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतेवेळी प्राप्त झाला होता, असे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन दिसून येते. मात्र या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जमिनीचा नवीन ७/१२ चा उतारा अपिलार्थीस दिल्यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस सदर मौ. मजकूर, ता.दिंडोरी येथील ग.नं.१३ अ चा फेरफार उतारा व नवीन ७/१२ चा उतारा याच्या प्रती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित देय (मुद्दा क्र. ३ (अ) व (ब अंशत:) )माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहितीसंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण दहा मुद्यांपैकी आठ मुद्यांद्वारे मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपातील असून अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण व त्यांच्या प्रश्नांना उत्तरे अपेक्षिली आहेत. अशाप्रकारची प्रश्नोत्तराची व जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मागण्याची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समाविष्ट नसल्याने उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

या प्रकरणी अपिलार्थीपासून हेतुपूर्वक अथवा कोणत्याही दुष्ट हेतूने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणत्याही कारवाईच्या आदेशाची अपिलार्थीची मागणी आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र.१ (ब) शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लखू विठोबा भले, रा. सोनेवाडी भोजापूर, ता.सिन्नर, जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिन्नर,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, निफाड,जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५३
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शोएब शरीफ शेख,<br>द्वारा ॲड.दिलावरखान पठाण,<br>नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>पोलीस आयुक्त कार्यालय,नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),<br>पोलीस आयुक्त कार्यालय,नाशिक | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थीचे वकील,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील दि.२३.०७.२००८ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर कोणताही पत्रव्यवहार अपिलार्थीशी केलेला नाही. या प्रकरणी त्यांना माहिती देण्यासाठी संबंधिताकडून हेतुपूर्वक टाळाटाळ होत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अंतीमतः अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १९.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदलीसंदर्भात एकूण ११ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कार्यालयातील रायडरमार्फत दि. २८.११.२००८ रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे. मात्र यासंदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांना आयोगास सादर करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १९.०४.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०७.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२८.११.२००८ रोजी विनामूल्य माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले, तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांना आयोगास आज रोजी सुनावणीच्यावेळी सादर करता आला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.११.२००८ रोजी विनामूल्य माहिती पुरविली, हा त्यांचा युक्तिवाद, आयोग मान्य करत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.११.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे पुरविलेल्या कथित माहितीचे

अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ ते ९ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न देता ही माहिती पोलीस मुख्यालयाकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची असून त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे ज्या वेळी प्राप्त झाला, त्यावेळी त्या अर्जाचे अवलोकन करुन त्या अर्जामध्ये जी माहिती त्यांच्याच प्राधिकरणाच्या दुसऱ्या विभागाशी संबंधित आहे, त्या विभागाकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत देऊन या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे देणे त्यांना भाग होते. मात्र त्यांनी अशी कोणतीही कृती केल्याचे आढळून येत नाही. सबब आता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ ते ९ शी संबंधित माहिती स्वतः पोलीस मुख्यालयातून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या विभागातील रायडरतर्फे माहिती पाठविण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते, कारण जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जानुसार त्यांना तीस दिवसांच्या आत माहिती द्यावयाचे निश्चित केले असते तर ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात विनंती केल्याप्रमाणे अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यासाठी लागणारा पोस्टाचा खर्च देखील त्यांना अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेता आला असता, परंतु मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जासच जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर कथित प्रतिसाद दिला असल्याने या प्रकरणी आता अपिलार्थीस संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती अपेक्षित केली असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविणे भाग आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयाच्या आस्थापना विभागाकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांना अंतीमतः विलंब लागला. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास पुरविण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील जे संबंधित कर्मचारी जबाबदार आहेत, त्यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे.ही तरतूद पाहता, पोलीस आयुक्त कार्यालयातील अपिलार्थीच्या या अर्जाशी संबंधित आस्थापना विभागातील माहिती, जन माहिती अधिकारी यांना विलंबाने देण्यास जे कर्मचारी जबाबदार आहेत, त्या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची पोलीस आयुक्त,नाशिक यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे, अशा प्रश्नांना उत्तरे न देता त्या मुद्यांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे, त्या अभिलेख्यांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस द्याव्यात.

उपरोक्त प्रकरणावरुन पोलीस आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयामध्ये सहा.पोलीस आयुक्त (प्र) नाशिक यांच्या विभागात आस्थापना विभाग,लेखा विभाग या विभागाशी संबंधित स्वतंत्र जन माहिती अधिकारी नेमले जाण्याची आवश्यकता असल्याचे या ठिकाणी आयोगास वाटत आहे, सबब अधिनियमातील कलम १९(८)(क) मधील तरतुदीनुसार पोलीस आयुक्त, नाशिक यांना, त्यांच्या कार्यालयातील संबंधित शाखा प्रमुखांची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जेणेकरुन या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ज्या प्रकारे निरर्थक कालापव्यय झाला आहे, त्या प्रकाराची पुनरावृत्ती इतःपर घडणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात

येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. पोलीस आयुक्त,नाशिक यांना, अपिलार्थीच्या या अर्जाशी संबंधित आस्थापना विभागातील माहिती जन माहिती अधिकारी यांना विलंबाने देण्यास जे कर्मचारी जबाबदार आहेत, त्या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शोएब शरीफ शेख, चेंबर नं.११३, बिल्डींग नं.२, जिल्हा न्यायालय परिसर,नाशिक-१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),पोलीस आयुक्त कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस आयुक्त, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५४
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ सौ. लतादेवी मदनलाल मालपानी, : अपिलार्थी
मालेगाव, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, निफाड, जि.नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नाशिक.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी,
पंचायत समिती,निफाड,जि. नाशिक
जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,निफाड,जि. नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाचे कोणतेही उत्तर दिले नसल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या खातेनिहाय चौकशीचे आदेश देऊन त्याच्या प्रती अपिलार्थीस पाठवाव्यात व त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांनी दि. २०.०६.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या निकालाचे उत्तर त्यांना का दिले नाही, अपिलार्थीस उत्तर न देणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे व दि. २०.०६.२००७ रोजीच्या अपील अर्जाच्या निकालाची प्रत,- ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नाशिक यांच्याकडे दि. ०८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जि.प.नाशिक यांनी दि. ०८.०४.२००८ व दि. २१.०४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे दि. ०८.०३.२००८ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ च्या निर्णयाद्वारे निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. २४.०१.२००८ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती,निफाड यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला होता. संबंधित ग्राम विकास अधिकारी आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांनी या पत्रावर काय कार्यवाही केली, या विषयी समाधानकारक स्पष्टीकरण करु शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. ०८.०३.२००८ रोजी प्राप्त झालेल्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. ०८.०४.२००८ व दि. २१.०४.२००८ रोजी सुनावणी

ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिले. त्यांनी अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील दि. २०.०५.२००८ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती,निफाड यांनी अपिलार्थीच्या दि.२४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या दि.२४.०१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्यांद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती,ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत कोणतीही कार्यवाही न केल्याने त्यांना, आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : ३०-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. लतादेवी मदनलाल मालपाणी, सोमवार वॉर्ड, शिवाजी रोड,मालेगाव, जि. नाशिक-४२३२०३.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,निफाड,जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,निफाड,जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५५
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शामराव रामराव देवकर,<br>नाशिक. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस आयुक्त,<br>नाशिक शहर,नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),<br>नाशिक शहर, नाशिक. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), नाशिक.

त्रयस्थ पक्ष : श्री. यशवंत वाघ,श्री.हरिभाऊ कुलकर्णी,श्री. विश्वास ठाकुर,श्री.संभाजी जाधव,श्री.मच्छींद्र सूर्यवंशी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे मुंबई येथील कार्यालयात दि. ०८.०२.२००८ व औरंगाबाद कार्यालयात दि. ११.०८.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना या प्रकरणी पोलीस उप आयुक्त यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर आदेश मिळाले नाहीत, असे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, वर नमूद केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या वेगवेगळया तारखांच्या जबाबाच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),नाशिक शहर यांच्याकडे दि. २९.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २९.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२९.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शामराव रामराव देवकर,लाईन नं. ८, रुम नं.३४०, पोलीस हेडक्वॉर्टर,नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),नाशिक शहर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),नाशिक शहर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५६
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. सतीश रामदास पाटील, : अपिलार्थी
रा. सटाणा,ता.बागलाण,जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),
नाशिक ग्रामीण.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक,
नाशिक ग्रामीण.

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक,
नाशिक ग्रामीण.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असताना ती माहिती देण्यास त्यांनी टाळाटाळ केली. माहिती अधिकारी तथा तपासी अधिकारी हे त्रयस्थ पक्ष गुन्हेगार असतानाही त्यांना पाठीशी घालत असल्याने अपिलार्थीने योग्य तो न्याय मिळण्यासाठी आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - सटाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्यावर गुन्हा र.नं. ७६/२००७ बाबत ठेवण्यात आलेले दोषारोप व संबंधित पोलीस निरीक्षक यांनी त्याविरुध्द केलेल्या अपील/खंडनपत्राबाबत - या मुद्यावरील माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ८(ञ) च्या तरतुदीनुसार नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०७.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. सदर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस, "ज्या कारणास्तव सदरची माहिती पाहिजे आहे, ते कारण संयुक्तिक वाटत नाही तसेच त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड करण्यास सहमती न दर्शविल्याने त्यांनी सदर निर्णय घेतल्याचे" नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगासमोर युक्तिवाद केला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, या प्रकरणामध्ये पोलीस निरीक्षक, सटाणा श्री. पी.एन.मेढे, यांच्यावर विभागीय चौकशीचे आदेश पारित होऊन विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्या दि.१४.०१.२००८ रोजीच्या आदेशान्वये श्री. मेढे यांची वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरिता स्थगित करण्याची शिक्षा देण्यात आली होती. या आदेशाविरुध्द श्री. मेढे यांनी पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अपील केले असता, त्यांनी श्री. मेढे यांचे दि. ०५.०६.२००८ रोजीचे अपील फेटाळले व मूळ शिक्षा कायम ठेवली.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज दि. ०६.०५.२००८ रोजी केला होता, त्यावेळी श्री. मेढे यांच्या अर्जावर पोलीस महासंचालक,मुंबई यांच्याकडे त्यांच्या अपील प्रकरणी निर्णय घेण्याची प्रक्रिया चालू होती. तथापि त्यानंतर या प्रकरणी निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून आता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही शासकीय अभिलेख्यांचा भाग म्हणून उरली आहे. ही माहिती उघड करण्यासाठी एखाद्या न्यायालयाने जन माहिती अधिकारी यांना प्रतिबंध केला आहे किंवा कसे याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कोणत्याही न्यायालयाचे या प्रकरणाशी संबंधित माहिती उघड न करण्यासाठी कोणतेही आदेश नसल्याचे आयोगास अवगत केले, हे पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता कालपरत्त्वे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासकीय अभिलेख्यांचा भाग म्हणून ताब्यात असल्याने व ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) व (९) मधील कोणत्याही तरतुदीचा भंग होणार नसल्याचे आयोगास वाटत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीपासून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही विशिष्ट अशा असद्‌हेतूने माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सतीश रामदास पाटील,'श्रीराम फार्म' भाक्षी रोड, सटाणा,ता.बागलाण,जि.नाशिक-४२३३०१.

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),नाशिक ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५७
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. सतीश रामदास पाटील, : अपिलार्थी
रा. सटाणा,ता.बागलाण,जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष पोलीस महानिरीक्षक
नाशिक
२ जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र,
नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक (अति.कार्य),
पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नाशिक
जन अपिलीय अधिकारी : पोलीस उपअधीक्षक (वाचक),
पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना न्यायालयीन कामासाठी माहिती लागत असताना देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. तपासणी अधिकारी हे गुन्हेगार असतानाही वरिष्ठ अधिकारी त्यांना पाठीशी घालत असल्यामुळे त्यांच्या या कृतीबद्दल योग्य न्याय मिळण्यासाठी आयोगाकडे अपील केले आहे व या अपील अर्जामध्ये अंतिमत: त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - पोलीस तपास अधिकारी यांनी (त्यांच्या तपासकार्यात) गुन्हे केले असता, त्यासाठी पोलीस नियमावलीनुसार/कायद्यान्वये शिक्षेची तरतूद काय आहे? - अशी माहिती एकूण ४ प्रकारच्या गुन्हयांचे प्रकार त्यांनी अर्जामध्ये नमूद करुन, मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने हा अर्ज विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्याकडे केला होता, तथापि या प्रकरणी ते जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा दि. ०६.०५.२००८ रोजीचा, त्यांच्याकडे प्रत्यक्षात दि.०८.०५.२००८ रोजी प्राप्त झालेला मूळ माहितीसाठीचा अर्ज पोलीस अधीक्षक,नाशिक ग्रामीण यांच्याकडे दि.१२.०५.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे पाठविला. या नंतर जिल्हा पोलीस अधीक्षक(ग्रामीण) यांच्या कार्यालयाने दि. २३.०६.२००८ रोजी या अर्जास प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही काल्पनिक स्वरुपाची असल्याचे नमूद करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्याकडे दि. २८.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०७.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये आवश्यक ती कार्यवाही केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी

आयोगास असे अवगत केले की, सध्या पोलीस खात्यामध्ये प्रशासकीय अनियमिततेच्या संदर्भात मुंबई पोलीस कायदा १९५१ व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९८१ प्रमाणे संबंधितांवर प्रशासकीय कारवाई केली जाते.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी नमूद केलेल्या विविध प्रकारच्या अनियमिततेबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना कोणती शिक्षा दिली जाते अशा अर्थाची माहिती विचारली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये, एफ.आय.आर.मध्ये काही हेतू ठेवून खाडाखोड करणे, गुन्हा नोंदविताना जाणीवपूर्वक चुकीचे नियम/कलम लावणे, तपास कामात हलगर्जीपणा करणे, गुन्हयाचा तपास न लागणे व लागण्यास विलंब होणे यासाठी या मुद्यांवरील बाबी कारणीभूत असल्याचे निदर्शनास येणे, अशा स्वरुपाचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्याने त्यांच्या तपासकार्यात अनियमितपणा केल्यास या गुन्हयाबाबत काय शिक्षा होऊ शकते, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या स्वरुपावरुन अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोलीस विभागातील एखादा अधिकारी किंवा कर्मचारी नजरेसमोर ठेवून मागितल्याचे दिसून येत आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांचे नियमित कर्तव्य बजावत असताना त्यांच्या हातून घडलेल्या अनियमिततेमुळे त्यांचेवर प्रशासकीय कारवाई केली जाते, तथापि संबंधित कर्मचाऱ्यांकडून घडलेल्या अनियमिततेचे प्रमाण व स्वरुप हे त्या-त्या वेळेच्या घटनेवर अवलंबून असून, मूळात राज्य शासनाने अथवा इतर कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने अशाप्रकारच्या अनियमिततेचे अथवा गुन्हयांचे कोणतेही प्रमाणिकरण करुन ठेवलेले नाही किंबहुना कोणत्याही गुन्हाचे अथवा अनियमिततेचे अपिलार्थीस अपेक्षित असल्याप्रमाणे प्रमाणिकरण करुन ठेवताही येणार नाही, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस पोलीस विभागाच्या प्रशासनामध्ये प्रचलित असलेले नागरी सेवा वर्तणूक (शिस्त व अपील) नियम १९८१ मधील शिक्षेसंबंधातील तरतुदी अपिलार्थीस आता पुरवाव्या लागतील. अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन

माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांच्या खात्यामधील प्रशासनामध्ये पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना, त्यांनी स्वतःचे कर्तव्य बजावताना केलेल्या अनियमिततेबाबत ज्या सौम्य/कठोर स्वरुपाच्या शिक्षा सेवानियमाच्या ज्या कलमान्वये केल्या जातात, त्या कलमाच्या तरतुदी दर्शविणाऱ्या संबंधित पृष्ठांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**नाशिक**
**दिनांक : ३०-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सतीश रामदास पाटील,'श्रीराम फार्म', भाक्षी रोड, सटाणा,ता.बागलाण,जि.नाशिक-४२३ ३०१

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक (अति.कार्य),पोलीस महानिरीक्षक कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (वाचक),पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नाशिक या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५८
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. गोरखनाथ लाला निकुंभ, : अपिलार्थी
सिडको,नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक (संशोधन),
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
नाशिक

त्रयस्थ पक्ष : १) कु. कल्पना एकनाथ निकुंभ
२) श्री. एकनाथ लाला निकुंभ

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली गेली नाही व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर दि. ०२.१०.२००८ पर्यंत कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - "सख्खा मोठा भाऊ श्री. एकनाथ लाला निकुंभ यांची मुलगी कल्पना एकनाथ निकुंभ हीने वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती" या विषयावर एकूण १३ मुद्यांद्वारे रजिस्टर्ड टपालाद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, अनुसूचित जाती जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाचे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे दिल्या जाणाऱ्या वैधता प्रमाणपत्रासंदर्भात होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या उमेदवाराच्या कागदपत्रांची मागणी केली आहे, ती देण्यासाठी त्या उमेदवाराची संमती घेणे आवश्यक आहे, करिता त्रयस्थ पक्ष श्रीमती कल्पना एकनाथ निकुंभ यांचा पूर्ण पत्ता, नस्ती क्रमांक, वर्ष इत्यादी माहिती कळवावी, असे अपिलार्थीस सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रानुसार अपिलार्थीने त्यांना त्रयस्थ पक्षाचा कोणताही तपशील कळविला नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या दि. २५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून नस्त्यांचे अवलोकन करुन अपिलार्थीस हवी असलेली माहिती सशुल्क उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निमंत्रित केल्यानंतरही अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. मात्र त्यानंतर त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागविली आहे. मात्र त्रयस्थ पक्षाचे नाव वगळता इतर कोणताही संदर्भ त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना दिलेला नाही.त्यांच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता एकनाथ लाला निकुंभ यांनी मूळात त्यांच्या मुलीकरिता जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त होण्यासाठी मूळ अर्ज केला होता किंवा कसे, हे ही आयोगास अथवा जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही सबळ पुराव्याशिवाय कळण्यास मार्ग नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अत्यंत मोघम स्वरुपात व संदर्भहीन माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उल्लेखित त्रयस्थ पक्षाविषयी त्यांच्या कार्यालयातील संदर्भाची व त्यांचेशी संपर्क साधण्यासाठी पत्त्याची मागणी केली असता, अपिलार्थीने आवश्यक ते संदर्भ व तपशील जन माहिती अधिकारी यांना पुरविले नाहीत व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहण्याकरिता सूचित केले असता अपिलार्थीने त्यांच्याही सूचनेचे पालन केले नाही. आज रोजीही अपिलार्थी आयोगासमोर अनुपस्थित आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीविषयीच अशाप्रकारे संदेह निर्माण होत असल्याने वरील सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक**
**दिनांक : ३०-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोरखनाथ लाला निकुंभ,-एन ४२,व्हीसीबी, ३/१/३, दत्त मंदीराजवळ, पेठे शाळेच्या मागे, सिडको स्कीम नं.४,नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (संशोधन),अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४५९
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, : अपिलार्थी
ता.मालेगाव,जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नाशिक.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नाशिक.

त्रयस्थ पक्ष : श्रीमती रत्ना अशोक दुकळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दि. ११.०९.२००७ रोजी मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी श्री. पी.व्ही.शिरसाट, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.नाशिक यांचेकडे दि. ०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. श्री. शिरसाट यांनी दि. ०५.१२.२००७ रोजी सुनावणीसाठी बोलावून ते कार्यालयात हजर झाले नाहीत, तसेच अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही व त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेण्यात आले नाही, उलट वेळोवेळी विनंती करुनही माहिती दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, गो.य.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,जळगाव (नि.)या शाळेतील अनुकंपा तत्त्वावर श्रीमती रत्ना अशोक दुकळे (शिपाई) यांच्या नेमणूकीच्या मान्यतेबाबत सन २००४ ते दि.११.०९.२००७ रोजीपर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने - " श्रीमती दुकळे रत्ना अशोक यांच्या मान्यतेबाबत विलंब का झाला आहे याबाबत खुलासा देण्यास विनंती आहे"- ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीस मार्च,२००० पासून स्थगिती असल्यामुळे श्रीमती दुकळे यांच्या मान्यतेबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे अपिलार्थीस कळविले व तसेच अपिलार्थीने संदर्भित केलेला प्रस्ताव दि. २४.०९.२००७ रोजी त्रूटीपूर्ततेसाठी संबंधित शाळेस परत केल्याचे देखील अपिलार्थीस कळविले. मात्र या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी  कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे गो.य.पाटील या शाळेचे मुख्याध्यापक असून त्यांना, त्यांनी सेवेत कार्यरत असताना केलेल्या अनियमिततेबाबत रीतशीर विभागीय चौकशी करुन बडतर्फ करण्यात आले असून त्यांना अद्यापपावेतो सेवानिवृत्तीवेतन व तदनुषंगीक कोणतेही फायदे देण्यात न आल्यामुळे ते अशाप्रकारच्या माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी करित असतात. अपिलार्थीने दि. ०८.१०.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपील केले

होते त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, त्यामुळे तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी प्रथम अपिलावर विहित मुदतीत निर्णय का दिला नाही, याचे कारण आता ते आयोगास सांगू शकत नाहीत.

वरील घटनाक्रम,जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी पूर्णतया विसंगत आहे. अपिलार्थीने या अर्जाद्वारे श्रीमती दुकळे रत्ना अशोक यांच्या मान्यतेबाबत विलंब का झाला आहे, याबाबत खुलासा, अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये मूलतः अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबद्दल, निर्णयाबद्दल त्यांना कारणे विचारणे, खुलासा वा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारणे व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्याप्रमाणे खुलासा वा स्पष्टीकरण पुरविणे ही प्रक्रियाच मूळात या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतया विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. परिणामी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद पर्वतराव मोरे,रेश-पर्व, आनंदनगर, नव वसाहत, सोयगाव ता. मालेगाव, जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६५
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री.शेख मो.बशीर इस्माईल, : अपिलार्थी
पिंपळगाव बसवंत,ता.निफाड,जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक कामगार आयुक्त,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक कामगार आयुक्त,
नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सरकारी कामगार अधिकारी,
कामगार आयुक्त कार्यालय,नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही, म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्या अपिलावरही निर्णय न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातून देण्यात येणाऱ्या सरकारी व खाजगी जागेवर दुकान परवाना मिळविण्यासंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ८(क) नुसार माहिती या शब्दाच्या व्याख्येत येत नसल्याने ती त्यांना देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने त्यांना माहिती देण्याचे त्यांनी त्यांच्या दि. २९.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे नाकारले, असे आयोगास स्पष्ट केले. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दि. २९.०४.२००८ रोजीच्या पाठविलेल्या पत्रामध्ये त्यांनी चुकून माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(क) असे उल्लेख केला असून त्याऐवजी त्यांना कलम २(च) असे म्हणावयाचे होते व त्याप्रमाणे त्यांनी नंतर शुध्दीपत्रक काढले आहे. आयोगाने, हे शुध्दीपत्रक त्यांनी अपिलार्थीस पाठविले होते किंवा कसे, याबाबत विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांनी नकारात्मक उत्तर दिले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नसल्याचे आयोगासमोर मान्य केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील, -"सरकारी व खाजगी जागेवर दुकान परवाना घेण्याकरिता

कोणकोणत्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे"- हा मुद्दा क्र. १ मधील अंशतः भाग वगळता उर्वरित तीनही मुद्यांवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारल्याचे दिसून येते, जी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना माहिती विचारल्यास, त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया त्यामध्ये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या स्पष्ट केली आहे. यामध्ये, 'माहिती' याचा सर्वसाधारण अर्थ, जन माहिती अधिकारी यांच्याकडे विविध स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती असा आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात मागणी केलेली मुद्दा क्र.१ मधील वर स्पष्ट केल्याप्रमाणे या मुद्यावरील अंशतः भाग वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस दुकान परवान्याकरिता लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ अंशतः भागाशी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची वेळ आली आहे, हे निश्चित राज्य शासनाच्या कामगार विभागास भूषणावह नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आपल्या

अशाप्रकारच्या कृतीद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद कामगार आयुक्त,मुंबई यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र.१ मधील अंशतः भागाशी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**नाशिक**
**दिनांक : ३०-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख मो.बशीर इस्माईल, घर नं. १५०९, लक्ष्मीबाई डेरे कॉलनी, पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी,कामगार आयुक्त कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कामगार आयुक्त, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४६६
निर्णय दिनांक ३०-०५-२००९

१ श्री. यशवंत उखा बोरसे, : अपिलार्थी
रा.सटाणा,ता.बागलाण,जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालय,
जिल्हा परिषद, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नाशिक.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
कार्यालय,जिल्हा परिषद, नाशिक.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०५.२००९ रोजी नाशिक येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हवी असलेली माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन दिशाभूल करणारी माहिती दिल्याने, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, आदर्श ग्रामसेवा समिती, गिरणारे व सर्वधर्म समभाव समाज विकास मंडळ,वासोळ या दोन संस्थांसंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८५ ते १९९१ या कालावधीतील माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ न शकल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या संस्थांविषयी माहिती मागविली आहे, त्या संस्थांना सन १९८५ साली शासनाने मान्यता दिली आहे, मात्र या संस्थांना अनुदान देणे सन १९९० नंतर सुरु केले. सन १९९० पूर्वी या शाळेशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्यासाठी संबंधित संस्था जबाबदार असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती त्यांच्या कार्यालयात असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्दा क्र.३ व ४ शी संबंधित माहिती ही धर्मादाय आयुक्त यांच्या अखत्यारितील असल्यामुळे त्यांच्याकडे ती उपलब्ध नाही व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जो अधिनियमाचा उल्लेख केला आहे, अशाप्रकारचा अधिनियम मूळात अस्तित्त्वात नसून, 'माध्यमिक शाळा संहिता, १९६६' नुसार शैक्षणिक संस्थांचा कारभार चालतो.त्यामुळे या प्रकरणी आता अपिलार्थीस माहिती देणे त्यांना शक्य होणार नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या

अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेकडे असणे मूळात अभिप्रेत आहे. त्यामुळे ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ द्वारे,- इंदिरा माध्यमिक विद्यालय, वासोळ या विद्यालयास दि. १७.११.१९८७ व दि. ३०.०८.१९८८ रोजी झालेल्या वार्षिक तपासणी ज्या कार्यालयीन आदेशान्वये झाली त्या आदेशाची सत्यप्रत - अशी माहिती अपेक्षिली आहे. परंतु ही तपासणी कोणत्या कार्यालयाच्या आदेशान्वये झाली आहे, त्या कार्यालयाच्या नावाचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये केला नाही. शाळेची तपासणी तालुका स्तरावर शिक्षण विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत देखील केली जाते, त्यामुळे ही माहिती देखील अपिलार्थीस शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरुन प्राप्त होऊ शकणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये म्हटल्याप्रमाणे मुद्दा क्र.३ व ४ शी संबंधित माहिती मूळात धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित असल्याने, ती कोणत्याही प्रकारे शिक्षणाधिकारी कार्यालयात उपलब्ध असणे संभवत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे शिक्षणाधिकारी यांच्याकडे ज्या अधिनियमाशी संबंधित माहिती मागविली आहे, तो अधिनियमच मूळात अस्तित्त्वात नसल्याने, या मुद्यावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर जो युक्तिवाद केला त्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अथवा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**नाशिक** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. यशवंत उखा बोरसे, व्ही.पी.नाईक विद्यालयासमोर, मौलाना आझाद रोड,सटाणा,ता. बागलाण, जि. नाशिक-४२३३०१

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालय, जि.प.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.नाशिक यांना या निकाल- पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.